सत्कार्योत्तेजक सभा-पुणें

महाराष्ट्रीय

संत—कवि—काव्य—

सूची

(११००-१७४०)

ऐसें प्राप्तार्थ आले । जे निष्कामता पातले ।
तेयां हि कर्तृत्व असे उरलें । लोकांलागि ॥

श्रीज्ञानेश्वरी ३.१५४

संपादक

गोविंद काशीनाथ चांदोरकर, बी. ए. एल्एल्. बी.

प्रकाशक

धि प्रिंटिंग एजन्सी, बुधवार पेठ पुणें

हें पुस्तक महादेव सखाराम दाते, खेडकर वैद्य यांनीं पुणें पेठ शनवार घ. नं. ७७ येथें आपल्या "वैद्यकपत्रिका" छापखान्यांत छापिलें व नारायण काशीनाथ फडके यांनीं धि प्रिंटिंग एजन्सी, पुणें (४५६ बुधवार) येथें प्रसिद्ध केलें.

अर्पण

श्रीसंतांच्या
पदस्पर्शानें पुनीत
झालेल्या प्रिय

महाराष्ट्रास

संतावताररहस्य

उपकारासाठीं केले हे उपाय । येर्णेविण काय चाड आम्हां ॥

" जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती " या एका लहानशा वाक्यांत संतांच्या अवतारांचें रहस्य आलेलें आहे. ज्या समाजांत हे संत उत्पन्न होतात त्या समाजाचें कल्याण घडवून आणणें हीच त्यांच्या जीविताची इतिकर्तव्यता असते, असा या वाक्याचा भावार्थ आहे. जगाच्या म्हणजे 'पुढिलांच्या' अथवा 'परकीयांच्या' असा अर्थ येथें इष्ट आहे. महाराष्ट्रीय संतांनीं महाराष्ट्राचें तर ऐहिक व पारमार्थिक कल्याण केलेंच आहे; पण त्याबरोबरच जगाचेंहि कल्याण सहजच घडून आलें आहे. इतकेंच कीं महाराष्ट्राचें कल्याण प्रत्यक्ष झालें असून, जगाचें मात्र पर्यायानें झालेलें आहे. महाराष्ट्रीय संतांनीं जगाचें कल्याण पर्यायानें केलें आहे असें म्हणण्याचें कारण हें आहे कीं, त्यांचें अवतारकार्यक्षेत्र जरी विशेषतः महाराष्ट्रच होतें तरी त्या कार्याचा परिणाम पर्यायानें सर्व जगभर झालेला आहे. तळ्याचे एका भागांत दगड टाकला असतां त्यांतील पाण्याची खळबळ प्रत्यक्ष जरी त्याच भागांत होते, तरी लहरीच्या रूपानें तें सर्व तळें जसें आंदोलन पावतें किंवा शरीराच्या कोणत्याहि एका भागास सुख अथवा दुःख झालें असतां त्या सुखाच्या अगर दुःखाच्या संवेदना सर्व शरीरभरहि जशा होतात, तसें या विश्वाच्या एका भागाचें सुख अथवा त्याची उन्नति हीं अखिल मानवी सृष्टीचें सुख व उन्नति होत. आणखी एका दृष्टीनें आमच्या या महाराष्ट्र संतांनीं अप्रत्यक्षतेनें सर्व जगावर उपकार केले आहेत. आज ज्ञात असून प्रचलित असलेल्या सर्व धर्मांस आद्य आणि आमचे दृष्टीनें व इतरांचेहि दृष्टीनें तत्त्वज्ञानापुरता तरी सर्वांत श्रेष्ठ, आणि कधीं काळीं अखिल मानव सृष्टीस मिळणाऱ्या शांतिसुखास पोषक असा जो वैदिक धर्म त्याचें उज्जीवन, आणि तेंहि महाराष्ट्रासारख्या देशांत करणारे संत सर्व जगाचे अप्रत्यक्षतेनें कल्याण करणारे होते असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं.

या वरील विवेचनावरून एक गोष्ट ध्यानांत आलीच असेल कीं, संतांनीं जें हें महाराष्ट्राचें कल्याण केलें तें धर्मोज्जीवनानेंच केलें आहे; तेव्हां प्रथम असे प्रश्न सहजच उद्भवतात कीं, धर्माची तेजोहानी झाली होती कीं नाहीं आणि झाली असल्यास ती कशानें ? यांपैकीं पहिल्या प्रश्नाचें उत्तर दुसऱ्या प्रश्नाचे उत्तरांत अनायासानेंच आलें असल्यानें दुसऱ्याचाच प्रथम विचार करूं म्हणजे झालें.

आमचें ऐहिक व पारमार्थिक कल्याण करण्याची क्षमता म्हणजे तेजस्विता जी आमचे धर्मांत पूर्वी होती ती मध्यंतरीं नाहींशी होण्यास आमचे दृष्टीनें बौद्ध मताचा उत्कर्ष, आम्हांत रूढ झालेला मिथ्याचार, सामान्य जनतेस दुर्बोध अशा भाषेंत व विचारांत स्वधर्ममतांचें प्रतिपादन, आमची ऐहिक समृद्धि आणि शेवटीं परधर्मीयांचा प्रवेश ही कारणपरंपरा झालेली आहे. म्हणून या कारणांचा यथानुक्रम थोडक्यांत विचार करूं.

बौद्ध दर्शन हें वैदिक धर्मापासून उत्पन्न झालेल्या अनेक दर्शनांप्रमाणेंच एक दर्शन आहे. त्यांत शून्यवाद प्रतिपादलेला आहे. मोक्षाऐवजीं या दर्शनांत निर्वाण हें ध्येय आहे. निर्वाण हा अभाव आहे; म्हणजे कामक्रोध व लोभ यांचा निरास हेंच निर्वाण. निर्वाणाचा खरोखर अर्थ काय आहे तो या दर्शनाचा उत्कर्ष करणारे जे गौतमबुद्ध त्यांनींहि कोठें स्पष्ट केलेला नाहीं; परंतु इतकें खरें कीं, मनाची वृत्तिशून्यता हीच निर्वाणस्थिति हें त्यांस संमत होतें असें सामान्यतः म्हणण्यास हरकत नाहीं. वर दिलेल्या या दर्शनाच्या ह्या स्थूल स्वरूपावरून एक गोष्ट उघड होत आहे ती ही कीं, मनास वृत्तिशून्यता आणणें हेंच या दर्शनाचें मुख्य ध्येय असल्याकारणानें याचा फार मोठा भर विचारापेक्षां आचाररूपी तपावरच असणें सहज आहे; परंतु इंद्रियांची विषयलोलुपता पूर्णपणें लक्षांत आणूनच जणूं काय जी आश्रमव्यवस्था वैदिक धर्मांत अगर हिंदुधर्मांत विहित केली आहे तिचा अवलंब या बौद्ध दर्शनांत न करितां, इंद्रियवृत्तींच्या उपशमनानंतरच इष्ट असा जो संन्यास त्यास प्रथमच विहित गणिल्यानें, आणि चित्तशुद्धि ही स्वभावतः बाह्य चिन्हांनीं प्रत्यक्ष दृश्य होत नसल्यानें, या (बौद्ध) दर्शनांत स्वतःच्या नाशाचें बीज जणूं काय प्रथमच पेरलें गेलें होतें असें म्हणण्यास हरकत

नाहीं. बौद्ध दर्शनासारखीं निरीश्वरवादी आणखीहि इतर दर्शनें नव्हतीं असें नाहीं; परंतु त्या दर्शनाप्रमाणें हें वैदिकधर्मान्तर्गत न रहातां, चातुर्वर्ण्य झुगारून दिल्यानें तो एक स्वतंत्र धर्मच बनला आणि तो तसा स्वतंत्र बनल्यामुळेंच वैदिक धर्मावरहि त्याचा परिणाम होऊं लागला. हें चातुर्वर्ण्याचें उन्मूलन, तत्त्वज्ञानासंबंधानें अनिश्चिय व वृथा आचार, हीं या धर्माचा आर्यावर्तांत अखेर नाश करण्यास जशीं कारण झालीं तशींच प्रथम त्याचा उत्कर्ष होण्यासहि बरींचशीं कारण झालीं आहेत. गौतमबुद्धाच्या काळीं ज्यांस वैदिक धर्माची ओळखहि नाहीं अशा चातुर्वर्ण्यबाह्य लोकांचीच आर्यावर्तांत बरीच संख्या असल्यानें त्यांच्यांतच या धर्माचा विशेष प्रसार झालेला होता. (बौद्ध मतांचा प्रसार नीचवर्णांत अधिक झाला होता असें सर्व तज्ज्ञांचें मत आहे.) तशांत गौतमबुद्धानें आपले मताचा जो उपदेश केला तो सामान्य जनतेस सहज पटेल अशा शब्दांत व नित्याचे विचारांत केला होता. यास प्रत्यंतर पुरावा असा आहे कीं, ज्या देशांत चातुर्वर्ण्यसंस्था प्रचलित नाहीं म्हणजे वैदिक धर्माची ज्या देशांत ओळखहि नाहीं अशाच देशांत या मताचा उत्कर्ष राहिला आहे, आणि उलट त्याचें जन्मस्थान जो हा आर्यावर्त तेथून मात्र त्याचें बहुतेक उच्चाटन झालेलें आहे. जे चातुर्वर्ण्यबाह्य होते त्यांच्यांत जसा या मताचा प्रसार झाला तसा कदाचित् कांहीं थोड्या वैदिक धर्मानुयायांतहि झाला असणें असंभवनीय नाहीं.

या मताचा प्रथम उत्कर्ष होण्यास दुसरेंहि एक कारण असें आहे कीं, गौतम हा राजवंशीय असल्यानें त्याचे जे इतर आप्त होते त्यांचा या मतास सहजच आश्रय मिळाला. तसेंच अशोकाच्या व कनिष्काच्या वेळींहि या मतास या सम्राटांनीं जो आश्रय दिला त्याच्या योगानें तर त्याच्या उत्कर्षाची पुढें सीमाच झाली; परंतु या मताचा प्रसार होण्यास सर्वांत अत्यंत महत्त्वाचें कारण म्हटलें म्हणजे गौतमबुद्धाचें स्वतःचें अत्यंत शुद्धाचरण हें होय. मूळांत कांहीं नसूनहि केवळ एका व्यक्तीच्या शुद्धाचारविचाराच्या उत्कटतेचा समाजावर केवढा मोठा परिणाम घडतो याचें हें प्रत्यक्ष उदाहरण आहे. या बौद्ध मताच्या मूळाशीं विशेष कांहीं नव्हतें, असें म्हणण्यास आधार म्हटला म्हणजे गौतमबुद्धानंतर त्या धर्माची झालेली स्थिति हा होय. वर

दर्शविलेले अशोक व कनिष्क यांची जोपासना व आश्रय जर या मतास नसतीं तर आतां झाला यापूर्वीच या मताचा आमच्या आर्यावर्तांत बहुधा नाश झाला असता. गौतमबुद्ध निर्वाण पावल्यानंतर या दर्शनाची कशी अवस्था झाली हें दर्शविणाऱ्या कांहीं आख्यायिका याच दर्शनाच्या धर्मग्रंथांत दिलेल्या आहेत, त्या येथें देतों.

सद्यःसुख सोडून इंद्रियांचें दमन करण्यास अवश्य असें जें आचाराचें तप तें सहन करण्यास मूळाशीं आत्यंतिक सुखाची अथवा अशीच कांहीं इतर प्रिय अशी कल्पना सामान्यजनास असणें अवश्य आहे. तशी या बौद्ध धर्मांत नसल्यानें बुद्धाच्या निर्वाणानंतरच आचाराच्या प्रखरतेस कंटाळलेला गौतमाचा खुद्द शिष्य सौभद्द "बरें झालें, गौतमापासून आम्ही सुटलों; अमुक करा, अमुक करूं नका असा त्याचा आम्हांस अत्यंत त्रास असे" असे उद्गार काढतो. यावरून गौतमाचे ह्यातींतच त्याच्या शिष्यांचे मनोवृत्तीची कल्पना सहज होते.

या दर्शनाची सर्व भिस्त आचारावरच होती; आणि संन्यस्तास लागणारी चित्तशुद्धि बाह्यत: अदृश्य असल्यामुळें, खरा संन्यस्त कोण व खोटा कोण, हें समजण्यास मार्ग नसल्यानें गौतमानंतर या मताचा स्वीकार करणें हें एक उपजीविकेचें सुलभ साधनच झालें होतें असें दिसतें. यास प्रमाण म्हणून एक आख्यायिका दिलेली आहे, ती अशी:—

उपाली म्हणून एक मुलगा होता. त्याचे आईबापास एकदां अशी चिंता पडली कीं, त्यास उपजीविकेचें कोणतें साधन उपलब्ध करून द्यावें? त्यास लेखक करावें तर त्याचीं बोटें दुखतात; गणित शिकवावें तर त्याचें मन दुर्बळ आहे; सराफी शिकवावी तर त्याचे डोळे खराब होण्याचा संभव आहे; तेव्हां कांहींएक दुःख न सोसतां उपजीविकेचा अगदीं सोपा मार्ग म्हटला म्हणजे त्यास बौद्धभिक्षु करणें हा होय!

वरील आख्यायिकेवरून या संघांत आळशास कसा सहज प्रवेश करितां येत होता हें दिसतें. आणि म्हणूनच मातापितरांची आज्ञा न घेतां मुलांस संघांत प्रवेश करितां येऊं नये असा एक नियम पुढें केलेला आढळतो.

राजा बिंबसार यानें आपल्या राज्यवटींत अशी एक आज्ञा केली होती कीं, शाक्यपुत्र गौतमाचे दर्शनानुयायी जे कोणी भिक्षु असतील त्यांस राजपुरुषापासून कोणत्याहि प्रकारचा उपद्रव होऊं नये. या आज्ञेचा फायदा बऱ्याचशा चौर्यकर्म करणारांनीं घेतला असा उल्लेख सांपडतो. (मृच्छकटिकांतील भिक्षु झालेल्या द्यूतकाराची येथें आठवण होते).

अशोकाच्या वेळींहि गौतमाच्या धर्माज्ञेचें पाळण योग्य रीतीनें होत होतें कीं नाहीं हें पहाण्यास, त्यास स्वतन्त्र व गुप्त राज्याधिकाऱ्यांची योजना करावी लागली आहे, यावरून त्या संघांची किंवा धर्माची प्रथमापासूनच कशी स्थिति होत गेली असली पाहिजे याची कल्पना सहज करतां येण्यासारखी आहे. तसेंच गौतमाच्या निर्वाणानंतर वेळोवेळीं भरवाव्या लागणाऱ्या धर्मपरिषदांवरूनहि मतांचें अस्थैर्य दृष्टोत्पत्तीस येतें. त्यांतहि मठसंस्था उत्पन्न झाल्याकारणानें दंभाचा दिवसेंदिवस अतिरेक होत चालला होता, असें हेमचंद्रसूरीच्या कुमारपालचरितावरून स्पष्ट होतें.

या वरील विवेचनावरून हें सहजच लक्षांत येतें कीं, बौद्ध धर्मांत मिथ्याचाराचा म्हणजे दंभाचा अत्यन्त प्रसार झाला होता. जेथें दंभ उत्पन्न होतो तेथें बाह्य शोभा आणि बाह्य आचार इकडेच प्रवृत्ति अधिक असते; प्रतिस्पर्धीमताचा असा उत्कर्ष झाल्यामुळें वैदिक अथवा हिंदु धर्म यांचें अस्तित्वाबद्दल (राजाश्रय नसल्यानें) संशय उत्पन्न होणें साहजिक होतें. तत्त्वज्ञान कितीहि अप्रतिम असलें तरी, कोणत्याहि धर्माची स्थिति ही विशेषतः सामान्य समाजावर अवलंबून असल्यामुळें व सामान्य समाजाची प्रवृत्ति तत्त्वज्ञानापेक्षां आचाराकडेच जास्त असल्याकारणानें, बौद्ध धर्माच्या संसर्गानें वैदिक अथवा हिंदु धर्मांतहि आचाराचें प्राबल्य होऊं लागलें असल्यास नवल नाहीं. मंत्रतंत्र व अभिचार इत्यादि आचारांचीं बीजें तर अथर्ववेदापासूनच होतीं; परंतु या बौद्ध धर्माच्या उत्कर्षकाळीं व अपकर्षकाळींहि केवळ अहमहमिकेनें व स्वतःच्या स्थितीकरितां म्हणून तरी या मन्त्रतन्त्रअभिचारांचा हिंदु धर्मांत विस्तृत प्रमाणावर प्रचार होऊं लागणें असंभवनीय नव्हतें.

गौतमबुद्धाच्या उत्कर्षाचे वेळीं किंवा किंचित् त्यामागून हिंदु धर्मांत

उपासनाप्रधान म्हणजे आचारप्रधान वैष्णव व शैव पंथांची प्राणप्रतिष्ठा झाली; व तेथपासून आचारप्रवणतेस भर येत चालला. तशांत तत्त्वज्ञानाचें विवेचन संस्कृत ग्रंथांत केलें असल्याकारणानें व समाजांतील फारच थोड्या भागास संस्कृत अवगत असल्यानें बहुजनसमाज आचारशीलच बनणें सहज होतें; तत्त्वज्ञान समजण्यास स्वतःचे बौद्धिक परिश्रम लागतात; तसें आचारांचें नाहीं. आचारांस नुसतें अनुकरणहि पुरतें आणि म्हणून उपासनेचे ग्रंथ किंवा आचार घालून देणारे ग्रंथ, संस्कृतग्रथित असले तरी त्यांचा बोध स्वतःस होण्याची अवश्यकता नसल्याकारणानें संस्कृताचें अज्ञान आचारप्रवृत्तीच्या आड येणें शक्य नव्हतें.

वर दिलेल्या वैष्णव व शैव संप्रदायांचे पुढें झालेले भिन्न भिन्न संप्रदाय लक्षांत घेतले म्हणजे आचाराचा एकंदर जनतेवर केवढा परिणाम झाला होता याची सहज कल्पना होते.

धर्मकल्पनेची इकडे ही अशी स्थिति असतां तत्कालिन राजकीय व सांपत्तिक स्थितिहि तीस परिपोषक अशीच झालेली होती. शकासारखे परकीय व कदाचित् परधर्मीय राजे इकडे येऊन जरी त्यांनीं येथें राज्यें स्थापिलीं तरी बौद्ध, जैन अथवा हिंदु धर्म यांपैकीं कोणत्या तरी एका धर्माचा त्यांनीं स्वीकार केलेला असल्यानें, आपापल्या मनोवृत्तीनुरूप या तिघांपैकीं कोणत्याना कोणत्या तरी एका धर्मास राजाश्रय मिळून त्याची भरभराट होत असे; या राजांचे राजवटींत तदितर धर्मांचा छल जरी क्वचितच झालेला आहे, तरी भिन्न धर्मांचा जनतेवर व परस्परांवर परिणाम होण्याचें चुकलें नसेल. पांचवे सहावे शतकाचे सुमारास संस्कृताचें व त्याबरोबरच हिंदु धर्माचें (म्हणजे वस्तुतः तत्त्वज्ञानाचें) पुनरुज्जीवन झालें. त्या कालानंतर झालेल्या राजांपैकीं कित्येकांनीं स्वतःस “ महाभागवत ” असें उपपद धारण करण्यांत भूषण मानलेलें आहे. ‘ भागवतधर्म ’ म्हणजे उपासनासंप्रदाय, यांत द्वैत प्रतिपादन केलें असल्यानें उपासनेवरच मोठी भिस्त असते; यावरून एक गोष्ट लक्षांत येते ती ही कीं, हिंदु धर्माच्या पुनरुज्जीवनाच्या वेळीं सुद्धां आचाराचेंच प्राबल्य होतें. स्वराज्य असल्याकारणानें स्वास्थ्य व संपत्ति यांचा त्या वेळींच अतिरेक

झालेला होता असें इतिहास साक्ष देत आहे. जेथें संपत्ति व स्वास्थ्य यांचा अतिरेक होतो व उच्चतर ध्येय पुढें नसतें, तेथें मनाच्या दुर्बलतेस सहजच प्रारंभ होतो; आणि एकदां मनास दुर्बलता आली म्हणजे वैय्यक्तिक व राष्ट्रीय दुर्गुणांचें तें माहेरघरच बनतें. अशा वेळीं या दुर्बल झालेल्या राष्ट्रीय मनास लपण्यास आणखी एक साधन त्या वेळीं मिळालें तें असें. मोक्षास साधन ज्ञान हें आहे आणि ज्ञान्यास स्वकर्म नाहीं, असलें सर्वोत्कृष्ट व उच्चतम प्रमेय दांभिकांस आणि आळशांस लपण्यास फार सोईचें होतें. आमचे समाजांत आचारप्राचुर्य आधींच झालेलें होतें; व संपत्ति, अधिकार आणि स्वास्थ्य यांचे योगानें मनाचा कणखरपणा जाऊन तपाचा लोपहि आधीं झालेला होता. तेव्हां बाह्य चिन्हांनीं ओळखण्यास अशक्य असें जें ज्ञान त्याचें सोंग घेऊन, कर्माचें कष्टाचरण ज्ञानी म्हणून सोडून देणें दांभिकांस व आळशांस फारच सुकर झालें; आणि अशा तऱ्हेनें ज्ञानी आणि अज्ञानी यांच्यांत भेद न राहिल्यानें "स्वधर्म" अथवा "स्वकर्म" याची ओळख आमच्या समाजांतून पार बुजून गेली.

आधींच आळशी । वरि गुरूचा उपदेशी ॥
मग त्या कैचि आडकाठी । विधिनिषेधाची भेटी ॥
नाचरवे धर्म । न करवे विधिकर्म ॥
तुका म्हणे ते गाढव । मनासवें घेती धांव ॥ १×१२५

स्वकर्माचा कंटाळा आपल्या या समाजांत किती आला होता याचें आणखीहि दर्शक म्हणजे अकरावे शतकाच्या सुमारास आणि तदनंतर लौकरच वीरशैव म्हणजे लिंगाईत व महानुभाव म्हणजे मानभाव यांचा इकडे झालेला उद्भव होय. चातुर्वर्ण्यास कंटाळलेले, स्वकर्म करण्याची अंगीं धमक नसलेले, आणि ब्राह्मणादि उच्च वर्णांचा द्वेष मनांत बाळगणारे अशा पुरुषांनीं या दोन मतांची स्थापना केलेली आहे. बौद्ध मताच्या उत्पत्तीच्या कारणांत व या वर दिलेल्या दोन मतांच्या उत्पत्तीच्या कारणांत बरेंच साम्य आहे.

तसेंच संन्यास हा आश्रमानुरूप न घेतां बौद्ध मताप्रमाणेंच यांतहि आरंभींच विहित केलेला आहे. इतकेंच कीं, मानभाव या आश्रमास स्पष्ट संन्यास म्हणतात, त्यासच लिंगाइत दीक्षा असें म्हणतात; परंतु या दोन मतांचा जो इतिहास आहे त्यांत एक गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, लिंगाइतांचा धर्मपोषक जो बसव, तो जितका दुर्वृत्त होता तितकाच अथवा त्याहूनहि अधिक गौतम हा सच्छील आणि सदाचारी होता. तसेंच मानभावपंथांतील कांहीं आचार जितके दुराचाराचे भासतात, तितकेच बौद्ध मतांतील आचार त्या धर्माचे प्रसाराचे प्रारंभीं सदाचाराचे कोटींत जाणारे होते. असें असूनहि या दोन्ही मतांचा या महाराष्ट्रांत इतका प्रसार झाला ही एकच गोष्ट त्या महाराष्ट्राचें झालेलें धार्मिकदृष्ट्या पतन व त्याच्या मनाची दुर्बलता दाखविण्यास पुरेशी आहे. यापेक्षां या बाबतींत जास्त लिहून मनास उदासीनता आणणें इष्ट नाहीं म्हणून येथेंच थांबतों.

बौद्ध मताच्या प्रसारानंतर हिंदु धर्मास जरी ग्लानि आली होती तरी ११ वे शतकापावेतों तिचा कायमचा फायदा घेणारा धर्मशत्रु कोणी उत्पन्न झाला नव्हता. परंतु दुर्दैवानें अथवा सुदैवानें म्हणा तो ११ वे शतकांत म्हणजे संतांचे अवतार होण्यापूर्वी सुमारें एक शतक आर्यावर्तात उत्पन्न झाला. हें परधर्माचें संकट आमचा धर्म व आमचा समाज यांचेवर सारखेंच आलेलें होतें. याचे योगानें नर्मदाउत्तरतीरीं जो धर्माचा उच्छेद झाला होता, त्याचीं अभ्रें आमच्या या महाराष्ट्रावर पडतात न पडतात तोंच संतांचा अवतार झाला.

शक ११०० ते शक १७४० पावेतों जवळजवळ ७०० महाराष्ट्रीय संतकवि झाले आहेत, आणि या सर्वांनीं धर्मोज्जीवनाचें कार्य उपदेशरूपी काव्यांनीं केलें आहे. 'कवि' शब्दाची व्याख्या आमच्या संतांनीं केलेली आहे—

वेदशास्त्रांचा मथितार्थ । आला करतळामळकवत् ॥
तैसा च प्रज्ञानंदें डुल्लत । कावे निश्चित या नांव ॥ ११×१०×१०
कवि वैराग्याचें संरक्षण । कवि भक्तांचें भूषण ॥
नाना स्वधर्मरक्षण । ते हे कवि ॥ १×७×१२ ॥

तिचा विचार केला व कवित्वाची—

> जेणें ज्ञान हें प्रबळे । जेणें वृत्ति हे मावळे ॥
> जेणें भक्तिमार्ग कळे । या नांव कवित्व ॥ १४×५९

ही जी व्याख्या दिली आहे, तिचा विचार केला म्हणजे यांस 'कवि' आणि त्यांच्या कृतीस 'काव्य' म्हणण्यास हरकत नाहीं. यांच्या

काव्यांचें स्वरूप

असें आहे कीं, स्वतःचें ऐहिक कल्याण चित्तांत बाळगून त्यांनीं आपल्या बुद्धीचा व्यय काव्यांत कधींच केलेला नाहीं. कविता ही उपजीविकेचें साधन आहे अथवा लोकेषणेची एक पायरी आहे असला ग्राम्य विचार यांचे मनास कधींच शिवला नाहीं. केव्हां केव्हां स्वतःच्या निर्गुणउपासनेच्या गाढ प्रेमांत रंगून जाऊन, तर केव्हां सगुणचरित्राच्या वर्णनांत दंग होऊन सहजस्फूर्तीनें त्यांच्या मुखावाटे जे उद्गार निघाले तें हें काव्य होय. क्वचित् प्रसंगीं वृत्तीवर येऊन आत्मिक कल्याणापासून दूरतर जाणारी ही जनता पाहून कळवळलेल्या मृदु अंतःकरणानें तीस केलेला उपदेश ही त्या विश्वात्मक प्रभूची त्यांनीं केलेली सेवा होय. उपास्य देवतेची अथवा विश्वात्मक प्रभूची सेवा हा एकच विषय संतांचे मनास व बुद्धीस असल्याकारणानें त्यांचें सर्व काव्य एकाच स्वरूपाचें झालेलें आहे. हा दोष नव्हे, गुण आहे. जेथें मनोरंजन हा हेतुच नाहीं तेथें विविधतेची अवश्यकता भासत नाहीं. श्रीज्ञानेश्वर, एकनाथ, समर्थ, मुक्तेश्वर, वामन अथवा मोरोपंत यांच्यासारखे प्रतिभासंपन्न कवि क्वचितच आढळतात. शब्दचमत्कृति आणि ध्वनि अथवा भाषा आणि रस हीं त्यांचेपुढें हात जोडून तयार असतात असें त्यांच्या ग्रंथांवरून स्पष्ट होत आहे. असें असूनहि त्यांनीं आपल्या मनाचे कोड व बुद्धीचे विलास परमात्म्याचे सगुणनिर्गुण गुण गाण्यांतच पुरविले याचें कारण, त्यांच्या कविताशक्तीस दुसरे विषय नव्हते असें नव्हे, तर त्यांचे मनास व बुद्धीस दुसरा विषय नव्हता.

> ऐसा भगवंतीं रंगला । आणीक कांहीं न रुगे त्याला ।
> स्वइच्छा वर्णुं लागला । ध्यान कीर्ति प्रताप ॥ दास. १४×३

फार काय सांगावें ! परंतु रसकल्लोळ, शृंगारतरंगिणी, कामिनीसंग यांचे कर्ते अनुक्रमें शिवराम, वेणाराम व लक्ष्मी, या ग्रंथकारांनीं आपापलीं काव्यें लिहिण्याचा आपला जो उद्देश दिला आहे तो असा कीं, हीं काव्यें वाचून विषय बाह्यतः कितीहि गोड वाटला तरी तो आत्यंतिक सुख देणारा नाहीं असें मनास पटून वैराग्याची उत्पत्ति व्हावी. सारांश, मणि भिन्न असले तरी जसें एकच सूत्र त्यांतून ओंवलेलें असतें तसें शब्द व विचार आणि क्वचित् प्रसंगीं विषयहि भिन्न असले तरी " पुढीलांचे सुख—उन्नति " प्रीत्यर्थ विश्वात्मक प्रभूची सेवा हा एकच विषय या संतांचे बुद्धीस होता.

परोपकाराकारणें । कवित्व अगत्य करणें ॥ दास. १४×३.

यांचे काव्यग्रंथांचा साकल्यानें विचार केला तर असें दिसून येईल कीं, एका विशिष्ट कालापावेतों तरी ज्ञान व उपासना म्हणजे विचार व विकार यांचे ओघ सारखे वहात होते. आणि त्या विशिष्ट कालानंतर म्हणजे इष्ट स्थिति प्राप्त झाल्यानंतर बुद्धीस मागें सारून मन हें पुढें सरसावलें, म्हणजे ज्ञानापेक्षां उपासना या ग्रंथांत जास्त दृग्गोचर होऊं लागली. हें जें वैचित्र्य दिसून येतें तें अहेतुक खास नव्हतें. कारण, कोणत्याहि एका समाजाच्या विशिष्ट कालीं ज्या उत्कट आकांक्षा असतात त्यांचे त्या त्या कालीं उत्पन्न होणाऱ्या वाङ्मयांत प्रतिबिंब पडलेंच पाहिजे असा नियम आहे, आणि या नियमास अनुसरूनच ज्ञानाचें अत्युच्च तत्त्व जें नैष्कर्म्य त्याचें श्रीज्ञानेश्वरांपासून तों समर्थापर्यंत प्रतिपादन केलेलें आहे. कारण, हें नैष्कर्म्य स्वधर्माची ओळख बुजालेल्या महाराष्ट्रास त्या वेळीं अत्यंत अवश्यक होतें. तसेंच श्रीपुंडलिकापासून अथवा नामदेवापासून तों तुकारामापावेतों आचारदृष्टीनें पतित झालेल्या महाराष्ट्राच्या दंभमत्सरादि मनोविकारांवर आघात केलेले आहेत. या

दोन ओघांचे

चालकांपैकीं एकाचे श्रीज्ञानेश्वरमहाराज हे विशेषतः निर्गुणोपासक शैव, व दुसऱ्याचे नामदेव हे सगुणोपासक वैष्णव होते. एकनाथांनीं या दोन

सगुणनिर्गुणांचें एकीकरण करून उपासना व ज्ञान यांचा समतोलपणा कायम ठेविला; आणि याचा उत्कर्ष श्रीसमर्थांनीं केला. अशा रीतीनें ज्या इष्ट-सिद्धीकरितां नैष्कर्म्य अवश्यक होतें त्याचें प्रतिपादन येथें संपलें. श्रीसमर्थां-नंतर जे ग्रंथ झाले त्यांतील बहुतकांचा भर सगुणोपासनेवर होता.

वरील विवेचन करीत असतां शैव व वैष्णव संप्रदायांचा आम्हीं सहज उल्लेख केलेला आहे. या संप्रदायांचें विवेचन अप्रांसगिक नसल्यानें थोड-क्यांत करणें इष्ट आहे. तें करण्यापूर्वी प्रथमच एक गोष्ट सांगून ठेवणें जरूर आहे कीं, उत्तरेकडे अथवा दक्षिणेकडे या शैववैष्णव मतांत जितका भेद स्पष्ट दिसतो तितका तो आमचे महाराष्ट्रांतील संतमंडळींत दृग्गोचर होत नाहीं. तसेंच शैवांच्या कापालिक अथवा कालमुख आणि वैष्णवांच्या वल्लभी अथवा राधाकृष्ण पंथाप्रमाणें बिभत्स व अश्लील मतांचाहि प्रवेश झालेला नाहीं.

महाराष्ट्रीय वैष्णवसंत

हे केवळ सगुणोपासकच नसून त्यांची बुद्धि सगुणाचे पलीकडे निर्गुणापर्यंत गेलेली होती. रामानुजांच्या चतुर्व्यूहाचा नामनिर्देश क्वचित् एकाद्या अभं-गांत आलेला असला तरी तो अपवादात्मक गणला जावा अशा स्वरूपाचा आहे. वल्लभाच्या मताचा अति शुद्ध असा रुक्मिणीपांडुरंगसंबंधरूपी (राधाकृष्ण नव्हे) परिणाम कांहीं विराण्याच्या अभंगांमध्यें दृग्गोचर होतो. याखेरीज केवळ सगुणप्रेमावांचून वैष्णव मताची दुसरी खूण इकडे दिसत नाहीं. शैव मताचेंहि तसेंच आहे; परंतु या मतासंबधानें थोडासा विस्तार-पूर्वक विचार करूं.

आज उपलब्ध असलेल्या ग्रंथांवरून नैष्कर्म्याचें प्रतिपादन श्रीसमर्थां-पावेतों सर्व संतमंडळींनीं जें कमीअधिक प्रमाणांत केलेलें आहे त्या ज्ञानाच्या उगमाचा अग्रमान परिणामाच्या दृष्टीनें श्रीज्ञानेश्वरमहाराजांकडे येतो. श्रीज्ञा-नेश्वर हे नाथपंथी होते, असें त्यांच्या परंपरेवरून स्पष्ट दिसत आहे.

आम्ही एक दीन । आणा नाथपंथी ।
मीचाहूनी आथी । अति नीच ॥

असें त्यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे. हा नाथपंथ म्हणजे ज्याची परंपरा

आदिनाथापासून सुरू झालेली आहे, तो शैव होता कां वैष्णव होता याचा थोडक्यांत निर्णय करणें जरूर आहे.

श्रीशंकराचार्यांच्या परंपरेंतील वासुदेव नांवाच्या एका कवीचा 'उपदेश-सार' म्हणून अष्टप्रकरणात्मक एक ग्रंथ उपलब्ध झालेला आहे. त्याचे शेवटीं आपल्या स्वतःच्या नाथपंथास उद्देशून तो असें लिहितोः—

> ये लोकरूढीस्तव शिष्यजन । हा नाथसंप्रदाय म्हणोन ।
> गुरुनामीं नामाभिधान । आवडीनें योजितो ॥
> परि हा भागवतसंप्रदाय । परंपरा श्रीनारायण ॥

वासुदेवांचा नाथसंप्रदाय असूनहि त्यास ते भागवत संप्रदाय म्हणतात असें येथें स्पष्ट होत आहे. एवढ्यावरून कदाचित् कोणास अशी शंका येईल कीं, भागवत संप्रदाय म्हणजे वैष्णवसंप्रदाय आणि म्हणून नाथसंप्रदाय हा वैष्णवसंप्रदाय आहे; परंतु ही चूक आहे. भागवतसंप्रदाय जसा वैष्णव होता तसाच शैवहि होता. वैष्णवभागवत व शैवभागवत (स्मार्त) असे म्हणण्याचा प्रघात असे. या संप्रदायांस 'भागवत' हें उपपद लावण्याचें मुख्य कारण असें कीं, ते दोन्ही द्वैतप्रतिपादक असून उपासनात्मक होते; म्हणजे 'भागवत' हा शब्द उपासनादर्शक आहे. यावरून केवळ 'भागवत' या शब्दानें विशिष्ट संप्रदाय, शैव किंवा वैष्णव आहे याचा खुलासा होत नाहीं. श्रीशंकराचार्यांच्या संप्रदायास जरी नाथसंप्रदाय म्हटला आहे तरी त्याची परंपरा आदिनारायणापासून असल्याकारणानें त्यांस 'वैष्णवभागवत' म्हणतां येईल. श्रीज्ञानेश्वरांच्या संप्रदायाचें तसें नाहीं; हा नाथसंप्रदाय आदिनाथापासून परंपरागत आल्यानें हा शैवच आहे असें निश्चित होतें. दुसरें असें कीं, या परंपरेंतील श्रीगोरक्षनाथ अथवा श्रीनिवृत्तिनाथ यांच्या वेषांचें म्हणजे संप्रदायचिन्हांचें जें वर्णन उपलब्ध आहे तसें वर्णन वैष्णवसंप्रदायांत असलेलें उपलब्ध होत नाहीं इतकेंच नाहीं, परंतु नाथसंप्रदायांतील जटाभार, भस्मोद्धूलन, कौपीन, सेली, शिंगी, पुंगी, कंथा, झोळी आणि त्रिशूळ हीं चिन्हें वैष्णवसंप्रदायांत असणें अशक्य आहे. परंतु कदाचित् कोणी अशी शंका काढील कीं शैव व वैष्णव हे दोन्ही संप्रदाय द्वैतप्रतिपादक असून

उपासनाप्रधान आहेत असें वर आलेलें आहे, आणि श्रीज्ञानेश्वर तर अद्वैतवादी होते; मग ते शैव कसे ?

या प्रश्नाचें उत्तर हा एक मोठाच पुरावा श्रीज्ञानेश्वर हे शैव होते हें प्रस्थापित करणारा आहे. कसें तें पहा. श्रीज्ञानेश्वरांनीं आपल्या "श्रीअनुभवामृत" नामक स्वतंत्र ग्रंथांत ज्ञान, अज्ञान व जीवनमुक्ति यांचें खण्डन केलें आहे. अज्ञानाचें खण्डन केलें असल्याकारणानें मायेचें खण्डन सहजच झालें; म्हणजे श्रीशंकराचार्यांचा विवर्त अथवा माया वाद श्रीज्ञानेश्वरांस संमत नाहीं हें उघड होत आहे. तसेंच सहजावस्था हीच जीवन्मुक्ति असें त्यांनीं प्रतिपादन केलें असल्याकारणानें ते पूर्ण अद्वैती आहेत.

> जाली स्वइच्छाचि विधि । स्वैर झाला समाधी ।
> दशे ये मोक्षसिद्धी । वैसों धापे ॥ ९×३४
>
> जाला देवाचि भक्तु । ठावोचि जाला पंथु ।
> होउनि ठेला एकांतु । विश्व चि हे ॥ ९×३५
>
> ना समोर दिसे शिवु हि । परि देखिले कांहीं नाहीं ।
> देवभक्तां दोहिं । एकीच पाडु ॥ ९×५६

तेव्हां श्रीज्ञानेश्वर पूर्ण अद्वैतवादी असून, उपादानावांचून जगाची उत्पत्ति झाली असें त्यांचें मत होतें; तसेंच मायाभ्रम अथवा विवर्तवाद (उपादान नसल्यानें) त्यांस संमत नव्हता इतकें स्पष्ट होत आहे.

अगदीं हेंच मत शैव संप्रदायांत शक ७०० चे सुमारास काश्मीरांत प्रतिपादन केलें गेलें आहे. वसुगुप्त व त्यांचे शिष्य कल्लट आणि सोमानन्द व त्यांचे शिष्य उदयाकर यांनीं काश्मीरांत अद्वैत शैवमताचा प्रसार केला आहे. या अद्वैत संप्रदायाचें मत श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या मताशीं अत्यंत अभिन्न आहे असें वसुगुप्ताच्या खालीं दिलेल्या अनुष्टुपावरून स्पष्ट होईल.

> निरुपादानसंभारमभित्तावेव तन्वते ।
> जगच्चित्रं नमस्तस्मै कलाश्लाघ्याय शूलिने ॥

" भितीवांचून जसें चित्र निर्माण करावें तसें उपादानावांचून जगत्

निर्माण करणाऱ्या शूलधारी शंभूस नमन असो.'' असा या अनुष्टुपाचा अर्थ आहे. या एका श्लोकांत श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या सर्व मताचें सार आलेलें आहे. तेव्हां या मतैक्यावरून तर श्रीज्ञानेश्वर हे अद्वैत शैवसंप्रदायी होते याबद्दल मुळींच संशय रहात नाहीं.

यावरून एक विचार सुचतो तो येथें नमूद करावासा वाटतो. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे गुरुपरंपरेंतील श्रीआदिनाथ सोडून दिले तर मत्स्येंद्र, गोरक्ष हे उत्तर हिंदुस्थानांतील होते अशी आख्यायिका आहे. तरी वर दिलेले **वसुगुप्त व सोमानंद** यांचे संप्रदायांचा काश्मीरांत विशेष शोध केल्यास आमच्या महाराष्ट्रीय नाथपंथाचा थोडा अधिक सुगावा लागण्याचा संभव आहे; असो.*

मागें सांगितल्याप्रमाणें उत्तरेकडे परधर्मीयांची जी वावटळ आली तिचा परिणाम काय झाला हें महाराष्ट्रीय संतांनीं प्रत्यक्ष पाहिलें असलें पाहिजे यांत संशय नाहीं. धर्माचे नांवाखालीं परकीयांनीं वैदिक अथवा हिंदु धर्माचा उच्छेद केला, 'तीर्थें क्षेत्रें भंगिलीं,' देवतांचा अपमान झाला, आणि असल्या या भयंकर संकटास तोंड देण्याची सामान्य जनतेची तयारी पाहिली तर ती मनाच्या दुर्बलतेनें ओजहीन व तपहीन झालेली, तिचे आश्रमधर्म सुटलेले, व केवळ आचारप्रवण आणि म्हणून परस्परमत्सरग्रस्त अशी; थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ती जनता आपल्या स्वकर्मास अथवा स्वधर्मास पराङ्मुख झालेली अशी आढळून आली असली पाहिजे. धर्माची व देशाची अशी दीन स्थिति पाहून श्रीमंतांनीं धर्माचें उज्जीवन करण्याचे हेतूनें जनतेच्या वैय्यक्तिक व राष्ट्रीय गुणास अवश्यक जें तेज व तप तें उत्पन्न

---

*वसुगुप्त व सोमानंद यांचे दोन भिन्न संप्रदाय डॉ० भांडारकर यांनीं वैष्णव व शैव संप्रदायांच्या पुस्तकांत दिले आहेत. त्यावरून साधारणत: या संप्रदायाचा जो काल दिसतो तो असा:—वसुगुप्त शक ७५० व त्याचा शिष्य कल्लट शक ८००. तसेंच सोमानंद याचा ८५०. त्याचा शिष्य उदयाकर ९०० व त्याचा शिष्य अभिनवगुप्त ९५०. या कालाशीं श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या गुरुपरंपरेंतील पुरुषांचा काळ ताडून पाहिला तर श्रीमत्स्येंद्र व गोरक्ष हे अभिनवगुप्त व कल्लट यांचे समकालीन असावेत असें दिसतें.

करण्याचा उपक्रम केला. या तेजास व तपास नैष्कर्म्यावांचून दुसरा आधार नाहीं. नैष्कर्म्याचा उपदेश करण्याचा आद्य मान परमेश्वरकृपेनें नाथपंथी श्रीज्ञानेश्वर किंवा श्रीमुकुंद यांजकडेस आला. ज्ञानकर्माचा समुच्चय कसा होतो, जाणीवभक्ति कोणती, संन्यास म्हणजे काय, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ज्ञान्याचें कर्म काय याचा उपदेश श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं केला. आणि वर सांगितल्याप्रमाणें त्याच तत्त्वाचा अनुवाद श्रीसमर्थापर्यंत इतर निर्गुणोपासकांनीं केलेला आहे. हेंच महत्कार्य श्रीतुकारामांपावेतों सुगम होण्यास सगुणोपासकांनींहि हातभार लावलेला आहे; कसा तें मराठी वाचकांस स्पष्ट करून सांगण्याची अवश्यकता नाहीं.

या तेजस्वी नैष्कर्म्यतत्त्वाच्या शिकवणीचा पुढें लवकरच काय परिणाम झाला त्याची साक्ष वर्णाश्रमांतील आजचें आमचें अस्तित्वच देत आहे; असो.

वरील विवेचनावरून नैष्कर्म्याची शिकवण ही संतांच्या अवताराचें रहस्य आहे असें सुज्ञ वाचकांच्या लक्षांत आलें असेलच. पुढील सर्व संतांनीं आद्य ग्रंथ जो श्रीज्ञानेश्वरी त्याचा आश्रय करूनच नैष्कर्म्याचें प्रतिपादन केलें असल्याकारणानें श्रीज्ञानेश्वरीचें त्या दृष्टीनें अवलोकन केलें म्हणजे इतर संतांच्या सर्व ग्रंथांचें अवलोकन केल्यासारखें होईल, ही भावना ठेवून आतां श्रीज्ञानेश्वरीकडे वळतों.

श्रीज्ञानेश्वरीरहस्य

तत्र को मोहः कः शोकः एकत्वमनुपश्यतः ॥ ईश. उ. ७

देखें प्राप्तार्थ आले । जे निष्कामता पातले ॥
तैयां हि कर्तृत्व असें उरलें । लोकांलागी ॥ श्रीज्ञा. ३×२९

विश्वांतील विविधत्वांत जो एकत्व पहातो त्याच्या शोकाचें व मोहाचें निरसन होतें ही भाषा बरोबर नाहीं. विश्वांत एकत्व पहाणारा हा दुसरा राहिलाच. मग एकत्व कोठचें ? स्वतःसकट विश्वांत एकच पहाणारा हा अर्थ खरोखर इष्ट आहे; परंतु शब्ददौर्बल्यानें तसा अर्थ शब्दानें व्यक्त करितां येत नाहीं. कारण, सर्वत्र 'एकच एक असल्यानें एकत्व म्हणण्यांत विशेष काय व पहावयाचें काय ? दोन अथवा अधिक असें कांहीं असेल तर त्याच्या सापेक्षानें एकत्वाची कल्पना व तिचा उच्चार. तसेंच स्वतःहून भिन्न अशी वस्तु असल्यास तेथें पहाण्याची क्रिया संभवते. एकच जेथें आहे तेथें पहाणारा कशास, पहाणारा कोण व पहाणें या क्रियेचा संभव तरी कसा ? तेव्हां एकत्व पहातां येत नाहीं. परंतु हा भाव व्यक्त करण्याची पात्रता शब्दांची नाहीं, म्हणून एकत्व पहाणें असा प्रयोग करणें भाग पडतें.

स्वतःसकट विश्वांत एकत्व पहाणारा यास 'ब्रह्म होतिया' म्हणजे ब्रह्म होऊं घातलेला, ब्रह्म होण्यास योग्य झालेला असें म्हणतात. त्यांत शांतीची भर पडली कीं तो ब्रह्म झाला.

हें तां भलेतेणें व्याजें । जो जेयातें म्हणे माझें ।
तें नेणवें चि मां दूजें । अद्वितीयू जाला ॥ १८×१०६८

ब्रह्म आणि ब्रह्म होतिये । योग्यते तैसा पाडु आहे ।
तें चि शांतीचेनि लाहे । होतें तोगा ॥ १८×१०८३

तसेंच एकत्व पहाणाराचा शोक, मोह जातो हें म्हणणेंहि बरोबर नाहीं.

एकत्व पहाणाराचे ठिकाणीं शोक, मोह असेल तर तो जावा; नसल्यास तर जावयाचें काय ? असो.

तेव्हां एकच वस्तु अखंडत्वानें स्फुरण पावणें म्हणजेच जर मोहनाश आहे तर विविधत्व अथवा द्वंद्व भासणें हा मोह आहे किंवा हें मोहाचें कार्य आहे हें उघड आहे. जेथें द्वंद्व आहे म्हणजे जेथें दोनपणा आहे तेथें सुखदुःख आहे. परंतु हें द्वंद्व स्वतः असत्य व विनाशी असल्यानें हें सुखदुःखहि विनाशी आहे व म्हणून तेथें शोकाची उत्पत्ति आहे. मोहाबरोबर द्वंद्व, द्वंद्वानें सुखदुःख व त्यामुळें शोक. तेव्हां मोह व शोक यांची जोडी अबाधित आहे. एकाचा नाश तोच दुसऱ्याचा नाश, एकाची उत्पत्ति तीच दुसऱ्याची.

आतां 'ब्रह्म होणें' म्हटलें म्हणजे तेथें पूर्वी 'नसणें' किंवा 'असून' हि कांहीं कारणानें 'नाहीं' अशी समजूत असणें या दोहोंपैकीं कोणती तरी एक स्थिति पाहिजे. यांपैकीं कोणतेंहि सत्य असलें तरी तेथें 'उद्यम' हा हवाच.

तैसा आत्मबोधीं उद्यमु । करितां होये जो भ्रमु ॥ १८×१०८८

आणि दुसराच पक्ष खरा असल्यानें या उद्यमांत व मोहांत नेहमीं भांडण असावयाचें. या उद्यमास 'स्वकर्माचरण' म्हणतां येईल.

कोणतेंहि स्वकर्म अथवा प्राप्तकर्म करण्यास उद्युक्त झालेला अथवा होणारा मनुष्य त्या कार्यापासून अथवा प्रवृत्तीपासून पराङ्मुख होण्यास, त्यास मोह हें एकच मोठें बलवत्तर कारण होतें. याचा पर्यायशब्द श्रीज्ञानेश्वरींत संशय म्हणून दिलेला आहे. जो मोह तोच संशय. हा मोह अज्ञानापासून होतो व तो विश्वासाचा नाश करतो.

जैं अज्ञानाचें गडदे पडे । तैं हा बहुवसु मनीं वाढे ।
म्हणौनि सर्वथा मार्गु मोडे । विश्वासाचा ॥ ४×२०३

असला हा मोह अथवा भ्रम ज्या वेळीं मनांत प्रथम उद्भवेल त्याच वेळीं सदसद्विवेकानें त्याचा जर नायनाट केला नाहीं, तर तो मनुष्याची बुद्धि व्यापून टाकतो, म्हणजे या मोहग्रस्त मनुष्याचा बुद्धिभेद होतो आणि

एकदां बुद्धिभेद झाला, म्हणजे त्यामागून नाश हा ठेवलेलाच असतो.

> हृदईं हा थि न समाए । आणि बुद्धितें गवसूनि ठाए ।
> तेथ संशयात्मक होए । लोकत्रय ॥ ४×२०४
> मग संशई जरि पडिला । तरि निभ्रांत जाणें नाशला ।
> तो अहिकाही परि मूकला । सुखासि गा ॥ ४×१९७

असल्या संशयी मनुष्यास परमार्थ तर साधत नाहींच; परंतु त्याचें ऐहिक सुखहि नाश पावतें. अंतर्यामीं प्रखर वैर ठेवणारा मित्र जसा अत्यंत भयंकर असतो, तसा हा विवेकाचें कातडें पांघरणारा मोहहि अत्यंत घातक असतो. उघड शत्रूपेक्षां हितशत्रु जास्त भयंकर. कारण, तेथें विश्वास उत्पन्न होतो व त्यामुळें प्रतिकाराची योजना होत नाहीं. असल्या या मोहामुळें हित तें अहित व अहित तें हित वाटूं लागतें; जें कर्म इंद्रियांस प्रिय तेंच बुद्धीसहि कल्याणकारक भासूं लागतें.

कर्म हें तात्कालिक सुख उत्पन्न करणारें म्हणजे प्रेय आणि आत्यंतिक सुख उत्पन्न करणारें म्हणजे श्रेय असें दोन प्रकारचें आहे. पहिल्या प्रकारचें कर्म मनादि इंद्रियांस व दुसऱ्या प्रकारचें कर्म सुबुद्धीस* प्रिय असतें. तेव्हां जें सुबुद्धीस पटतें तेंच मनासहि आवडणें हेंच मोहाचा नाश झाल्याचें लक्षण होय. मनुष्याचा सर्व प्रयत्न वरील लक्षण अंगीं बाणण्याकडे असावा; परंतु होतें काय कीं, वर सांगितलेला मोह बाह्येंद्रियांच्या द्वारें मनाचें आकलन करून मनाची व बुद्धीची फारकत करतो, आणि त्यामुळें प्रेय आणि श्रेय यांत भेद उत्पन्न होतो.

अशी ही मनाची व बुद्धीची फारकत कां व्हावी? श्रेय आणि प्रेय यांत भेद कां उत्पन्न व्हावा? नव्हे—हा मोहच कां पडावा? याचें उत्तर हेंच कीं, आपलें अज्ञान. परंतु अज्ञान म्हणजे तरी काय? अज्ञान म्हणजे इंद्रियांच्या स्वाधीन होणें. इंद्रियांच्या आवडीप्रमाणें मन वावरूं लागलें, मोकाट फिरूं लागलें व त्या सैरावैरा फिरणाऱ्या मनाच्या

---

* दुर्लभ हे सुबुद्धि । जया परमात्मा चि अवधि ॥ श्रीज्ञानेश्वर.

सल्ल्याप्रमाणें मनुष्याची कृति व्हावयास लागली म्हणजे तो मोहग्रस्त होऊं लागला असें खुशाल समजावें.

> येथ नेणावया हें चि कारण । जें इंद्रियां अधीनपण ।
> तिहिं आकळिजे अंतःकरण । म्हणौनि भ्रमें ॥ २×१११

या भ्रमलेल्या मनुष्यास—

> हा रातिदिवसु पाहिं । जैसा आत्यंधा ठाउवा नाहिं ।
> तैसें संशीया सत्य कांहीं । मना नै ये ॥ ४×२००

त्रिकालाबाधित जें सत्य त्याची, (जशी जन्मांधास रात्रिदिवसाची) प्रतीति होत नाहीं, त्याप्रमाणें इंद्रियांच्या अधीन झाल्यानें त्यांचेंच "म्हणितलें" केल्यानें म्हणजे त्यांच्या लालण्यानें हा मोह अथवा संशय उत्पन्न होतो, व तो उत्पन्न झाला कीं लागलीच वर दर्शविल्याप्रमाणें मन-बुद्धीची फारकत होते. असें झालें म्हणजे कर्तव्य कोणतें व अकर्तव्य कोणतें, काय करावें आणि काय न करावें, काय केलें असतां तें त्रिकालाबाधित सत्य प्राप्त होईल, व काय न केलें तर तें दूर पळेल, यासंबंधीचें त्या "संशैया" चें तारतम्यज्ञान नष्ट होऊन, इंद्रियांस आवडेल तें आणि त्यामुळें मनास भावेल तें व म्हणून भ्रष्ट झालेल्या बुद्धीस पटेल तें कर्म करण्यास तो उद्युक्त होतो. याप्रमाणें इंद्रियांस प्रिय वाटणाऱ्या कर्मांची कांस ज्यानें धरली त्यास मागें एकदां सांगितल्याप्रमाणें पारलौकिक—आत्यंतिक—सुख तर मिळतच नाहीं; पण ऐहिक—तात्कालिक—सुखाचाहि लाभ होत नाहीं.

> संसारबंधु आए । हें किर तेयाचें कें आहे ।
> परि तो इहिकीं न लाहे । विषय भोगूं ॥ १६×४४६
> तैसें विषयांचेनि कोडें । अंगें परत्रा केलें उबडें ।
> तंव तो चि आनि कडे । मरणें नेला ॥ १६×४४९
> एवं परत्र ना स्वर्गु । इहेक ना विषयभोगु ।
> तथ केउता प्रसंगु । मोक्षाचा तो ॥ १६×४५०

बरोबरच आहे; ज्याला ऐहिक धडपणें साधतां येत नाहीं त्यास पारलौकिक कोठचें आणि मग प्राप्तव्य जो मोक्ष तो स्वप्नांत तरी मिळावा कसा?

हा मोह तीन स्वरूपांचा आहे. काम, क्रोध व लोभ हींच त्याचीं तीन रूपें होत. मनुष्याच्या पारत्रिक अथवा ऐहिक कल्याणरूपी शरीरास हा त्रिदोषच जडला आहे असें म्हटलें असतां चालेल. या त्रिदोषानें मनुष्य, भूतानें झपाटलेल्या मनुष्याप्रमाणें स्वैराचार करूं लागतो, आणि अखेर आपला नाश करून घेतो.

कामक्रोधलोभाची कांस । न सोडी चि पालिली भास ।
स्वैराचाराचें असोस । रान रिगाला ॥ १६×४४५

तेव्हां असल्या या रसातळास नेऊन पोहोंचविणाऱ्या मोहाचें मुख्य कारण इंद्रियाधीनता हेंच आहे हें ठरलें.

इंद्रियें हीं बहिर्मुख असल्यानें—"पराञ्चि खानि व्यतृणत् स्वयंभूः" —तीं स्वभावतःच अभिमुख असलेल्या विषयांकडे धांव घेतात व त्यांचें ग्रहण करितात—

एथां विषयांवांचूनि कांहीं । आणिक सर्वथा रम्य नाहीं ।
ऐसा स्वभाउचि पाहीं । इंद्रियांचा ॥ २×१२०

या विषयसेवनाचे योगानें तात्कालिक सुखदुःख मनुष्यास प्राप्त होतें खरें; परंतु इंद्रियें व विषय हीं दोन्हीहि नाशवंत असल्याकारणानें, त्यांच्या संयोगापासून उत्पन्न होणारें सुखदुःखहि नाशवंतच असावयाचें. हा विचार इंद्रियाधीन होऊन विषयसेवन करणारांस पटत नाहीं.

इंद्रियें विषय सेविति । तेथ हर्ष शोक हे उपजति ।
ते आंतर आप्लविति । संगें एणें ॥ २×११२
जें एथां विषयांचा ठाईं । एकनिष्ठता नाहीं ।
एथ दुःख आणि कांहीं । सुख ही दीसे ॥ २×११६

असल्या या मृगजलाप्रमाणें भासणाऱ्या सुखदुःखास भुलून इंद्रियाधीन होऊन, स्वकर्माचा अथवा स्वधर्माचा नाश करून, मनुष्य ऐहिक आणि पारत्रिक कल्याणास मुकतो.

मोहास कारण इंद्रियांची स्वैरप्रवृत्ति ही आहे, व या प्रवृत्तीपासूनच सुखदुःखाचा उद्भव आहे हें जर खरें आहे, तर इंद्रियांची बाह्य प्रवृत्तिच

मुळीं कुंठित केली म्हणजे ही सर्व अनर्थपरंपरा नाहींशी होईल व आत्यंतिक सुखाचाहि लाभ होईल असें जर कदाचित् कोणास वाटेल तर ती त्याची चूक होईल. कारण, जोंपर्यंत सजीवता आहे तोंपर्यंत इंद्रियांची प्रवृत्ति समूळ कुंठित करणें शक्यच नाहीं; प्रवृत्ति समूळ कुंठित करणें म्हणजे शरीरास अक्रिय करणें होय; ही अक्रिय स्थिति मरणानंतर मात्र देहास शक्य आहे, येरवीं नाहीं. (मरणानंतरहि अशी अक्रिय स्थिति संभवनीय आहे कीं नाहीं हा सुद्धां एक प्रश्नच आहे. कारण, जिवंतपणीं घडणाऱ्या क्रियेचें सातत्य मरणानंतर संस्काररूपानें असूं शकेल).

तरि स्वभाव काइ निमाले । इंद्रियांचे ? ॥ ३×५४
सांघें श्रवणें आइकों ठेलें ? । किं नेत्रांचें तेज गेलें ? ।
हें नासारंध्र बुजालें । परिमलु नेघे ? ३×२५
कां प्राणापानगति । खलन आले इये मती ? ।
किं क्षुधातृषादि आर्ती । खुंटलिया ? ॥ ३×५६
हे स्वप्नावबोध ठेले । किं चरण चालों विसरले ।
हे असो काइ निमाले । जन्ममृत्यू ? ॥ ३×५७
हे न टके चि जरि पाइं । तरि सांडिलें एथ काई ।
म्हणौनि कर्मासि त्यागु नाहीं । प्रकृतिमंतां ॥ ३×५८

म्हणून इंद्रियें हीं स्वतःच्या सुखदुःखानुरोधानें विषयांकडे धांव घेणारच; आणि त्यांनीं विषयांकडे धांव घेतली म्हणजे मनुष्यास त्यापासून सुखदुःख होणारच; मग यास

उपाय काय ?

कारण, त्यावांचून मनुष्यास शांति कशी मिळावी ? ज्याला शांति मिळत नाहीं त्याला आत्यन्तिक सुखहि मिळत नाहीं.

देखें अग्निमाजि बापाति । तिये बीजें जरि विरूढती ।
तरि अशांता सुखप्राप्ति । घडों शके ॥ २×३५६

जळालेल्या बीजास जसा अंकूर फुटावयाचा नाहीं तसें अशान्तास सुख नाहीं. इंद्रियें तर अक्रिय करितां येत नाहींत; बरें त्यांची स्वैरप्रवृत्ति झाली

तर मोह उत्पन्न होतो; अशा अडचणींतून निभावून नेणारा एकच उपाय आहे.

पाण्याचा लोंढा—झोत--एकदम अडवूं म्हटलें तर तो अडविला जात नाहीं, व अडविला तर त्याच्या सैरावैरा वहाण्यानें आजूबाजूच्यांचा नाश होतो; म्हणून जे बुद्धिमान् आहेत ते असा त्याला विशिष्ट मार्गाला वळवून त्याच्या जोराचा व संचयाचा उपयोग करून घेतात, त्याप्रमाणें इंद्रियें हीं प्रवृत्तिशील असल्यामुळें त्यांची धांव एकाद्या विशिष्ट मार्गानें नेऊन त्याचेंचकडून जे धीमान् आहेत ते मोक्ष प्राप्त करून घेतात. आतां असला हा अत्यंतोपयोगी व नाशापासून बचावून प्राप्तव्य मिळवून देणारा उपाय कोणता म्हणाल तर

वेदप्रामाण्य

हा होय; म्हणजे स्वतःच्या मनाची प्रवृत्ति बाजूला सारून (कर्तव्य) कर्म कोणतें, अकर्म कोणतें व विकर्म कोणतें हें शास्त्रदृष्टया ठरवून, कर्तव्याकडे इंद्रियांची प्रवृत्ति करणें. यासच 'कर्मयोग' म्हटलेलें आहे, व यासच 'निःश्रेयसमार्ग' हि म्हटलेलें आहे. ज्यास म्हणून आपलें अंतिम कल्याण करून घ्यावयाचें असेल त्यानें प्रथम या कर्ममार्गाचें अवलंबन केलें पाहिजे; त्याचा अंतिम कल्याणाचा ओनामा या कर्ममार्गानेंच गिरविला गेला पाहिजे.

> याकारणें पैं बापा । जेया आपुली आथि कृपा ।
> तेणें वेदांचेया निरोपा । आन न कीजे ॥ १६×४५२

तसेंच—

> तैसा अशेषां पुरुषार्थी । जो गोसांवि हो म्हणे पार्थी ।
> तेणें श्रुति स्मृति माथा । वैसों वापे ॥ १६×४५६

कार्याकार्य यांची व्यवस्था एकदां शास्त्रदृष्टीनें लागली म्हणजे इंद्रियांच्या आवडीनिवडीकडे लक्ष न देतां, प्रत्येकानें तें व्यवस्था होऊन ठरलेलें कार्य आपलें स्वकर्म म्हणून केलेंच पाहिजे. सकृद्दर्शनीं ही वेदाज्ञा अथवा शास्त्राज्ञा अथवा प्राप्तकर्म कितीहि कष्टद अथवा अहितार्थ भासलें तरी त्यानेंच अव-

लंबन केलें पाहिजे. आपल्या मनोवृत्तीच्या लहरींशीं हें स्वकर्म सुसंगत असेल तर त्याचा स्वीकार करावयाचा; नसेल तर त्याचा त्याग करावयाचा; यांस वेदाज्ञापालन अथवा स्वकर्माचरण म्हणत नाहींत. तें स्वकर्माचरण आपल्या आवडीनिवडीवर ठेवणें म्हणजे आपण प्रत्यक्ष इंद्रियांच्या तावडींत जाण्यासारखेंच आहे, अथवा मोहानें अभिनिविष्ट होण्यासारखें आहे; आपला मुख्य उद्देश तर इंद्रियांचा स्वैराचार मोडून मोहाचा नाश करणें हा आहे; असें असतां स्वकर्म इंद्रियांच्याच प्रवृत्तिनिवृत्तीवर—आवडीनिवडीवर—अवलंबून ठेवणें म्हणजे आसन्नमरणास अमृत म्हणून विष पाजण्यासारखेंच आहे. सकृद्दर्शनीं स्वकर्म करणें अनुभवास अत्यंत दुष्कर असें भासेल; परंतु तेंच करणें व इंद्रियांकडून करविणें हेंच युक्त व इष्ट आहे.

शास्त्र म्हणील सांडावें । तें राज्य ही तृण मानावें ॥
जें घेयवि तें न मनावें । विष ही वीरूं ॥ १६×४५७

सर्व ऐहिक लाभांत श्रेष्ठ लाभ हा राज्यलाभ होय. तसेंच इहलोकीं मोठी हानि म्हणजे मृत्यु ही होय. मृत्यूहून अधिक मोठी हानि या लोकीं दुसरी नाहीं. असें असतांहि वेदाज्ञा पाळण्यांत म्हणजे स्वकर्म करण्यांत या दोहोंचा जरी विपर्यास होऊं लागला तरी ती पाळलीच पाहिजे.

हें स्वकर्म करीत असतां, हें स्वधर्माचरण हातानें घडत असतां पहिल्याप्रथम "इंद्रियांचा मार्ग मोडला जाणें" हें अवश्यक आहे. इंद्रियांस अप्रिय अशा वस्तूंचा अगर कृत्याचा अथवा स्थितीचा हें धर्माचरण करीत असतां आदर करावा लागेल. उलटपक्षीं प्रिय अशा वस्तूंचा अगर कृत्याचा अथवा स्थितीचा किंवा व्यक्तीचा त्याग करावा लागेल; पण तो करणें भाग आहे एवढेंच नव्हे, तर तो अंतःकरणापासून करणें भाग आहे. कारण, अशा प्रसंगीं जो त्याग अथवा जें ग्रहण करावयाचें तें जर बाह्यतः इंद्रियांनींच असेल व मनानें त्याचें उलट चिंतन होत असेल, तर तें स्वधर्माचरणास विरुद्ध होय. अशा कृत्याची गणना स्वधर्माचरणांत होत नाहीं. इंद्रियांना हट्टानें आवरून धरून त्यांच्या विषयांचें चिंतन मनांतून अहर्निश करणाऱ्याला 'मिथ्याचारी' म्हणतात. हा मिथ्याचारी मनुष्य विषयासक्तींतून केव्हांहि पार पडत नाहीं.

जरि हृदयीं विषयस्मृति । तरि निःसंगा ही आपजे संगति ।
विषयांचें ध्यान । जरि विषयें वाहे मन ॥ २×३२१
तरि एसणें हें पतन । गिवसीत पावे ॥ २×३३०

म्हणून—

विषय मावळे । सर्वथा मनौनि सांडावे ।
मग रागद्वेष स्वभावें । नाशतील ॥ २×३३१

विषयचिंतनानें काम—वासना—उत्पन्न होतो, अतृप्त वासनेपासून क्रोध येतो, त्या क्रोधाच्या योगानें मूढता येते, मूढतेनें स्मृतिभ्रंश होऊन बुद्धिनाश होतो व बुद्धिनाश झाला कीं मनुष्याचें पतन होतें. ही अनर्थपरंपरा एका मिथ्याचारापासून म्हणजे विषयासक्तीपासून उत्पन्न होते. एवढ्याकरितां ज्यास आपलें पतन टाळावयाचें असेल त्यानें आपलें स्वकर्माचरण इंद्रियदमनपूर्वक व मनापासून करावें.

स्वकर्म हाच स्वधर्म

होय. या स्वधर्मास निजधर्म—स्वकर्म—विहित कर्म—निजवृत्ति—स्वमार्ग असे पर्याय श्रीज्ञानेश्वरींत दिलेले आहेत.

तऱ्हीं स्वधर्मु एकु आहे । तो सर्वथा त्यजु नव्हे ॥ २×१८२
आपुला निजधर्मु तूं पाहिं ॥ २×१८६
तुज उचित होये आतां । स्वकर्म हें ॥ २×२६४
तरि दोषु न घडे स्वभावें ॥ २×२२९
न संडिजे तुवां आपुलें । विहित कर्म २×२६५
निजवृत्ति जेथ सांडे । तेथ स्वतंत्रते वास्ति न घडे ॥ ३×१११

हें स्वकर्मा—स्वधर्मा—चरण करीत असतां समविषमतेचा, योग्यायोग्यतेचा किंवा इष्टानिष्टतेचा असा कोणताहि विचार मनांत आणूं नये. शास्त्राज्ञेप्रमाणें (वर्णाश्रमाप्रमाणें) जें कर्म आपण करतों तें आपल्यास म्हणजे आपल्या इंद्रियांस प्रिय आहे कां अप्रिय आहे, त्यापासून सुखोत्पत्ति आहे कां दुःखोत्पत्ति आहे, तें पुण्यात्मक आहे कां पापात्मक आहे, आणि आपल्या हातून तें अशेष पार पडेल कीं नाहीं यांपैकीं कोणताहि विचार कार्यकारी मनुष्यानें स्वकर्म करितांना आपल्या मनांत आणूं नये.

जैं सुखालागि आपणपेयां । निंब चि धनंजया ।
तें कडुवटपण तेया । भोगिजे ना ॥ १८×९२०
स्वधर्मु सांकडु । देखौनि केला जरि कीडु ।
तरि मोक्षसुखाडु । अंतरला ॥ १८×९२२
पया स्वधर्मातें अनुष्ठितां । जरि वेचु होईल जीविता ।
तो ही नीका वर उभयता । दिसतसे ॥ ३×२२४
घाया चि व्याकुल काइ । आपुला निजधर्मु तूं पाहीं ।
जो आचरितां बाधु नाहीं । कव्हणा काळीं ॥ २×१८६
सुखि संतोषा नैयावें । दुःखि विषादा न भजावें ।
आणि लाभालाभ न धरावे । मनामाझि ॥ २×२२६
आचरतां सिद्धी गेलें । तरि काजा चि कीर आलें ।
परि ठेलेया हीं सगुण जालें । ऐसें चि मानी ॥ २×२७०

येथें एक गोष्ट प्रथम सांगून ठेविली पाहिजे. ती ही कीं, स्वधर्म किंवा स्वकर्म म्हणजे आपापल्या वर्णाश्रमाप्रमाणें विहित अशी मानसिक किंवा शारीरिक क्रिया, आणि परधर्म म्हणजे वर्ण किंवा आश्रम यांस अविहित जी क्रिया ती. ब्राह्मणांस आपत्काळीं शस्त्रग्रहण हा स्वधर्म होय. तसेंच क्षत्रियांस सामान्यकाळीं भिक्षा मागणें हा परधर्म होय. धर्मस्थापनेसाठीं ईश्वराचा जो अवतार होतो, तो चातुर्वर्ण्यव्यवस्था बिघडली असल्यास तिची पुन्हां स्थापना करण्यास होतो व 'धर्म' शब्दाचा हाच अर्थ आहे. असो.

आयुष्यांत कित्येक प्रसंग असे येतात कीं, त्या वेळीं स्वधर्माचरणापेक्षां परधर्मस्वीकार हा अत्यंत सुखदायक व हितपरिणामी असा भासतो. अशा वेळीं मन हें चंचल होऊं न देतां, परधर्माचरण हें नेहमींच दुःखपर्यवसायी व अविहित म्हणजे निषिद्ध म्हणून दोषास्पद आहे अशी मनाशीं गांठ बांधावी. उदाहरण अर्जुनाचेंच घेऊं. युद्धास उभा राहिला असतां त्यास मोह झाला तो असाः—

या युद्धांत एक तर माझा जय होईल अगर अपजय होईल; जय व्हावयाचा असल्यास प्रतिपक्षीयांच्या वधावांचून तो होणें नाहीं; त्यांचा वध म्हणजे गोत्रबंधूंचा वध असल्यामुळें तो अत्यंत पापदायक व गुरुहत्येचें

पातक लावणारा असा आहे व त्यामुळें पुढें वर्णसंकरहि होण्याचा संभव आहे. असला हा जातीचा उच्छेद करणारा, वर्णसंकर घडवून आणणारा व गुरुद्रोहासारख्या पातकानें स्वतःस नरकीं पचविणारा जय त्याज्य आहे, म्हणून हें युद्ध दुःखारंभी व दुःखपर्यवसायी आहे. उलटपक्षीं अपयश आलें तर अपकीर्ति होईल व मरण येईल; अपकीर्तीपेक्षां मरण बरें. मरण आल्यास पुरुषार्थाचें साधन जो देह तो नाहींसा होईल व असें झालें म्हणजे संसारभयाचा नाश म्हणजेच जीवितसाफल्य होणार नाहीं. तेव्हां कोण-त्याहि दृष्टीनें जरी पाहिलें तरी युद्ध हें अहितपरिणामीच ठरत आहे, म्हणून त्याचा त्याग करणें हेंच श्रेयस्कर आहे असें मला वाटतें. युद्धापेक्षां "भिक्षा मागता भली" याप्रमाणें अर्जुनाची विचारसरणी आहे.

मोहाचा धर्मच असा आहे कीं, तो अगदीं हुबेहूब विचाराचें रूप धरतो; परंतु त्याचे मूळाशीं मनाची दुर्बलता व अधर्म असावयाचे; त्याप्रमाणें अर्जुनाची ही विचारसरणी दिसण्यांत प्रथमतः फार गोड दिसते; परंतु थोडा विचार केला असतां त्यानें येथें तीन प्रमाद केलेले आहेत असें दिसून येईल. पहिला—स्वधर्माचरण करीत असतां कोणताहि दोष अंगीं येत नाहीं, हें धर्माचरणाचें जें मुख्य तत्त्व तें तो विसरला. दुसरा—धर्माचरण करीत असतां त्यांत सुखदुःख अथवा यशापयश यांची आधींच उठाठेव करीत बसला; आणि तिसरा—सर्वांत मोठा हा कीं, स्वधर्माचरण दुष्कर म्हणून व परधर्म सुकर म्हणून भुलून जाऊन पतनशील परधर्म जी भिक्षा, ती स्वीकारण्याचें त्यानें योजिलें.

परु आचारु जो पराचा । तो देखतां फिर बरवा ।
परि आचरतेनि आचरावा । आपुला चि ॥ ३×२१५
म्हणौनि आणिकांसि जें विहित । आणिक आपणेयां अनुचित ।
तें आचरावें जरि हित । विचारिजे ॥ ३×२२३
आणि स्वधर्मु चि पाळावा । परधर्मु तो गाळावा ।
हा नियमु हीं पांडवा । न कीजे चि पां १८×९३०
परा पराचारा वरपिया । ऐसें होईल ठेंकलेयां ।
पापाचें वाळवें ठोया । केलें जैसें ॥ १८×९२८

निजधर्मु... आचरितां बाधु नाहीं । कव्हणा काळीं ॥
सुखि संतोषा नैयावें । दुःखि विषादा न भजावें ।
आणि लाभालाभ न धरावें । मनामाजि २×२२६
एथ विजयपण होईल । कां सर्वथा देह जाईल ।
हें आदिं चि कांहिं पुढील । चिंतावें ना ॥ २×२२७

तेव्हां स्वकर्माचरण अथवा स्वधर्माचरण कितीहि कठिण असलें आणि परधर्माचरण तितकेंच दिसण्यांत सुकर व सुखानुभवी असलें तरी त्याचा त्याग करून स्वधर्माचरणच केलें पाहिजे.

हें स्वकर्माचरण दोन प्रकारचें आहे. एक सकाम व दुसरें निष्काम. कर्तृत्वाच्या संकल्पानें व स्वर्गादिसुखाच्या भोगेच्छेनें केलेलें शास्त्रविहित कर्म हाहि स्वधर्मच होय; परंतु हा स्वधर्म निष्कामतेनें आचरिलेल्या स्वधर्माहून कमी योग्यतेचा आहे. कारण, असें पहा कीं, स्वर्गादिसुखें काय अगर ऐहिक सुखें काय, हीं इंद्रियांच्या विषयोन्मुखतेनेंच उत्पन्न होतात; परंतु इंद्रियांच्या या स्वभावासंबंधीं तर आपल्याला सावधगिरी ठेवावयाची आहे व तसें आपण पूर्वीं निश्चितहि केलेलें आहे; तर मग होतें काय कीं, शास्त्राज्ञेप्रमाणें स्वकर्माचरण करूनहि सकामाचरणानें इंद्रियांचेंच कोड पुरविलें जातें. अत्यन्त कष्ट सोसून सकामतेनें कर्म करणें म्हणजे उत्तम पक्वान्नें तयार करून त्यांत विष कालविण्यासारखेंच आहे. शास्त्रोक्ताचरणाचा जो मुख्य हेतु तो सकाम आचरणानें नाश पावतो, म्हणजे सकाम अशा स्वधर्माचरणांत हेतुविघाताचा दोष उत्पन्न होतो.

क्रियाविशेषें बहुतें । न लोपीति विधितें ।
निपुण होउनि धर्मातें । अनुष्ठिति ॥ २×२४९
परि एक चि कूड करीति । जे स्वर्गकामु मनीं धरिति ।
यज्ञपुरुष चूकति । भोक्ता जो ॥ २×२५०
(तैसा) नाशीति धर्मु निफजला । हेतुकपणें ॥ २×२५२
सायासें पुण्य आर्जिजे । मग संसारु कां अपेक्षिजे ।
परि नेणते ते काइ कीजे । अज्ञान देवें ॥ २×२५३

असल्या या सकाम आचरणांत इंद्रियांच्या आवडीनिवडीवर विसंबून न रहातां

शास्त्रदृष्टीनें स्वकर्म कोणतें तें तेव्हांच पारखतां येऊन एक मोठीच अड-चण दूर होते खरी; परंतु तेवढ्यानें मनुष्यांस इष्ट जो आत्यन्तिक सुखाचा लाभ तो मात्र मिळत नाहीं. कारण, काम्य कर्में शास्त्रानें विहित आहेत व तीं केलीं असतां आणि सुदैवानें तीं सफल झालीं असतां, मनुष्यास त्या त्या कर्मांचा परिणाम जे स्वर्गादिभोग ते मिळतात हें खरें; परंतु या परिणामाचा सूक्ष्म विचार केला असतां असें आढळून येईल कीं, शास्त्राज्ञा पालन करूनहि यांत इंद्रियाधीनता नष्ट होत नाहीं, म्हणजे काम्य कर्मांचे बाबतींत शास्त्राज्ञेचें पालन होऊनहि इंद्रियदमन साधत नाहीं; जेथें इंद्रियदमन नाहीं तेथें वर वर्णन करण्यांत आलेली कामक्रोधादि अनर्थपरंपरा कायम असते, व या अनर्थपरंपरेचा परिणाम नाश (बंध) हाहि अर्थातच कायम असतो. तेव्हां शास्त्रोक्त कर्मांचें सकाम आचरण हें कांहीं वास्तविक स्वधर्माचरण किंवा स्वकर्माचरण नव्हे.

वेद हे त्रिगुणात्मक असल्यानें खरें स्वकर्माचरण अथवा स्वधर्माचरण यांच्या पायरीस न पोंचणारें असें जें काम्य कर्म, तें वेदविहित असूनहि टाकावें, अशी श्रीज्ञानेश्वरींची शिकवण आहे. म्हणजे विहित कर्म टाका-वयाचें असें नाहीं; तर तें आचरीत असतां वेदविहित जी सकामता ती टाकावयाची.

> म्हणौनि तूं हें जाण । हें सुखदुःखासी चि कारण ।
> पथ इयें अंतष्करण । रिगों देसि ॥२×२५८

आयासच जर करावयाचे, तर ते काम्य कर्मांच्या ऐवजीं स्वकर्म अथवा स्वधर्म यांच्या निष्काम आचारांत केले तर काय बिघडतें? "आड रानीं रिगाल्यानें" पाय शिणतात आणि सरळ मार्गानें गेले तरी पाय शिण-तातच; याप्रमाणें दोन्ही मार्गानें जाण्यामध्यें जर आयासच आहेत, तर सरळच मार्गानें कां जाऊं नये व मुक्कामास पोहोंचूं नये? रणांत अभिमुख राहिलें असतांहि मरण येणार व पळालें तरी पाठीवरील घावानें मरण येणारच, अशी जेथें स्थिति आहे तेथें शत्रूंस मारत मारत समोरील घावानें मरून स्वर्गास तरी कां जाऊं नये?

अगा उजू वाटा चालावें । तऱ्हीं पायें चि सीणवावें ।
ना आडरानें धांवावें । तऱ्हीं तें चि ॥ १८×९३३
आगा पाठीं लागतां घाई । मरण न चुके चि पाहीं ।
तरि समोरिलां काई । आगलें कीजे ॥ १८×९३८

म्हणून काम्य कर्म करण्यांत जे आयास करावयाचे तेच निष्काम कर्म करण्यांत केले तर काय बिघडेल? काम्य कर्म करण्यांतहि मनादि इंद्रियांस एक प्रकारचा आळा घालण्याची संवय होते, तीच निष्काम कर्म करण्यांत इतर करणें फारसें जड जावयाचें नाहीं. काम्य कर्म आचरण्यांत वर दिलेल्या विपरीत परिणामाखेरीज आणखीहि एक दुष्परिणाम संभवतो तो असा:—

काम्य कर्म अगदीं समाप्तीचे वेळींहि अविहित झालें तर केलेले श्रम सर्व फुकट जातात; निष्काम कर्माचें याच्या अगदीं उलट आहे. कितीहि थोड्या प्रमाणांत अमृत घेतलें तरी जसें तें आयुष्यदायी होतें तसें निष्काम केलेलें स्वधर्माचरण शेवटास न जातां तें अल्प जरी घडलें तरी संसारभयापासून मुक्त करतें.

अर्जुना ! जें पुण्यवशें । जरि अल्प चि इयें प्रकारें ।
तरि अशेष हें नाशे । संसारभय ॥ २×२३७

सकाम कर्मांत रागद्वेषादि विकार असल्यानें तेथें सुखदुःखाचा संभव आहे हें वर सांगितलेंच आहे; निष्काम कर्मांत कर्तेपणाचा अहंकार नसल्यानें व फलाशाहि पण नसल्यानें राग, द्वेष व तद्भूत सुखदुःख यांचा अभाव असणें अर्थातच साहजिक आहे.

नैष्कर्म्यच अंगीं बाणावयाचें आहे, तें अकर्मानें होईल कां नाहीं? म्हणजे कर्तेपणाची अनहंकृति, फलाशेचा त्याग आणि इंद्रियांचें दमन एवढा खटाटोप करून जें नैष्कर्म्य साधावयाचें तें अथवा त्याचाच पर्याय, कांहींच कर्म न केल्यानें साधेल कां नाहीं असा प्रश्न कोणी करील तर त्यास उत्तर हेंच कीं, विहित कर्म टाकून नैष्कर्म्याची प्राप्ति केव्हांच होत नाहीं.

जे उचित कर्म सांडिति । मग नैष्कर्म्य हों पाहांति ।
परि कर्मेंद्रियप्रवृत्ति । निरंतुलि ॥ ३×६४

तेयां कर्मत्यागु न घडे । जें कर्तव्य मनीं सांपडे ।
परि नटति ते कुडें । दरिद्र आण ॥ ३×६५

कां प्राप्तकर्म सांडिजे । एतुलेनि नैष्कर्म्या होइजे ।
हें अर्जुना! वायां चि बोलिजे । मूर्खपणें ॥ ३×६६

म्हणौनि आइकें पार्था । जेया नैष्कर्म्यपदीं आस्था ।
तेया उचित कर्म सर्वथा । त्याज्य नोहे ॥ ३×७०

विहित कर्मांचा त्याग करून नैष्कर्म्य प्राप्त होत नाहीं इतकेंच नाहीं, तर वर दर्शविल्याप्रमाणें देह आहे तावत्कालपर्यंत कोणत्याच कर्मांचा त्याग होणें शक्य नाहीं.

हां गा सव्यसाची । मूर्ति होऊनि देहाची ।
खंति करीति कर्माची । गावंढीं नां ॥ १८×२१६

शरीराचेनि आभासें । मांदु जंव असे ।
तंव कर्मत्यागाचें पीसें । काइसें तऱ्हीं ॥ १८×२२०

आणि निषिद्ध तर आचरणें नाहीं! तेव्हां कर्मांवांचून नैष्कर्म्य संभवत नाहीं हें स्पष्ट आहे. असलें हें नैष्कर्म्य अंगीं बाणण्यास कांहीं निराळें साधन नको. स्वकर्मानें सर्वात्मक ईश्वराची सेवा केली कीं झालें; स्वकर्म हेंच परमात्म्याचें पूजन आहे, आणि या पूजनानें परमेश्वर संतुष्ट होऊन पूजकास वैराग्य हें पसायदान देतो. वैराग्यानंतर ज्ञान होतें, आणि चिरकाल शांति हा त्या ज्ञानाचा परिपाक या अभेदी भक्तास लाभतो.

तेया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमांची वीरा ।
पूजा केली होये अपारा । तोषा लागि ॥ १८×९१३

म्हणौनि तिये पूजे । रिझलेनि आत्मराजें ।
वैराग्यसिद्धि दीजे । पसाया तेथ १८×९१४

मग इया चि गा कपिध्वजा ! । स्वकर्माचिया महापूजा ।
तोषला ईशु तमरजां । झाडि करूनि ॥ १८×९४७

तियें परीतें कांहि । निफजणें पथ नाहिं ।
म्हणौनि म्हणिपे पार्हीं । परमसिद्धि ते ॥ १८×९७७

ही शांति उत्पन्न करणारें जें ज्ञान त्यासच नैष्कर्म्य म्हटलें आहे व हीच परमसिद्धि होय; आणि यालाच कर्मसाम्यहि म्हणतात. जो नैष्कर्मी तोच संन्याशी, तोच योगी, भक्तहि तोच आणि त्याचेंच नांव ज्ञानी, हें दाखविण्याकरितां नैष्कर्म्याची क्रमपरंपरा दिलेली आहे ती अशीः—

म्हणौनि याचेया शांति । हा चि क्रमू गा सुभद्रापति ! ।
अभ्यासु चि प्रस्तुति । कारण येथ ॥ १२×१३९
अभ्यासाहून गहन । पार्था ! मग ज्ञान ।
ज्ञानापासुनि ध्यान । विशेषिजे १२×१४०
मग कर्मफलत्यागु । तो ध्यानापासौनि चांगु ।
त्यागातव भोगु । शांतिसुखाचा ॥१२×१४१

येथें अभ्यास म्हणजे हटयोग, ज्ञान म्हणजे शब्द व युक्ति यांच्या द्वारें आत्म्याबद्दलचा जो निश्चय तो, ध्यान म्हणजे मनाचे बुद्धीशीं दृढीकरण आणि नंतर कर्मफलत्याग. वस्तुतः कर्मफलत्यागाच्या या पायऱ्याच नव्हत; तर कर्मार्पण ज्या परमात्म्याकरितां करावयाचें त्याच्या स्वरूपाचा निश्चय व अनुभव या अभ्यासादि साधनद्वारां सारखाच होत असल्यानें हे त्याचे पर्याय आहेत. असला स्वरूपनिश्चय जो ज्ञानध्यानांनीं होतो तोच भक्तीनें होतो व तोच योगानेंहि होतो. ज्या भक्तीस जाणीवभक्ति म्हटलें आहे तीच भक्ति खरी; व तिचेंच वर्णन बाराव्या व चौदाव्या अध्यायांत केलेलें आहे. ज्ञानाची पराकाष्ठा व योगाचें सर्वस्व ती हीच भक्ति होय.

परि कोणु मी कैसी भक्ति । व्यभिचार काइ व्यक्ति ।
हे आघवी च निरुति । होआवी लागे ॥ १४×३६९
विश्व यथें मांचें । हें मी चि पैं आघवें ॥ १४×३७४
येथा कारणें भेदातें । सांडूनि अवघें चित्तें ।
आपणेया सकट मातें । जाणावें गा ॥ १४×३७९
ऐसेनि मातें जाणिजे । तें जाणीवभक्ति म्हणिजे ।
एथ भेदु काहिं देखिजे । व्यभिचार तो ॥ १४×३७८

ऐसेनि गा समरसें । दृष्टि जैं उल्हासे ।
ते पैं भक्ति ऐसे । आम्हि म्हणों ॥ १८×३८४
आणि ज्ञानाचें चोखावें । इयें चि दृष्टी नावें ।
योगाचें हि माथवें । सर्वस्व हें ॥ १८×३८५
पार्था गा जगीं । भक्तु तो चि योगी ॥ १२×२३१

तेव्हां वर दर्शविल्याप्रमाणें जो भक्त तोच योगी, जो भक्त तोच ज्ञानी, त्यालाच समदृष्टि व त्यालाच नैष्कर्मींहि म्हटलेलें आहे. म्हणून भक्ति अथवा योग अथवा ज्ञान हें वास्तविक पाहिलें असतां नैष्कर्म्यांचेच पर्याय आहेत; कारण नव्हत. तथापि कार्यकारणभावांतच आपण बोलूं. भक्तीनें नैष्कर्म्य कसें साधतें तें आपण पाहिलेंच. तसेंच अभ्यासयोगानें कसें साधतें तें पाहूं. विश्वाचें विविधत्व नामरूपात्मक आहे. एकाच लांकडाचे निरनिराळे पदार्थ करितां येतात व त्यांस निरनिराळीं नांवें देतां येतात. वस्तुतः त्या सर्व वस्तूंचें मूळरूप लांकूडच असतें, तसें या जगांत सर्व चैतन्य असून नामरूपाच्या योगानें विविधत्व भासतें आणि हें विविधत्व भासणें हा मनाच्या वृत्तींचा परिणाम आहे; म्हणजे या जगीं ही जी भिन्नता भासते त्या भासाचें कारण थोडा विचार केला तर आपणांस असें दिसून येईल कीं, मन हेंच होय. जसजशा भिन्न वृत्ति मनावर उठतात तसतसा जगांत भिन्नतेचा भास होतो; म्हणजे मन हाच कोणी एक पडदा असून त्यावर विश्वाचें विविधत्व चित्राप्रमाणें उमटतें आणि म्हणून तें अपक्व बुद्धीस ग्राह्य होतें. तेव्हां हें विश्वाचें विविधत्व मावळण्यास अगदीं सोपा (!) उपाय म्हटला म्हणजे या मनरूप पटाचा नाश होय. अधिष्ठानरूपी पडदाच नाहींसा झाल्यावर जगाचें विविध चित्र उमटणार कोठें ? वर दिलेली ही आलंकारिक भाषा सोडून दिली आणि साध्या शब्दांत बोलूं लागलों तर असें म्हणावें लागेल कीं, जगांत भासणारी भिन्नता ही केवळ दिखाऊ नामरूपात्मक आहे; आणि ती मनावर उठणाऱ्या भिन्न वृत्तींनें आपणांस भासते म्हणून मनाच्या वृत्तीबरोबर या भासाचाहि लय होतो, व खरें स्वरूप जें चैतन्य तेंच तेवढें शिल्लक रहातें.

जेथ हें संसारचित्र उमटे । तो मनोरूपु पट फाटे ॥
जैसा सरोवरू आटे । मग प्रतिमा नाहीं ॥ ५×१५५
तैसें नामरूप तेयाचें । यन्हावें ब्रह्म चि ब्रह्मिचें ।
मन साम्या आलें जेयाचें । सर्वत्र गा ॥ ५×१००

अशा तऱ्हेनें जेथें मनच गेलें म्हणजे जेथें वृत्ति शून्याकार झाली तेथें अहंकार समूळ नाहींसा होणें साहजिकच आहे; आणि वर सांगितल्याप्रमाणें भेद नाहींसा झाल्यामुळें जगांत एकच वस्तु स्फुरण पावणें हेंहि सहज आहे.

तैसें मनपण मुद्दल जाये । मग अहंभावादिक कें आहे ।
म्हणौनि शरीरें चि गगन होये । अनुभवी तो ॥ ५×१५६
वासनांतरांची विवंचना । मग आपैसी पाडवे अर्जुना ।
जेव्हांलि गगनीं लो मना । पवनें कीजे ॥ ५×१५४

मनपवन एक होऊन त्यांचा गगनांत लय झाला म्हणजे

भोगांतुनि निघतां । चित्त मजमाजीं रिगतां ।
हळु हळु पांडुसुता । मी च होसी ॥ ५×१५६

असा मनाचा लय होण्यापूर्वी एका गोष्टीबद्दल सावधगिरी ठेवणें अवश्य आहे; अवश्य आहे असें म्हणण्याच्या ऐवजीं सावधगिरी आपोआपच राहते असें म्हटलें तरी चालेल; ती ही कीं, जगांत जो भेद दिसतो तो मनाच्या वृत्तीमुळें तर खराच, परंतु त्या वृत्तीस बुद्धीचीहि जोड मिळत असते म्हणून; यासाठीं योग्यानें मनाबरोबरच बुद्धीचाहि विराम केला पाहिजे. मन आणि बुद्धि हीं एकाच चैतन्यांत आराम पावलीं म्हणजे मनाचें आणि बुद्धीचें समत्व झालें कीं, योगाची पराकाष्ठा झाली असें समजावें.

तरि मन हें येक । माझां स्वरूपीं वृत्तिक ।
करूनि घालीं आणिक । बुद्धी ही ॥ १२×९१
समत्व चित्ताचें । तें चि सार जाण योगाचें ।
जेथ मन आणि बुद्धिचें । ऐक्य आथि ॥ २×२७२

मन आणि बुद्धीचें ऐक्य होऊन विश्वाचें विविधत्व नाहींसें झालें कीं, आत्मतत्त्व हाच एक विषय बुद्धीस राहतो; (विषयविषयी हा संबंध

शक्य असल्यास) विषय राहतो असें म्हणण्याच्या ऐवजीं परमात्मा हाच बुद्धीची अवधि होतो असें म्हटलें तरी चालेल. या बुद्धीस सुबुद्धि असें म्हटलेलें आहे.

दुर्लभ हे बुद्धि । जिये परमात्मा चि अवधि ॥ २×२४१
तैसा ईश्वरु वांचूनि कांहीं । जिये आणिकि लाणि नाहीं ।
तेथ एकी चि बुद्धि पाहीं । अर्जुना जगीं ॥ २×२४२

अशा तऱ्हेनें भक्तीचा काय किंवा योगाचा काय, परिणाम एकच होतो. सर्व विश्वांत विश्वंभर भासणें व तशी एकत्वाची बुद्धि होणें यास व्यापक ज्ञान म्हटलें आहे. असलें भेदरहित व्यापक ज्ञान ज्यास झालें त्यास वर सांगितलेल्या अभेदभक्तीच्या अनुभवाप्रमाणें विश्वाबरोबर मीहि एक विश्वंभररूप आहें असें कां भावूं नये?

पथ ईश्वरु एकु अकर्ता । ऐसें मानलें जरि चित्ता ।
तो चि मी हें स्वभावता । आदि चि आहे ॥ ५×८४

असल्या तऱ्हेची अभेदप्रतीति ज्यास झाली, म्हणजे स्वतःसकट ज्यास सर्व विश्व चैतन्यरूप भासूं लागलें, त्याची क्रिया सहजच केवलकर्म म्हणून होणार; कारण तेथें अहंकार नाहीं. म्हणजे 'स्व'त्व नाहीं. मग 'स्वकर्म' कोठचें?

क्रिया कलापु आघवा । आचरतु दीसे बरवा ।
तरि तो इहीं चिन्हीं जाणावा । ज्ञानियां गा ॥ ४×९४
जे बुद्धिचिये ठाउनि देहीं । तेथां अहंकाराची शंका नाहीं ।
म्हणौनि कर्में चि करित पाहीं । चोखाळले ॥ ५×६२
आइकें सकलसंमतें जगिं । पांहे तो चि योगी ।
जो कर्में करौनि रागी । नव्हे चि फळिं ॥ ६×४३
तें तैसें चि उचित करी । परि साटोप नाहीं शरीरीं ।
बुद्धि हीं करौनु फळवेन्ही । जाये चि गा ॥ ६×४६
ऐसा तो चि गा संन्यासी । पार्था परियासि ।
तो चि भरवंसेंसी । योगीश्वर ॥ ६×४७

जेथें आपपरभाव नाहीं तेथें रागद्वेष नाहीं, आणि जेथें अहंकार नाहीं तेथें फलाशा नाहीं व म्हणून सुखदु:खहि नाहीं; अशा स्थितींत जें कर्म करावयाचें तें 'केवळकर्म' या दृष्टीनेंच केलें गेलें पाहिजे हें उघडच आहे. पाण्याचा स्वभाव तृप्ति देणें हा असल्यामुळें, गाईस अथवा व्याघ्रास तें सारखेंच तृप्ति देणारें होतें; ऊंस हा लावणारास गोड आणि गाळणारास कडू हा भेद ठेवीत नाहीं; हें जसें, त्याप्रमाणेंच अर्जुन हा कर्तव्य करीत असतां त्याच्या आड येणारे आप्त, बंधु, पितामह भीष्म व गुरु द्रोणाचार्य आणि शत्रु कर्णदुर्योधन हे सर्व त्यास सारखेच; म्हणजे कर्तव्याच्या दृष्टीनें त्यांच्याविषयीं अर्जुनाच्या मनांत शत्रुत्वहि नव्हतें आणि आप्तपणाहि नव्हता.

श्रीमद्भागवतांतील सातव्या स्कंदांत असा एक प्रश्न विचारला गेला आहे कीं, ईश्वर हा सर्व प्राण्यांचा सुहृद, मित्र व हितकारी असतां आणि कोणाचाहि वैरी नसतां त्यानें इंद्राचाच पक्ष घेऊन दैत्यांस कां मारावें?

याचें उत्तर

आतां सुहृदु आणि शत्रु । कां उदासु आणि मित्रु ।
हा भावभेदु विचित्रु । संकल्पु कैंचा ॥ ६×९४

तेया बंधु काइ कासेयाचा । द्वेषिया कव्हणु कैंहाचा ।
मीं च विश्व ऐसा जेयाचा । बोधु जाला ॥ ६×९५

धरिचिया उजियेड करावा । पारखेया आंधारु होआवा ।
हें न म्हणे चि पांडवा । दीपु जैसा ॥ १२×१४७

जो सर्व भूतांचां ठांइं । द्वेषातें नेणें काहिं ।
आप परु नाहिं । चैतन्या जैसा ॥ १२×१४३

असें दिलेलें आहे. म्हणूनच "ब्रह्म तेंचि कर्म' अशी ज्याची दृष्टि झाली, तो मनुष्य प्राप्तकर्म करीत असतां, त्यास कोणी मित्रहि नाहीं व कोणी शत्रुहि नाहीं, असें म्हणण्याऐवजीं आपण पाहिजे तर असें म्हणूं कीं, त्यास सर्व जगांत

कर्मीच ब्रह्मरूप

भासतें, शत्रुमित्र हा भावहि त्याचे मनीं नसतो. कारण, असा भाव असणें

म्हणजे द्वैत उत्पन्न होणें असें आहे, आणि निष्कामाचरणांत तर द्वैताचा संभव नाहीं. तो ब्रह्मभूत असतो, तो प्रसन्नात्मा असतो व त्याचा शोकमोह नाहींसा झालेला असतो.

आतां वर सांगितल्याप्रमाणें ज्याचें द्वैत गेलें, भीपणा गेला, फलाशा नष्ट झाली, सुखदु:खाबद्दल उदासीनता अंगीं बाणली, (म्हणजे कर्मास प्रोत्साहक जो अहंकार त्याचा नाश होतो व चित्तशुद्धिजन्य ज्ञान याचा उद्भव होतो), अशा मनुष्यास यानंतरहि कर्म अवशेष राहतें का? अशा प्रश्नास 'होय' हेंच उत्तर साधुसंतांनीं दिलेलें आहे. प्रकृतीच्या तीन गुणांहून आत्मा भिन्न आहे अशी बुद्धि होऊन मनुष्य जेव्हां या गुणांपासून अलिप्त होतो तेव्हां फक्त त्याचा कर्तेपणाचा अहंकार नाहींसा होतो (श्री. गी. अ. १४ श्लो. १९।२०); गुण नाहींसे होत नाहींत. कारण, त्यांचें अधिष्ठान जी देहरूप प्रकृति ती कायम असते; आणि

संगु जंव प्रकृतिचा । तवं त्यागु न घडे कर्मांचा ।

असें असल्यामुळें कर्तृत्वाचा फक्त अहंकार नष्ट होतो, कर्तृत्व नष्ट होत नाहीं. अहंकार नष्ट झाल्यानें व सम्यग्ज्ञान झाल्यानें 'स्वकर्मा'चें रूप केवळकर्म म्हणून राहतें; मात्र अहंकार नष्ट झाल्यामुळें कर्मबंधन या नैष्कर्म्यास लागत नाहीं.

पथ कर्में तो न लिंपे । जो गुणसंभ्रमें घेपे ।
प्रकृतिचेनि आटोपें । वर्तत असे ॥ ३×१८०
इंद्रियें गुणाधारें । राहाटति निजव्यापारें ।
तें परकर्म बलात्कारें । आपादि जो ॥ ३×१८१

इंद्रियांचें कर्म हें आत्म्याचें नसल्यानें तें अर्थातच परकर्म झालें. येथपर्यंत जेथें बुद्धीच्या निश्चयाचा पल्ला गेला तेथें कर्तेपणाचा अहंकार कसा असूं शकेल? मग जेथें इंद्रियांचा विटाळहि सोसत नाहीं, तेथें स्वकर्मांचें 'स्वत्व' (आपलेपणा) कसा राहील? परंतु देहपातापावेतों कर्म तर सुटत नाहीं, म्हणून ज्ञान्याचें कर्म केवळकर्मरूपच शिल्लक राहतें.

जेथा आत्मज्ञानाचां ठाईं । कर्म आपुलेया जीविता पाईं ।
होऊनियां उतराई । लया जाय ॥ १५×५२

हारपलें दाकवि जैसा । मातु सरे चीर्णकाळा ।
ज्ञानें कळवु वळवे तैसा । कर्मप्रसावा ॥ १५×५५३
म्हणौनि ज्ञानियां पुरुषां । कृत्य करूं सरलें देखा ।
ऐसा अनाथाचा सखा । बोलिला तो ॥ १५×५५४

याचा अर्थ इतकाच कीं, 'स्वकर्म' असें ज्ञान्यास कांहीं राहत नाहीं. प्रकृतीचा संग असल्यानें, म्हणजे देहपात झाला नसल्यानें कर्म 'केवलस्वरूपी' मात्र राहतें.

म्हणौनि सर्वां परीं जो मुक्तु । तो सकर्मु चि कर्मरहितु ।
सगुणु परि गुणातीतु । येथ भ्रांति नाहीं ॥ ४×११२

असो.

श्रेष्ठांचा जो आचार तोच धर्म

असल्यानें, जे संत आहेत, जे ज्ञानी आहेत त्यांनींच विशेषतः कर्मांवर भर ठेवावा. निष्काम तर खरेंच; परंतु सकामाहूनहि—शक्य असल्यास—कर्मांवर आसक्ति आहे असें आचरणानें यांनीं दाखविलें पाहिजे; कारण, लोकांस त्यायोगें वळण लागावें म्हणून. भगवंतांना तिन्ही लोकांत कर्तव्य म्हणून कांहींच उरलें नव्हतें; पण असें असूनहि त्यांनीं केवळ अखेरपर्यंत

लोकसंग्रहार्थच कर्माचरण

केलें व प्राप्तार्थींनींहि तें करावें अशी आज्ञा केली.

म्हणौनि समर्थु जो पर्थे । आणि जाणि सर्वज्ञते ।
तेणें सविशेष कर्मातें । त्यजावें ना ॥ ३×१६७
देखें फलाचिया आशा । आचरे कां मूर्खु जैसा ।
कर्मीं भरू होआवा तैसा । निराशा ही ॥ ३×१६७

लोकसंग्रहाकारितां व लोकसंस्था रक्षणीय म्हणून, नैराश्य ज्यांस बाणलें आहे, जे प्राप्तार्थ झाले आहेत म्हणजे ज्ञानाच्या परसीमेस जे गेले आहेत त्यांनींहि कर्म केलेंच पाहिजे.

जे पुढती पुढती पार्था । हे सकळ लोकसंस्था ।
रक्षणीय ना सर्वथा । म्हणौनियां ॥ ३×१६८

मार्गाधारें वर्तावें । विश्व हें मोहरें लावावें ।
अलौकिका नोहावें । लोकाप्रति ॥ ३×१६९
तेथ सत्क्रिया चि लावावी । ते चि एकि प्रशंसावी ।
नैष्कर्मीं हीं दावावी । आचरौनि ॥ ३×१७२

पुढील ओवींत स्पष्टच म्हटलें आहे—

देखें प्राप्तार्थ जाले । जे निष्कामता पातले ।
तयां हीं कर्तृत्व असे उरलें । लोकांलागि ॥ ३-१५४

हें लोकांलागि कर्तृत्व कोणतें त्याचा स्पष्ट उल्लेख १६ व्या अध्यायांत केलेला आहे.

तैसि बांधलि सोडितां । बुडालीं काढितां ।
सांकडीं फेडितां । आर्ताचिया ॥ १६×१९९
किंबहुना दिवसें राती । पुढिलांचें चि सुख उन्नती
आणित आणितां स्वार्थी । प्रवेसिजे १६×२००
वांचौनि आपुलेया काजालागि । प्राणिजाताचां हितभागी ।
संकल्पाची ही आडवंगी । न करणें जें ॥ १६×२०१

कर्माची केवढी उदात्त कल्पना ही! याचाच दुसरा पर्याय पहा—

देखें भूतजात निदेलें । जेथ तें चि जेया पाहालें ।
आणि जीव जेथ चेइले । तेथ निद्रितु जो ॥ २×३५४

स्वार्थ हा सगळ्यांस समजतो; त्या स्वार्थाविषयीं ज्याची गाढ निद्रा व परमार्थाविषयीं जो डोळ्यांत तेल घालून जागतो त्या नैष्कर्म्याची योग्यता कशी वर्णन करावी! याहिपलीकडील पायरी यज्ञाची आहे; पण ती सर्वभूतच आहे.

यावरून एक विचार सुचतो तो येथें नमूद करावासा वाटतो. कार्यकारी, जो खरा ज्ञानी आहे त्याच्या ठिकाणीं दैववादास जागा राहत नाहीं. केवळ पौरुषवाद तेथें संभवतो. जेथें सिद्धि अथवा असिद्धि यांचेबद्दल उदासीनता असते, जेथें फलाशेचा संसर्ग नाहीं, तेथें दैवाची जरूर काय!

याच्याहि पुढची पायरी म्हणजे निष्कामाचरणांत मायोपाधी ईश्वराचीहि जरूर नाहीं. ईश्वर हा कर्मांचें फल देणारा आहे, त्या कर्मांची तर अपेक्षा नाहीं, मग ईश्वराची अवश्यकता काय! आणि म्हणून

कर्म हेंच ब्रह्म

अशी प्रतीति नैष्कर्म्यास येते असें वर्णन आहे. यावरून श्रीभावार्थदीपिका ही केवळ प्रयत्नवादी आहे, दैववादी नाहीं. श्रीअनुभवामृतांत श्रीज्ञानेश्वरांनीं प्रयत्नवाद स्पष्ट दिला आहे; कारण, तेथें ज्ञानाचा निरास असल्यानें कर्म हें ज्ञानास कारण होत नाहीं, व म्हणून ज्ञानोत्तर कर्म आहे कीं नाहीं हा प्रश्नच उद्भवत नाहीं. जीवन्मुक्तस्थिति ही निराळी नसल्यानें (आहे तीच स्थिति मुक्तस्थिति आहे) प्रकृतीच्या संगामुळें आमरण कर्म हें आहेच.

> **व्यापाराचे गाडे । मोडतांहि अपाडे ।**
> **आक्रियेचें न मोडे । पाऊल कंहीं ॥** अ० अ० ९×२१

वर दिलेल्या सर्व विवेचनाचा इत्यर्थ इतकाच कीं, कर्तृत्वाचा अहंकार टाकून, सुखदुःखाविषयीं मन आणि बुद्धीची समता ठेवून, फलाची आशा सोडून वर्णाश्रमविहितकर्म ज्याचें संपलें आहे, व देहपातापर्यंत जो केवळ लोककल्याणार्थच प्राप्तकर्म करीत राहतो तोच खरा भक्त, तोच योगीश्वर, तोच संन्यासी व तोच ज्ञानी.

श्रीज्ञानेश्वरांची जी ही ज्ञान्याच्या स्वधर्माची शिकवण, ती महाराष्ट्रांतील प्रत्येकाच्या हृदयांत ज्या दिवशीं बिंबेल तो सुदिन होय; अशा सुदिनास आजपासूनच मुहूर्त होवो अशी त्या योगीश्वर श्रीज्ञाननाथांस प्रार्थना करून हें श्रीज्ञानेश्वरीरहस्य येथें संपवितों.

धुळें
फाल्गुन वद्य ११।३६ बुधवार } गो० का० चांदोरकर.

प्रस्तावना

रा० रा० वि० का० राजवाडे यांच्या प्रोत्साहनानें व महाराष्ट्रांतील श्रीसंतमठांच्या अधिपतींनी दिलेल्या सप्रेम मदतीनें हें सूचीचें काम मजकडून पार पडलें. कविसूचि व काव्यसूचि या ताडून पाहिल्या असता वाचकांस असें दिसून येईल कीं, दोन्ही सूची परस्परावलंबी नाहींत व वेळोवेळीं टाकलेल्या भरीमुळें असें होणें अपरिहार्य होतें.

या कामीं माझे मित्र रा० शंकरराव देव, ठाण्याचे विद्वन्मान्य भावे व मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे चिटणीस यांनीं मला जें साहाय्य केलें त्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहें. रा० पराडकर यांनीं छपाईच्या कामीं सर्व प्रकारें तसदी घेतली याबद्दल त्यांचेहि आभार मानणें जरूर आहे.

गो० का० चांदोरकर.

महाराष्ट्रीय संतकवि

श्रीधर

विशेष माहिती:—यांचें चतुर्थाश्रमी नांव कान्तानंद. हे रंगनाथ निगडीकर यांचे पुतणे (भ. म.). यांचें जन्मनाव खंडोबा. यांचे जिव्हेवर रंगनाथांनीं 'श्री' कार काढल्यापासून 'श्रीधर' हें नांव पडलें.

गुरुपरंपराः—परमानंद–रामानंद–यतीश्वर–अमलानंद–गंभीरानंद–सहजानंद–पूर्णानंद–दत्तानंद–ब्रह्मानंद–कान्तानंद (श्रीधर). ब्रह्मानंदाचें पूर्वनांव यादवराव व बंधु ज्ञानानद. इतरत्र वंशावळ दिली आहे ती अशी कीं, बोवाजी बंधु दत्तोपंत, बोवाजीचे रंगनाथ, दत्तोपंतांचे बाळाजी व त्यांचे श्रीधर.

ग्रंथ:— हरिविजय (१६२४), भागवत (१० स्कंध), रामविजयसार (१६२४–२५), पंढरीमाहात्म्य (१६३२), पांडवप्रताप (१६३४), वेदान्तसूर्य (१६३५), अश्वमेध (१६३७), संतप्रताप (१६३८), शिवलीलामृत (१६४०), चक्रव्यूह, प्रल्हादविजय, गिरिमाहात्म्य, पांडुरंगमाहात्म्य, पारधीकथा, जांबूळाख्यान, नवरत्नमाल (?) पारिजाताख्यान, पंचीकरणमहावाक्य, मल्हारीमाहात्म्य, अंबिकाउदय, महिम्नस्तोत्रटीका, चोळराजचरित्र, कृष्णलीलामृत.

श्रीधरकिंकर

ग्रंथ:— कृष्णलीलामृत.

श्रीपतिदास

वि. माहिती:—यांचे गुरु 'विश्वंभर' होते असें यांच्या ग्रंथावरून दिसतें.

ग्रंथ:— गर्भगीता, मनचरित्र.

श्रीरंगनारायण

ग्रंथः— बालिकुमनचरित्र.

श्रीरंगात्मज

वि. माहिती:—हे दोन नांवांचे उपलब्ध होतात. एक गोविंद व दुसरे विठ्ठल.

ग्रंथ:— पदें.

श्रीज्ञानेश्वर

वि. माहिती:—आपेगांवीं शक ११९३ मध्यें जन्म झाला. पैठणास म्हैशाकडून वेद बोलविला, नेवाश्यास श्रीभावार्थदीपिका रचिली, श्रीआळंदीस विसोबा चाटी व वटेश्वर चांगा यांचा गर्व हरण केला, आणि श्रीसिद्धेश्वरसन्मुख श्रीआळंदीसच समाधि घेतली (१२१८).

ग्रंथ:— श्रीभावार्थदीपिका, श्रीअमृतानुभव, श्रीयोगवासिष्ठ, आत्मानुभव (स्वात्मबोध), नमन, उत्तरपत्रिका, पंचमुद्रा, भक्तिराज (?), अन्वयव्यतिरेक, स्वानुभव (?), अद्वैतनिरूपण, योगिनी (?), शुकाष्टक, चांगदेवपासष्टी, लिखित, गीतासार, उत्तरपंचविंशी, उत्तरगीता (?), महावाक्य, हरिपाठ, गायत्रीरहस्य, कल्याणपत्रिका, स्वात्मपत्र, गुह्यसप्तक, मुद्राप्रकाश (?)

अग्रदास

ग्रंथ:— पदें.

अचलचैतन्य

वि. माहिती:—गुरु–चिद्घन.

ग्रंथ:— रासक्रीडा.

अचलसुत

ग्रंथ:— मुद्राप्रकाश.

अच्युतसुत

वि. माहितीः—(प. सं.) वरून याचें नांव 'राम' होतेंसें दिसतें. पहा—राम.

अच्युताश्रम

वि. माहितीः—हे स्वतःस चिदानंदानुचर म्हणवितात. यावरून यांचे गुरु चिदानंद. यांचे शिष्य गोपाळ याज्ञवल्की (कृष्ण याज्ञवल्कीचे पुत्र) याचे विनंतीवरून शिवकल्याणांनीं श्रीअनुभवामृतटीका रचिली (१५५७). तेव्हां हे शिवकल्याणसमकालीन किंवा किंचित् तत्पूर्वी.

ग्रंथः— भगवद्गीता (१६१४ ?), ब्रह्मकथा.

अच्युताश्रमशिष्य

वि. माहितीः—वरील उल्लेखावरून हे कृष्ण याज्ञवल्कीचे पुत्र गोपाळ याज्ञवल्की होत (१५५७). अच्युताश्रमांचा ग्रंथ श्रीभगवद्गीता हा १६१४ तील व त्यांचे शिष्यांचे विनंतीवरून शिवकल्याणांनीं लिहिलेली टीका १५५७ त हें जरा संशयात्मक आहे.

ग्रंथः— घातकज्ञान, शिवस्तुति, रामस्तुति.

अजमा

ग्रंथः— अभंग.

अतीतानंद (अतीत)

वि. माहितीः—यांचे ग्रंथावरून यांचे गुरु ब्रह्मानंद का स्वानंदानंद अथवा शिवानंद हें निश्चित सांगतां येत नाहीं. माझी समजूत शिवानंद असावे.

ग्रंथः— योगवासिष्ठ.

अद्वैतानंद

वि. माहितीः—हे मध्वमुनीश्वराचे गुरु. अमृतरायांचे हि मार्गदर्शक हे च म्हणतात (म. को.). समाधि काशी येथें १६८७. पहा—अमृतराय, मध्वमुनि, सिद्धेश्वर.

अंतु (अनंत)

वि. माहिती:—जातीचा सोनार.

ग्रंथ:— कोल्हाटखेळ.

अनंत

वि. माहिती:—जयरामस्वामी वडगांवकर यांचे शिष्य दोन. एक अनंत व एक गोपाळ. गोपाळांचा समाधिशक १६१२. दोघांनीं मिळून काव्य केलें आहे. २ रे एक अनंत (भट) समर्थशिष्य, हे सातारप्रांतीं मेथवड येथील (१५८०–१६४५). ३ रे रंगनाथस्वामींचे शिष्यांपैकीं कोणी असावे.

ग्रंथ:— ब्रह्मस्तुति, माधवगुण, द्रौपदीस्वयंवर, रुक्मिणीस्वयंवर, गरुडगर्वपरिहार, रुद्रयामल.

अनंत

वि. माहिती:—गुरु—श्रीसमर्थ.

ग्रंथ:— रामचरित्र, बभ्रुवाहनाख्यान, सुधन्वाख्यान, सुलोचनाख्यान, सीतास्वयंवर, गोपीगीत, रामदासस्तुति, सुलोचनागहिवर, लहुकुशाख्यान, श्रियाळचरित्र, सिंहध्वजाख्यान, गरुडगर्वपरिहार, मंगळागौरीव्रत, अहिल्योद्धार, अहिमहिआख्यान.

अनंत

वि. माहिती:—गुरु रंगनाथ.

ग्रंथ:— पदें.

अनंततनय

ग्रंथ:— भारत (उद्योगपर्व).

अनंतफंदी

वि. माहिती:—(अ. को.) संगमनेरचे भवानीबावा व गऊबाई यांचे पुत्र. (१६६६–१७४१). पुत्र श्रीपती (सवाईफंदी).

ग्रंथ:— माधवग्रंथ, कटाव, फटके, छंदोबद्ध उपदेश, लावण्या.

अनंतसुत (मुद्गल)

वि. माहिती:—हे व कृष्णदास मुद्गल काय ? नाथांपूर्वी एक वर्ष समाधिस्थ झाले असें महिपतिबावा म्हणतात. तेव्हां समाधिशक १५२०.

ग्रंथ:— रामायण, रुक्मिणीस्वयंवर, कालियामर्दन (?)

अनंतसुत (विठ्ठल)

ग्रंथ:— वस्त्रहरण (१५९४), गजगौरीव्रत, सुधन्वाख्यान (?) ताटकावध, गरुडहनुमंतभेट.

अनंतसुत (तुकदेव)

ग्रंथ:— स्वात्मानुभवतरंगिणी (१६४०).

अनंतसुत (शंकर)

ग्रंथ:— पदें.

अमृत (चिन्मय)

वि. माहिती:—चिन्मयगुरूचें नांव गणेशभारती असें म्हणतात.

ग्रंथ:— तुरनारायराज (१७१७)

अमृत (जयानंद)

ग्रंथ:— कर्मविपाक.

अमृत (देवदास)

ग्रंथ:— पदें, अभंग वगैरे.

अमृतराय

वि. माहिती:—मोंगलांचे पदरी विसा मोरो नांवाचे अंमलदार होते त्यांच्या पदरचे हे कारकून. यांचें मूळ नांव अंबाजी. यांच्या पित्याचें नांव शंकर व माता उमा. औरंगाबाद येथें यांची समाधि आहे. (१६२०–१६७५). शिष्य—महागिरी. यांचे गुरुसंबंधी कल्याण-

आख्यायिका आहेत. प. सं. (११९) वरून उद्धव गुरु दिसतात; पण कदाचित् हे अमृत कोणी भिन्न असतील. (१६२) वरून मच्छनाथ हे गुरु दिसतात. कित्येक मध्वमुनीचे गुरु अद्वैतानंद यांनीं यांस मार्ग दाखविला म्हणतात. अंबिकासरस्वति हे यांचे गुरु होते असाहि उल्लेख सांपडतो.

भ. मं. या ग्रंथावरून यांची परंपरा अशीः—श्रीनारायण—हंस—सनक—नारद—व्यास—शुक—पूर्णानंद-ज्ञानानंद-**अमृतराय**-सिद्धेश्वर. सिद्धेश्वरांची समाधि शक १७२३ मध्यें. यावरून अमृतरायांचा काल बरोबर दिसतो. पण मग अंबिकासरस्वति हे गुरु कसे? ‘ सुदामचरित्रांत ’ गुरु ‘ ब्रह्मानंद ’ म्हणून म्हणतात.

पद्य—अमृतानंद.

ग्रंथः— दामाजीपंत, अविनाशसंदेहहरण, अलंकारवर्णन, उपदेश, कुंजविहार, कृष्णनृत्य, कृष्णलीला, गणपतिवर्णन, गोचरण, चंद्रावळी, जगदंबावर्णन, जीवदशावर्णन, दामाजीची रसद, दुर्वासयात्रा, द्रौपदीवस्त्रहरण, द्वादशमास, ध्रुवचरित्र, नारदी, पारिजाताख्यान, बालक्रीडा, भक्तिमाहात्म्य, महादेवप्रयाण, मृत्तिकाभक्षण, युद्धवर्णन, रामचंद्रवर्णन, रामजन्म, राधावर्णन, रामक्रीडा, लंकावर्णन, वत्सलाहरण, वाल्मीकिचरित्र, वेदान्त, शुकचरित्र, सुदामचरित्र, स्थालीपाक, संसारदुःखवर्णन, स्त्रीवर्णन, हरिनामवर्णन, स्फुट श्लोक, पदें, कटिबंध वगैरे.

अमृतानंद (माधवसरस्वति)

वि. माहितीः—यांची यांनी स्वतः दिलेली गुरुपरंपरा अशीः—श्रीआदिनाथ—विष्णु—विधि—वसिष्ठ—पराशर—व्यास—शुकदेव—गौडपाद—श्रीशंकर—विश्वाचार्य—बोधघनाचार्य—ज्ञानघन—ज्ञानोत्तम—ज्ञानगिरि—सिंहगिरि—ईश्वरतीर्थ—नृसिंहतीर्थ—विद्याधरतीर्थ—विद्यारण्य—विद्यातीर्थ—मलयानंद—देवसरस्वति—कृष्ण—नृसिंह—माधवेंद्र—अमृतानंद—गगनेंद्र—माधव—विठ्ठल—अंबिका—अमृत.

यांनीं ही परंपरा स्वतः आपले ग्रंथांत दिली असल्यानें 'माधवेंद्रा'चे शिष्य 'अमृतानंद' ते हे नव्हत. तर 'अंबिका'चे शिष्य 'अमृत' हे प्रस्तुत आहेत. अमृतरायांचे गुरु 'अंबिकासरस्वति' होते अशी एक आख्यायिका आहे म्हणून मागें दिलें आहे, तिचें मूळ येथें आहे. पहा–अमृतराय.

ग्रंथः— स्वरूपनिर्णय, योगराजतिलक (ले. श. १६३०).

अमृतेश्वर

वि. माहिती—गुरु–श्रीसमर्थ.

ग्रंथः— आत्मबोध, तत्वबात्तिशी, गणेशगीता, उपासनाप्रकरण, तत्त्वमाळा.

अवधूत अनंत

ग्रंथः— पदें.

अवधूत

वि. माहितीः—यांचे मूळ पुरुष जे चितोत्पत्ति ते चितेंतून जिवंत निघाले अशी हे आख्यायिका देतात. त्यांचे पुत्र सिद्धेश्वर, त्यांचे विश्वेश्वर, त्यांचे श्रीधर, पुढें शामराज व त्यांचे अवधूत. हे आपले गुरु 'गोविंद' देतात. स्वतःस 'अवधूत निरंजन' म्हणवितात.

ग्रंथः— कपिलगीता (१६२०.).

अवधूतदास

ग्रंथः— नृसिंहचरित्र.

अवधूत निरंजन

पहा—अवधूत

ग्रंथः— मूलस्तंभ, अभंग, फटके.

अवधूत (मत्स्यावृत्ति)

वि. माहिती:—यांनीं केलेल्या परमप्रकाशाच्या नांवाचा निवृत्ति अवधूत यांनीं हि एक ग्रंथ केलेला आहे. तरी ते व हे एक च काय ?

पहा:—निवृत्ति अवधूत, परमानंदचैतन्य.

ग्रंथ:— परमप्रकाश.

अवधूतसुत

ग्रंथ:— गणपतिजन्म.

अज्ञानसिद्ध नागेश

वि. माहिती:—यांनीं आपले ग्रंथांत 'नागनाथ' हे आपले गुरूंचें नांव म्हणून दिलें आहे व स्वतःचें नांव नुसतें 'अज्ञान' असें देतात. यांनीं आर्विच आर्येत 'पंचीकरणप्रमेय' रचिलें आहे यावरून यांचा काल १४०० चा सुमार येतो. 'वरद नागेश' व हे एक च असें वाटतें.

ग्रंथ:— कालज्ञान, पंचीकरणप्रमेय.

अंबुदास (संन्यासी)

ग्रंथ:— पदें.

अंबरनाथ

वि. माहिती:—कऱ्हाडजवळ कुंमारगांव म्हणून आहे तेथील कायस्थ; पूर्वी वाळेपाटी मामलत करीत असत. अमणापुरीं मठ केला. यांनीं जिवंत समाधि घेतली. हे चैतन्यसंप्रदायी होते. नाथानंतर.

ग्रंथ:— अर्जुनगर्वपरिहार.

अंबाबाई

ग्रंथ:— पदें.

आचार्यसुत

ग्रंथ:— पदें.

आत्माराम

वि. माहिती:—(प. सं.) वरून हे गोपाळनाथाचे गुरु दिसतात (?)

ग्रंथ:— नारदचरित्र.

आत्माराम

वि. माहिती:—गुरुपरंपरा अशी:—श्रीसमर्थ—कल्याण—शिवराम (आप-चंदमठ)—रामचंद्र—आत्माराम (१७४०).

ग्रंथ:— दासविश्रामधाम, आत्माहित, अक्षरमालिका, क्रमसार.

आत्यारामस्वामि

वि. माहिती:—हे रंगनाथस्वामीचे धाकटे बंधु. यांचें मूळ नांव विठ्ठल. आपण केलेल्या पदांचे शेवटीं आपले बंधु रंगनाथ यांचेंच नांव यांनी घातल्यानें यांचीं पदें कोणतीं हें ओळखणें अशक्य झालें आहे. समाधिशक १६२६ पार्थिव श्रावण वा ८.

ग्रंथ:— नारदचरित्र, नारदाची लावणी, रामदासस्वामीचरित्र, पदें.

आदिनाथ

ग्रंथ:— श्रीनाथलीलामृत (?)

आदिनारायण

वि. माहिती:—हे ब्राह्मण वैदिक व गायक असत. शक १६०० नंतरचे असावेत.

ग्रंथ:— संस्कृतप्राकृत पदें.

आनंद

ग्रंथ:— सूर्यविजय.

आनंदतनय

वि. माहिती:—स्वतःस अरणीचे शिष्य म्हणवितात. यांचे तीर्थरूप आनंदराव देशपांडे; आडनांव वेदोभास्कर. ह्यांही रघुनाथपण्डित. देहत्व अमळ-नेर. (अ. को.)—यांचे गुरु मुरार परब्रह्म (?).

ग्रंथः— शबरीआख्यान, शिबिकथा, विश्वामित्राभिगमन, उमारमासंवाद, कंदुकाख्यान, कृष्णचरित्र, गणिकोद्धार, चेंडुफळी, विठ्लस्तुति, गोरस-क्रीडा, ताटकावध, नवरसचरित, बाळचरित्र, मृगीचरित, महाबळ-चरित, मार्कंडेयाख्यान, मखरक्षण, विषयपंचक, सीतास्वयंवर, सुदाम-चरित, सेतुबंध, श्रियाळचरित्र, राधाविलास, नौकानयन, गर्भगीता.

आनंदनाथ

वि. माहितीः—कुरोलीचे आनंदबावा हे कन्हाडास आले व तेथें त्यांनीं जगदंबेची आराधना केली; व तेथें च मठ स्थापन केला. समाधिशक १७२५ माघ वा॥ १२. शिष्य—प्रल्हादबावा.

ग्रंथः— भक्तमंजिरी.

आनंदमूर्ति

वि. माहितीः—हे मूळ भालगांवचे. यांचा जन्म आगळगांवीं. महादेव व सावित्री यांचे पोटीं यांचा जन्म. आडनांव जोशी. गोत्र वसिष्ठ, ऋग्वेदी. समाधिः—१६१८ कार्तिक शु॥१४ ब्रह्मनाळीं. येथें च यांचा गुरूंची (रघुनाथ) समाधि आहे. हे रघुनाथ पंचवटींत जन्मले. यजुर्वेदी, माध्यंदिन शाखा, विश्वामित्र गोत्र.

आनंदमूर्तींचें मूळ नांव अनंत. त्यांच्या मुलाचें नांव कृष्णमूर्ति. म. सं. कार यांस 'गीताकार' म्हणून संबोधितात. परतु त्यांची गीता अद्याप उपलब्ध नाहीं.

ग्रंथः— रामचरित्र.

आनंदस्वामी

ग्रंथः— भवभ्रमहारक भजनानंदलहरी.

ईश

ग्रंथः— पदें.

ईशसुत

ग्रंथः— पदें.

ईश्वरनाथ

ग्रंथः— पदें.

उदास

वि. माहितीः—श्रीसमर्थ स्वतःस उदास, उदासदास वगैरे म्हणवीत असत. ते च हे काय ?

ग्रंथः— महाबलचरित्र.

उदासदास

वि. माहितीः—चंद्रात्मज, चंद्रतनय ह्यांचें नांव उदास म्हणून होतें, त्यांचे हे शिष्य की काय ? किंवा **श्रीसमर्थ** हि स्वतःस उदास, उदासदास म्हणवीत असत. चंद्रात्मजदास असल्यास शक १६०० चा सुमार.

पहाः—चंद्रात्मज.

उद्धव

वि. माहितीः—'सत्कथासार' म्हणून एक ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यावरून यांची व यांचे गुरु 'काशिराज' यांची जी माहिती मिळते ती अशीः—

लक्ष्मण=भागीरथी
|
शिवबा (उद्धव). हे रामानुजसंप्रदायी, श्रीकृष्णउपासक. मुल्हेर (नाशिक) येथें संस्थान. काल सुमार १५४०–१६००. **रंगनाथ** (मोगरे) यांचे शिष्य एक **काशिराज** होते. परंतु ते व हे एक नव्हत. तसें च **निरंजन** यांचे गुरु हि एक **काशिराज** होते. ते गाणपत्य होते. उद्धवांचे गुरु हि (रामानुज असून हि) गणपति-उपासक होते. दोघांचा हि काल एक च. तेव्हां या दोन भिन्न व्यक्ति कीं एक हा संशय आहे.

पहाः—निरंजन, रंगनाथ, काशिराज.

ग्रंथः— अभंग, उद्धवबोध, बोधरहस्य, संतमाळ, स्वरूपानुभव, पदें.

उद्धव

वि. माहिती:—रामदासी. टांकळी (नाशिक) जवळील दसकपंचक येथील.

सदाशिवपंत=उमाबाई; आडनांव दशपुत्रे.

|

उद्धव (१५४६–१६३५).

उद्धव (अवचित)

ग्रंथ:— शुकाख्यान.

उद्धव (चिद्‌घन)

वि. माहिती:—म. मं. वरून गुरुपरंपरा अशी—

श्रीनारायण–ब्रह्मा–अत्रि–दत्त–शिवचैतन्य–गोपाळ–आत्माराम

- राघव
  - केशव
    - बाबाजी
      - तुकाराम
- कृष्ण तुळशी
  - अद्वय
    - चिद्‌घन
      - उद्धव (१५७५–१६२०)
      - राघव

म. को. कार चिद्‌घनाचे (पन्हाळ्याचे) गुरु ‘ अचलबाबा ’ म्हणून देतात (!)

ग्रंथः— अनुभवशतक, कविचरित्र, नागनाथचरित्र, बहिरंभटचरित्र, विवेकदर्पण, विरतिआख्यान, हंसराजचरित्र, श्रियाळचरित्र, पदें, गोराकुंभारचरित्र, द्रौपदीचा धांवा, ध्रुवाख्यान, सिद्धान्त, भगवद्गीता, मृत्युंजयचरित्र, शुकरंभासंवाद, भक्तकथामृतसार, भक्तकथामृततत्त्व, गुरुशिष्यसंवाद, संतमालिका, रामदासचरित्र.

उद्धव (चैतन्य)

वि. माहिती:—उद्धव (चिद्घन) व हे एक च. ‘ अनुभवशतकांत ’ शेवटीं यांनीं आपली गुरुपरंपरा ‘ शिवचैतन्यां ’पासून दिली आहे.

ग्रंथः— बोधकलिका (सच्चिदानंदपदांचें विवरण), अनुभवशतक.

उद्धवनाथ

वि. माहिती:—गुरुपरंपरा अशीः—लीलाविषही–मारकी

केशव (१६२३)

उद्धव (१६००–५०)

गोविंद

लक्ष्मण

वासुदेव

पहाः—केशवनाथ, मारकीनाथ.

उद्धवदास

ग्रंथः— पदें.

उद्धवलिंग

ग्रंथः— आरति, श्लोक—हरिहरावर, भगवद्गीतेवर, वेंगुरवाडी येथील गणपतीवर.

उद्धवसुत

वि. माहिती:— उद्धव (चिद्घन) यांचे हि असे व ग्रंथ आहेत.

ग्रंथः— रामदासचरित्र, संतमालिका, पदें वगैरे.

उद्बोधनाथ

वि. माहिती:—(भ. मं) राक्षिनगांवचा देशलेखक ऋग्वेदी यांची मुलगी बालविधवा होती. नांव गंगा. त्याच गांवचा मल्हार नांवाचा यजुर्वेदी वाजसनेयी ब्राह्मण. आडनांव टिपसे. त्याचा मुलगा उद्धव. सिंहस्थांत राक्षसभुवनीं स्नानास जाण्याकरितां उद्धव व गंगा निघालीं. रस्त्यांत **गैबीनाथांचें** दर्शन झालें. त्यांनीं गंगाबाईस उपदेश देऊन '**गुप्तनाथ**' असें नांव ठेविलें. गुप्तनाथांनीं उद्धवास उपदेश देऊन 'उद्बोध' असें त्यांचें नांव ठेविलें. (१५२१ चे पूर्वी).
शिष्य:—केसरी—शिवदिन.

ग्रंथ:— पदें.

उपमन्यु

ग्रंथ:— शिवस्तोत्र.

एकनाथ

वि. माहिती:—पैठणीं यांचे मातापितर यांचे बालपणीं च वारले. आजे व आजी यांचा सांभाळ करीत असत. पूर्वसंस्कारानुसार उपरति होऊन देवगिरीस गेले व सद्गुरु जनार्दनस्वामीजवळ सेवेस राहिले. त्यांच्या सेवेचें फळ म्हणून त्यास श्रीदत्तांचा प्रसाद झाला. तेथून तीर्थाटनास गेले. परत पैठणीं आल्यावर ज्या स्थळीं श्रीसद्गुरूचा संदेश पावला तेथें च म्हणजे तत्कालीन गांवाबाहेर पर्णकुटी करून राहिले, आणि पुढें गृहस्थाश्रम स्वीकारला. यांस महिपतिबुवांचे वर्णनाप्रमाणें हरिपंडित, गंगुताई व गोदुताई अशीं तीन अपत्यें होतीं. प्रसिद्ध मुक्तेश्वर यांचे नातु होते असें समजतात. गुरु:—श्रीजनार्दनस्वामि. समाधिशक:—१५२१ फाल्गुन व॥ ६ रविवार; पैठण येथें यांनीं जलसमाधि घेतली आहे.

ग्रंथः— गोवर्धनोद्धरण, सीतामंदोदरीसंवाद, हस्तामलक, आनंदलहरी, अष्टक, नामसार, गीतामहिमा, बालक्रीडा (दशमस्कंध), भागवत (एकादशस्कंध) रामगीता, अनुभवानंद, नाममहिमा, गीतार्थसार, मुद्राविलास, कालियामर्दन, कौसल्यास्वयंवर, रामायण (भावार्थ), रुक्मिणीस्वयंवर (१४९३), स्वात्मबोध, शुकाष्टक, भागवत (चतुःश्लोकी), एकादशीमाहात्म्य, स्वात्मसुख, प्रल्हादचरित्र, कृष्णदानव्रत भिक्षुगीत, गुह्यपंचक, गणेशविलास (?), चिरंजीवपद, गजेंद्रमोक्ष, भारुड, अभंग वगैरे.

एकनाथ (माधवेंद्र)

ग्रंथः— वेदान्तनिरूपण, पदें.

कचेश्वर

वि. माहिती:—(भ. मं.). खेटक नांवाच्या गांवीं सिद्धेश्वर नांवाचा ब्राह्मण होता. त्याचा मुलगा कचेश्वर (१६३० चा सुमार); यानें देहूस जाऊन अंबाजी (मंबाजी ?)-पासून तुकारामाच्या अभंगांच्या वह्या मागून घेऊन त्यांचें पठन केलें. गुरु—कृष्णंभट. समाधि—माहुलीस. शिष्या—विरूबाई (शाहू छत्रपति यांची दासी).

ग्रंथः— गजेंद्रमोक्ष, सुदामचरित्र, पदें.

कमलाकर

वि. माहिती:—मुल्हेरचे उद्धव यांचे चरित्रांत एका कमलाकराचा उल्लेख आहे. त्याचा काल १६४० चा सुमार आहे. शिवकल्याणाचे पणजे एक कमलाकर होते त्यांचा काल व बालबोधकार त्र्यंबकराय बोवी (निरंजनमाधव ज्यांच्या परंपरेंतील होते ते) यांचे गुरु त्यांचा काल एक व. शिवकल्याणाचे पणजे पयोष्णीतीरीं (खानदेश) तापीनदीचे उत्तरभागीं होते. भ. वि. अध्याय ५७ यांत एका कमलाकराचा उल्लेख आहे. अर्थात् ते महिपतीपूर्वी.

ग्रंथः— पदें.

कर्माबाई

वि. माहिती:—(भ. वि.). अध्याय ३४ यांत यांचा उल्लेख आहे. त्या जगन्नाथच्या राहणाऱ्या.

ग्रंथ:— पदें, अभंग.

कल्याण

वि. माहिती:—बाभुळगांवच्या देशस्थ अश्वलायन ब्राह्मणाचे चिरंजीव. वडिलांचें नांव कृष्णाजीपंत, बंधु दत्तात्रेय. मूळ नांव अंबादास. गुरु:—समर्थ रामदास. काल १५४०–१६३६.

ग्रंथ:— सोलीवसुख, भूपाळ्या, पदें वगैरे.

कविदास (किंकर)

ग्रंथ:— गरुडगर्वशोधन, द्रौपदीवस्त्रहरण, शुकरंभासंवाद, सुदामचरित्र पदें.

कस्मळदेव

ग्रंथ:— पदें वगैरे.

काजी महमद

ग्रंथ:— पदें वगैरे.

कान्तानंद (श्रीधर)

वि. माहिती:—श्रीधर पहा.

कान्हया–कान्हा (हरिदास)

वि. माहिती:—(भ. वि.). अध्याय ५७ त महिपतीनें एका कान्हांचा उल्लेख केलेला आहे गुरु–हरिदास (१६७२ चा सुमार). यांचा काल १६५०–१७०० सुमार. शिष्य—गोविंद (कृष्णदास).
'हरिदास' पहा.

ग्रंथ:—अनुभवरामायण, पदें, भूपाळी.

कान्हो (त्रिमलदास)

वि. माहिती:—'पाताळकाण्ड' नामक ग्रंथांत (अ. १ ओ. ३५–४१) यांचे परम गुरु **वडवाळसिद्ध नागेश** हे होते असें म्हणतात. वडवाळ नागेशांचा काल १२९०–१३४०; तेव्हां यांचा काल १३८० सुमार. कान्हो पाठक व हे एक च आहेत असें दिसतें. पहा:—कान्हो पाठक, नामा पाठक. यांचे गुरुपरंपरेसंबंधीं थोडासा संशय आहे.

ग्रंथ:— पाताळकाण्ड.

कान्हो पाठक

वि. माहिती:—केंदूरकर. कित्येकांचे मतें श्रीज्ञानेश्वरसमकालीन; तथापि कान्हो (त्रिमलदास), व भा. इ. सं. मंडळाचा १८३६ चा अहवाल पहा. गुरु सिद्धनागेश.

ग्रंथ:— भगवद्गीता (गीतासार), अभंग, पदें.

कान्होपात्रा

वि. माहिती:—मंगळवेढें येथील 'शामा' नांवाच्या कलावंतिणीची मुलगी. दामाजीपंताची समकालीन (अ. को.).

ग्रंथ:— पदें, अभंग.

कान्होबा

वि. माहिती:—तुकारामाचे धाकटे बंधु.

ग्रंथ:— अभंग.

कामराज

ग्रंथ:— सुदर्शनचरित.

काशि (अवचितसुत)

वि. माहिती:—अवचित=मनपूर्णा कुळ—सोळंकी

कुळस्वामी—विठ्ठल

काशि (१५८४) त्रिंबक.

प. सं. ९३तःस ' हरिदास ' म्हणविणारे एक काशि आहेत.

ग्रंथ:— द्रौपदीस्वयंवर.

काशिकवि

ग्रंथ:— किंचित् रामायण.

टीप:— अवचितसुत काशि व काशिकवि हे भिन्न आहेत काय ?

काशीनाथ

वि. माहिती:—एक काशीनाथ कृष्णदयार्णवाचे नातू होते. (१६९८ स. शक). पहा—कृष्णदयार्णव.

ग्रंथ:— पदे

काशिराज

वि. माहिती:—सत्कथामृतसागर:—जाडखेड या गांवचे लक्ष्मण यांचे पुत्र काशिराज. यांस केशवाची कन्या जयन्ती नांवाची दिली होती. ही जैतपूर (खानदेश) येथील. काशिराज मुल्हेरीस जाऊन तेथे किल्ल्यावर यवनांचे नोकर होतात. त्यास साल्हेरच्या किल्ल्यावर कैदेत ठेवितात. सुटका झाल्यावर हरघडी गणपतीची उपासना करितात.

गुरुपरंपरा:—लक्ष्मी—मधु—रामानुज—देवाचार्य—हर्यानंद—राघवानंद—रामानंद—अनन्ताचार्य—कृष्णानंद—अग्रानंद—अमरानंद—गोवर्धन—काशिराज (१५४०—१६०० शु.).

शिष्य:—रामदास, विष्णुदास, उद्धव.

टीप:—गाणपत्य निरंजन यांचे गुरु काशिराज म्हणून होते, ते तर हे नव्हत ?

पहा:—निरंजन (१५५९-१६४९).

काशिसुत

ग्रंथ:— पदें.

काळचैतन्य

वि. माहिती:—यांची व उद्धवचैतन्य (चिद्घन) यांची गुरुपरंपरा एक च.

चिद्घन
|
कविकाळ   उद्धव   राघव. हे काळचैतन्य असावे
| (१६११) |
वामो   सखाराम (परळीकर)

कूर्मदास

वि. माहिती:—(भ. मं.) पैठणचे राहणारे. १२३० चा सुमार. (अ. को.) जन्मापासून हे थोटे व पांगळे होते. लहुळ येथें यांची समाधि.

ग्रंथ:—पदें.

कृष्ण (नारायणात्मज)

वि. माहिती:—स्वतःस 'केशवसुत' म्हणवितात, यावरून केशव गुरु.

ग्रंथ:— पदें.

कृष्ण (माधवदास)

ग्रंथ:— पदें.

कृष्ण (याज्ञवल्की)

वि. माहिती:—शिवकल्याणांनी आपल्या श्रीअनुभवामृतावरील टीकेंत कृष्ण-सुत गोपाळ याज्ञवल्की यांचा उल्लेख केला आहे. (१५५७). तेव्हां यांचा काळ १५२० सुमार. या टीकेंतील एका ओवीवरून गुरु-

परंपरा अशी दिसते:-चिदानंद-अच्युताश्रम-कृष्ण-गोपाळ(१५५७). या परंपरेंत कृष्ण याज्ञवल्कीबद्दल संशय आहे. कुलदेवता:--रेणुका म्हाळसा. भ. वि. अध्याय ५७ मध्यें उल्लेख.

ग्रंथ:—रुक्मांगदाख्यान, देवीमाहात्म्य, कथाकल्पतरु (भागवत).

कृष्ण (उदास)

ग्रंथ:-- पदें

कृष्ण (कवि)

ग्रंथ:--नवग्रहलीलामृत, श्रीत्रिंबकमाहात्म्य.

कृष्णकिंकर

ग्रंथ:-- पदें. (का. सं.).

कृष्ण (राय)

ग्रंथ:-- सियाळचरित्र.

कृष्ण केशव

वि. माहिती:—हे स्वतःस केशवसुत म्हणवितात यावरून गुरु केशव; पहा:—नारायणात्मज कृष्ण.

ग्रंथ:—देवीस्तुति, पदें.

कृष्ण (दयार्णव)

वि. माहिती:—पैठण येथें यांची समाधि आहे. तिचेवर असलेल्या श्लोकावरून यांचा समाधिशक १६६२ मार्गशीर्ष शु. ५; यांचे नातु 'काशीनाथ' त्यांची हि समाधि जवळ च तेथें आहे, तिच्यावरील श्लोकावरून त्याचा समाधिशक १६९८ फाल्गुन शु ॥ १५; यांचे मूळ नांव नरहरि; गुरु गोविंद; उपदेश काळ १६१८ श्रावण.

ग्रंथ:— दत्तजन्मोत्साह, विचारचंद्रिका, हरिवरदा (टीका), तन्मयानंदबोध.

कृष्णदास (गोविंद)

वि. माहिती:—(प. सं.) 'गुरुचरित्रा' चा उल्लेख आहे; गुरुपरंपरा:— हरिदास–कान्हा (कृष्ण)–कृष्णदास (गोविंद) १६८०–१७३०: स्वत:स अज्ञानकृष्णदास म्हणवितात.

पहा–कान्हा (हरिदास).

ग्रंथ:— बाळक्रीडा, रासक्रीडा, भस्मासुरवध, रुक्मिणीस्वयंवर, अश्वमेधपर्व, अंबास्तुति, शिवरात्रीचरित्र, कृष्णजन्म, गरुडगर्वपरिहार.

कृष्णदास (दामा)

ग्रंथ:— आदिपर्व.

टीप:— या पर्वांत कृष्णदास 'नामा' चे ऐवजीं 'दामा' हें चुकून पडलेंसें दिसतें.

कृष्णदास नामा

टीप:— विष्णुदासनामा व हे एक आहेत अशी माझी समजूत आहे. तसें असल्यास काल १५४०; गुरु—रामभारती.

पहा—(विष्णुदास) नामा.

कृष्णदास पंडित

ग्रंथ:— कथासारामृत.

कृष्णमुनि

ग्रंथ:— चेंडुफळी. ले. श. १७१६.

टीप:— इति विराटदेशोपनाममाळा पुत्र मयंक राजशिष्य कृष्णमुनि नाम विरचितें चेंडुफळी (?) माझी समजूत हा मानभावपंथी असावा.

कृष्णदास (मुद्गल)

वि. माहिती:—महिपतिबावांचे उल्लेखाप्रमाणें यांचा समाधिशक १५२० म्हणजे नाथांपूर्वी एक वर्ष. पहा—अनंतसुत.

ग्रंथ:— रामायण, रुक्मिणीस्वयंवर, कालियामर्दन, अश्वमेध, सुलोचनाख्यान (!) (ले. श. १६२१).

कृष्णमूर्ति

चि. माहिती:—हे आनंदमूर्तीचे पुत्र. पहा—आनंदमूर्ति. गुरुपरंपरा:—दत्त—दासोपंत—अवधूत—विश्वंभर—कृष्णमूर्ति.

ग्रंथ:— समश्लोकी गीता, लघुवेदान्त (ले. श. १६८०).

कृष्णराज

ग्रंथ:—विष्णुसहस्रनामटीका.

कृष्णार्णव

टीप:— कृष्णदयार्णव व हे एक च असावेत असें वाटतें.

ग्रंथ:— सिद्धान्तसार.

कृष्णानंद.

ग्रंथ:— राधाविलास, कृष्णचरित्र, पदें वगैरे.

टीप:— हे व कृष्णानंद भिन्न.

कृष्णसुत (लल्लप)

ग्रंथ:— बालचरित्र.

टीप:— पहा लल्लप.

कृष्णसुत (कृष्णात्मज)

ग्रंथ:— शिवरात्रिकथा.

कृष्णस्वामि

चि. माहिती:—जयरामस्वामि वडगांवकर यांचे गुरु. यांचें लग्न तुटून एका म्हाताऱ्याचे मुलीशी झालें होतें! 'कृष्णाप्पा' असें हि यांस म्हणत. १५२०—१५७०.

कृष्णानंदनिमग्न

पहाः—कृष्णानंद.

केशव

ग्रंथः— मोक्षवर्ग.

केशव

टीपः—(प. सं.) वरून मच्छनाथाचे शिष्य एक केशव होते (प. ४५३) दुसरे केशव चैतन्य (प. ४००) होते; हे श्रीतुकारामाचे परमगुरु; संग्रहकार काशिराजशिष्य असे एक केशव देतात.

पहाः—केशवस्वामी.

ग्रंथः— श्रीएकनाथचरित्र (र. श. १६८२). करुणाशतक (?) अभंग, पदें.

केशवनाथ

वि. माहितीः—लीलाविग्रही—मारकीनाथ (कदाचित् हे दोघे एक च)—केशवनाथ. यांचे गुरुबंधु उद्धवनाथ व गोविंदनाथ. गोविंदनाथ यांचे शिष्य लक्ष्मण—वासुदेव.

पहाः—मारकीनाथ.

ग्रंथः— गर्भगीता, गुरुगीता (र. श. १६२३ भाद्रपद व. १०).

केशवराज

वि. माहितीः—शिवकल्याणांनीं आपली गुरुपरंपरा श्रीअनुभवामृतावरील टीकेंत दिली आहे ती अशीः—विश्वेश्वर—केशवराज—हरिदास—परमानंद—नित्यानंद—शिवकल्याण (१५५७). यावरून हे व ते केशवराज अवधारीत यांचा काळ १४५० चा सुमार.

ग्रंथः— रामायण.

केशवस्वामि

वि. माहिती:—म. मं. तील एक माहिती आहे ती अशीः—कल्याणीचे आत्मारामपंत व गंगाबाई यांचे पुत्र केशव. ऋग्वेदी. सासरे श्रीधरपंत. समाधिशक १६०४ दुंदुभि पौष १३ गुरवार. मुक्काम भागानगर (निजाम).

गुरुः—पूर्णानंद. कित्येक पदांत (प. मं.) सहजानंद गुरु म्हणून म्हटलें आहे व एके पदांत (६५०) नित्यानंदाचें नांव गुरु म्हणून आहे. अ. को. म्हणतात यांचे गुरु काशिराज होते. शिष्य संतदास.

ग्रंथः— एकादशीचरित्र, पदें वगैरे.

केसरीनाथ

वि. माहिती:—राशीनचे मामलेदार केशव पंडित ऋग्वेदी ब्राह्मण हे च.

गुरुः—उद्बोधनाथ शिष्यः–शिवदिननाथ. केसरीनाथांची समाधि श्री आळंदीस भोजलिंगांच्या समाधीपलीकडे आहे.

ग्रंथः— सिद्धान्तसार, पदें.

टीपः—एक सिद्धान्तसार कृष्णार्णवाचा म्हणून देतात.

कोंडु (कुंडलीश)

ग्रंथः—आत्मबोध, आत्मसुख (र. श. १७१३ फाल्गुन शु. ७ गुरुवार).

कोकिळ (गंगाधर)

वि. माहिती:—भ. मं. कार हे केशवशर्मा भागानगरकर यांचे समकालीन (१५४०–१६०० सुमार) म्हणून म्हणतात; परंतु तें बरोबर दिसत नाही. कदाचित् 'कोकिळ' आडनांवाचे ते कोणी भिन्न असतील. कारण, नृसिंहसुतकृत एक मुकुंदचरित्र (हे मुकुंद मुकुंदराज नव्हत. यांचें नांव ब्रह्मानंद होतें) आहे त्यांत मुकुंदाचे (स. श. १६९७) गुरु कोकिळ गंगाधर होते म्हणून चरित्रकाराची माहिती आहे.

शिष्यपरंपरा:–गंगाधर–महादेव–त्रिंबक–सिताराम–उद्धव (हयात १८३५).

ग्रंथ:— पदें वगैरे.

कोनेर (गंगाजी)

ग्रंथ:— पदें वगैरे.

टीप:— हे च कदाचित् गंगाधर कोनेर असावेत.

कोनेर (गंगाधर)

ग्रंथ:— पदें वगैरे.

कोनेर (नरसिंह)

ग्रंथ:— पदें वगैरे.

कोनेर (नारायण)

ग्रंथ:— देवीची आरती.

कोनेर (रंगनाथ)

ग्रंथ:— पदें.

कोनेर (रघुनाथ)

ग्रंथ:— मुमुक्षुकौस्तुभ, विचारामृत.

कोनेरीदास

ग्रंथ:— शिवगीता.

खंडेराय

वि. माहिती:—गुरुपरंपरा:—आत्माराम–गोपाळनाथ–खंडेराय.

पहा–गोपाळनाथ.

ग्रंथ:— तुकाराम–नामदेव–एकनाथ–चरित्र.

खंडोअर्जुन

ग्रंथ:— पदें वगैरे.

गणपति

वि. माहिती:—प. सं. वरून हे नीलकंठशिष्य होते असें दिसतें (प. १९८).

गणू यशवंत

ग्रंथ:— पदें वगैरे.

गणेश

ग्रंथ:— पदें वगैरे.

गणेश आत्माराम

टीप:— आधुनिक असावा.

ग्रंथ:— रामगीता (ले. श. १७८३).

गणेशदास

ग्रंथ:— गणेशगीता (टीका).

गणेशनाथ

वि. माहिती:—भ. मं व महिपतिबुवा यांस समर्थकालीन लेखतात. शिवाजी महाराजांची व यांची गांठ पडली होती. राहणें मूळ सारसी उज्जनी; शिष्य—विठ्ठलनाथ.

ग्रंथ:— पदें.

गयनीनाथ

वि. माहिती:—गुरुपरंपरा:—श्रीआदिनाथ—श्रीमच्छेंद्र—श्रीगोरक्ष-श्रीगयनी-(गाथिणी)-नाथ.

ग्रंथ:—पदें, अभंग वगैरे.

गरीबनाथ

ग्रंथ:— पंचीकृत विवेक.

गिरि (विप्र)

ग्रंथ:— पदें.

गिरिआत्मज

ग्रंथः— वेंकटाष्टकस्तोत्रदशक (के. श. १६५८).

गिरिधर

वि. माहिती:—मिरज–तासगांवचे राहणार. गुरुपरंपरा:—श्रीसमर्थ–वेणाबाई–गिरिधर. यांचे एकंदर लहानमोठे ४० ग्रंथ आहेत. श्रीसमर्थप्रताप-निवृत्तिराम, सप्तरामायणें, पदं (कानडी, मराठी).

गिरिसुरी

ग्रंथः— पदें.

गुंडिराय

वि. माहिती:—(बडवाळसिद्ध) नागेश–अनंत–(नादसुत) धुंडी अमर बोडि–गुंडि.

ग्रंथः— आत्मशोध.

गुणिदिन

ग्रंथः— पदें.

गुप्तानंद

ग्रंथः—. पदें.

गुरुदास

वि. माहिती:—हे शिवरामस्वामींचे गुरुबंधु; यांचे गुरु पूर्णानंद (नारायण).

ग्रंथः— गुरुबोध, तारकबोध, श्रीकृष्णदर्शनविलास, श्रीनाथद्वादशमहावाक्यविलास.

गैबीनाथ

वि. माहिती:—श्रीज्ञानेश्वर महाराजांचे परंपरेंतील (१५२०–१५८०). गुरुपरंपरा:—श्रीज्ञानेश्वर–सत्यामल–गैबी. शिष्यपरंपरा:—(गैबी)—गुप्तनाथ–उद्बोध–केशव.

ग्रंथः— पंचीकरणविवेक (श. श. १५७६), पदें.

गोणाई

ग्रंथः— अभंग.

गोपाळ

वि. माहितीः—हे ओतूरचे रहाणार. कविचरित्रकार यांस नेवाश्याचे रहाणार म्हणतात. गुरुः—अनंत (कर्णपर्वांत १ ले अध्यायाचे शेवटीं गुरूचें नांव अनंत दिलें आहे).

ग्रंथः— तिथिसार, भारत (र. श. १६९०) पंढरीमाहात्म्य, महालया-माहात्म्य, व्यंकटेशमाहात्म्य, शिवरात्रिकथा.

गोपाळदास

वि. माहितीः—अनंत व गोपाळ या दोघांनीं मिळून काव्यें केलीं आहे यांचे गुरु जयरामस्वामी वडगांवकर (१६१२). एका गोपाळाचे गुरु अनंत होते हें मागें दिलें च आहे.

पहाः—अनंत, जयराम, गोपाळ.

ग्रंथः— कथाकल्पतरु, पदें, भगवद्गीताटीका (पदबोधिनी ही भिन्न आहे). र. श. १६१६।१७ युवा. नाशिकक्षेत्रीं संपूर्ण.

गोपाळनाथ

वि. माहितीः—१ (भ. मं.) गंगाकांठीं सलाबतपूर येथील गोविंद व आनंदीबाई यांचे पुत्र. वाजसनेयी कौंडिण्यगोत्र. गुरुः—मारकी (वऱ्हाड) येथील रंगनाथ. समाधिः—माहुली येथें १६८८ श्रावण ३०. शिष्य–शाहूराजे.

२ प. सं. यावरून गुरुपरंपरा जी दिसते तीः—आत्माराम–गोपाळनाथ–खंडेराय.

३ देवनाथाचे शिष्य गोपाळनाथ (१६७६–१७४३).

४ देवनाथाचे परमगुरु गोपाळनाथ.

५ जयरामस्वामी वडगांवकर यांचे शिष्य गोपाळ.

यावरून जे काल ठरतात ते:—

जयरामशिष्य गोपाळ (गोपाळदास) … …	स. श. १६१२
रंगनाथशिष्य गोपाळ … … … …	स. श. १६८८
देवनाथशिष्य गोपाळ … … …	१७५० चा सुमार.
देवनाथांचे आजेगुरु गोपाळ … …	१६०० ,,
अनंतशिष्य गोपाळ	

ग्रंथः— वेदान्तरहस्य, सप्तशति. (यांत गुरु आत्मारामाचा उल्लेख आहे).

टीपः— माझे मतें हा ग्रंथ गोपाळयाज्ञवल्की यांचा असावा.

गोपाळ बोध

ग्रंथः— पांडुरंगमाहात्म्य, प्रकाशबोध.

गोपाळ याज्ञवल्की

वि. माहितीः—कृष्ण याज्ञवल्कीचे पुत्र. यांचे विनंतीवरून शिवकल्याणांनीं चिदानंदी टीका केली.

पहाः—शिवकल्याण.

गोपाळ रघुनाथ

ग्रंथः— पद.

गोपाळस्वामी

वि. माहितीः—पहा—गोपाळनाथ. समाधिशक १६१२ अश्विन वद्य ११.

गोपाळात्मज

वि. माहितीः—यांचें नांव कदाचित् 'गोविंद' असावें. एके ठिकाणीं 'गोपाळात्मज गोविंदानें' असा उल्लेख आहे.

ग्रंथः— पदें.

गोपाळतनु

ग्रंथः— भगवद्गीता. यानें ग्रंथान्तीं 'कर्नाटक विठ्ठल' याचे प्रसादानें असा सविशेषण विठ्ठलाचा निर्देश केला आहे.

गोरक्षनाथ

ग्रंथः-- सिद्धसिद्धान्तपद्धति (सं.), गोरक्षअमरना थसंवाद, गोरक्षकल्प गोरक्ष-शतक, गोरक्षसहस्रनाम (?), गोरक्षगीता, विवेकमार्तंड, गोरक्ष-किमयागर.

गोरा

वि. माहितीः—एके ठिकाणी असा उल्लेख आहे—म्हणे गोरा कुंभार । हे सत्रावीचें क्षीर । सेवी निरंतर । नामदेव ॥ यावरून नामदेवानंतर.

ग्रंथः-- पदें, अभंग वगैरे.

गोवर्धन

ग्रंथः-- औषधें. १५४०—१६२०; कारण दिनकर रामदासी समकालीन.

गोवळशिष्य

टीपः— यांनीं 'एकाजनार्दनाचा' उल्लेख केला आहे.

ग्रंथः—ज्ञानसिंधु.

गोविंद

वि. माहितीः—गुरु अथवा पिता नरहरी.

ग्रंथः—हरिभजन.

गोविंद (वणीकर)

वि. माहितीः—हे देवनाथाचे जे गुरु गोविंदनाथ ते असावे असें वाटतें. (१६५०—१७१० सु.) हे संसारी असून गाणरज्ञ होते.

ग्रंथः— वेदस्तुति.

गोविंद (कृष्णदास)

वि. माहितीः—गुरुपरंपराः—हरिदास-कान्हा (कृष्ण)—गोविंद (१६८०—१७३०).

ग्रंथः— हरिवंशाख्यान.

गोविंद (हरिदास)

टीप:— मागील तर नव्हे ?

गोविंद (विप्र, वैद्य)

ग्रंथ:— रसविलास, कथासारचंपू.

गोविंददास

ग्रंथ:— उद्धवगोपीसंवाद.

गोविंद (बकसन)

ग्रंथ:— नामदेव-कबीर-रोहिदासचरित्र. (व्रिज).

गोविंद (साळी)

ग्रंथ:— पदें.

गोविंदसुत

ग्रंथ:— त्रिमलाची आरती.

गोसावीसुत-नंदन

वि. माहिती:—तंजावरकडील गोस्वामि व नागाई यांचे पुत्र; नांव वासुदेव. यांचे गुरु निरंजनस्वामि होते असें म. कोशकार म्हणतात. (१५८०-१६५० सु.).

ग्रंथ:— त्रिंबकरायाची आरती, शंभुपंचक, रेणुकाष्टक, सीतास्वयंवर, ब्रह्म-मोदक, गंगाष्टक, गणपतिश्लोक, सुदामचरित्र, पदें.

गंगाधर

वि. माहिती:—' निर्णयसिंधु ' नंतर यांची ग्रंथरचना झालेली आहे.

ग्रंथ:— आशौचनिर्णय (आशौचगंगाधरी).

गंगाधरबाबा (श्रेष्ठ)

वि. माहिती:—श्रीसमर्थांचे ज्येष्ठ बंधु. गृहस्थाश्रमी. १५२७–१५९९ फाल्गुन व. १३।१४. समाधि–दहिफळ. समर्थांनंतर त्याचे संस्थानावर श्रेष्ठांचे नातु गंगाधरबाबा आले.

ग्रंथ:— भक्तिरहस्य, सुगमोपाय.

गंगाधरशास्त्री

ग्रंथ:— भामाविलास, रसकल्लोळ.

गंगाधरसुत

टीप:— हे अमृतराय का?

गंगानंदन

ग्रंथ:— पदें.

गंगाराम

ग्रंथ:— पदें, अभंग.

गंभीरनाथ

ग्रंथ:— पंचीकरण.

गंभीरसुत

ग्रंथ:— दानलीला, राधाविनोद.

पहा—जयराम.

चतुरसाबाजी

ग्रंथ:—बलिदानकथा, रावणगर्वपरिहार.

घनभुज

ग्रंथ:—पदें.

चांगदेव

वि. माहिती:—चांगदेव एकंदर तीन. वटेश्वर, मुधेश, केशवदास. पैकीं वटेश्वर यांनीं श्रीसोपानदेवाबरोबर संवत्सरग्राम" (सासवड) शक १२१९ मध्यें समाधि घेतली. गुरु मुक्ताबाई.

मुधेश यांनीं पुणतांब्यास शक १४२७ ज्येष्ठ शु. ७ स समाधि घेतली.

केशवदास हे शिवकल्याणांचे (१५५७) गुरुपरंपरेंतील त्यांचेपासून ९ वे. पहा:—चिंतामणिसुत.

ग्रंथ:— वटेश्वर चांगा यांचे—प्रश्नपत्रिका, उत्तरपंचविशी (?), नमन, हरिपाठ, अभंग.

चिंतामणि

वि. माहिती:—प. सं. वरून यांचे गुरु गोविंद होतेसें दिसतें. दैवत नरहरी. यांनीं मोरोपतांस नमन केलें आहे, म्हणून आधुनिक.

ग्रंथ:—गोपीचंदाख्यान, सीतास्वयंवर, अभंग, पदें.

चिंतामणिसुत

वि. माहिती:—हे शिवकल्याणांचे वडील. मूळ नांव त्रिमल. यांचें चतुर्थाश्रमींचें नांव नित्यानंद. यांची पितृपरंपरा अशी:—नित्यानंद (अंबानगरीचे)–कमलाकर (पयोष्णीतीरींचे)–चिंतामणी–त्रिमल (नित्यानंद)–(शिवकल्याण). गुरुपरंपरा अशी:—श्रीआदिनाथ–मच्छेंद्र–चौरंगी–गोरक्ष–मुक्तनाथ–वटेश्वर–चक्रपाणी–विमलानंद–चांगा (केशवदास)–जनकराज–नृसिंह–हृदयानंद–विश्वेश्वर–केशवराज–हरिदास–परमानंद–नित्यानंद.

ग्रंथ:— पदें.

चिंतोराम

ग्रंथ:— ध्रुवचरित्र.

चिदंबर

वि. माहिती:—हे बापु गोखले यांचे गुरु. समाधि गुरलहोसूर येथें.

ग्रंथ:— निजात्मबोध, पदें.

चिदानंद

वि. माहिती:—हे पूर्णानंदशिष्य. गुरूंनीं यांच्या विनंतीवरून ' अवधूतगीता रचिली; यांचें पूर्वीचें नांव बल्लाळ. कुरुक्षेत्रीचे रहाणार. पितृपरंपरा अशी:—गणेश—गोविंद—बल्लाळ (चिदानंद).

पहा:—पूर्णानंद.

चिदानंदानुचर

पहा:—अच्युताश्रम.

चिन्मयानंद

ग्रंथ:—पदें.

चिन्मयस्वामि

ग्रंथ:—सिद्धान्तकल्पलता.

चेटोहरदेव

ग्रंथ:—गीतगोविंद.

चैतन्यनाथ (तुकेशसुत)

ग्रंथ:— स्वरूपविवरण.

चैतन्यसिद्ध

पहा:— सिद्धचैतन्य.

चैतन्यस्वामि

ग्रंथ:— पांडवकथासार.

चोखामेळा

ग्रंथ:— विवेकदर्पण, पदें, अभंग.

चोख्याची महारी

ग्रंथः— अभंग.

चोंभा

ग्रंथः— उषाहरण.

चंद्रचूड

ग्रंथः— पदें.

चंद्रात्मज (उदास)

वि. माहितीः— यांनीं आपल्या उद्योगपर्वांत मुक्तेश्वरांस नमन केलें आहे.

गुरुपरंपराः— श्रीदत्त–अद्वैतानंद–योगेश्वर–हंस–अमृत—ब्रह्म–निर्मळ–चिदानंद–प्रसन्नानंद–रामानंद–व्यंकटनाथ.

चंद्रात्मजः— १६००—१६५० सुमार. यांसच 'रुद्र' म्हणत काय ? का हे भिन्न आहेत ? यांनीं उद्योगपर्वांत आपल्या पित्याचें नांव ' दुंदुभी ' दिलें आहे.

ग्रंथः— गोकर्णमाहात्म्य (ले. श. १६८७), महाभारत.

जगजीवन

वि. माहितीः—औरंगाबादेजवळील राजपूर येथील राहणार. सुमार १६३७.

गुरुः—परमानंद.

ग्रंथः— विक्रमबात्तिशी, रामायण (बालकांड, उत्तरकांड, जटायू–आख्यान केकी आदि) श्रीपानज्ञान संज्ञा, ज्ञानमूळ, ज्ञानगीता, नूरबोध, पदें.

जगजीवनप्रभू

टीपः— जगजीवन व हे एक च काय ?

ग्रंथः— सुग्रीवकुंभकर्णसंवाद, सीताबिभीषणसंवाद, शतमुखरावणवध, जयद्रथवध, गोहकाख्यान, उपमन्युचरित्र, साधूंचा महिमा, श्रीरामअंजनीसंवाद, जालंधराख्यान, कल्याणनमन, मोरेश्वराख्यान, खंडेराया-

ची आदि, रामायण-बालकांड, पेटीची कथा, रामेश्वरकथा, सीता-त्रिजटासंवाद, हरिश्चंद्राख्यान, हयग्रीवाख्यान, ध्रुवाख्यान, ' भीमे कसा आणिला ' जांबुलकथा, कथा सावजाची, मंदोदरीआदि, अश्वमेधकथा, उत्तरकांड, नलरामदशरथसंवाद.

जगजीवनात्मज

ग्रंथः— पदें.

जगदीश

ग्रंथः— पंचसमासी (१७४०), पंचीकरण, गोपीचंदाख्यान (गुजराथी

जगदीशसुत

टीपः— आधुनिक.
ग्रंथः— पदें.

जगन्नाथ

वि. माहितीः—हे जगन्नाथ व बोधवैभवकार कदाचित् एक च असावेसें वाटतें.
ग्रंथः— आत्मबोध (टीका).

जगन्नाथ

वि. माहितीः—(ल. का.) श्रीधरांचा ' रामविजय ' पाहून काव्यरचनेची स्फूर्ति झाली असें हे स्वतः म्हणतात. जिल्हा वर्धा मौजे पालकवाडी येथील राहणारे; जातीचे कोष्टी; यांचें महाभारत लावणीवृत्तांत आहे.
ग्रंथः— मारुतिजन्मवर्णन, भारत, रामायण, शशीसेनाख्यान.

जगन्नाथ

वि. माहितीः—यांचे गुरु अखंडाश्रम ऋषि (ऋषीश्वर); ग्रंथरचना १६१६-९४ पावेतों आहे.
ग्रंथः—बोधवैभव, गीताटीका, पंचदशी-व्याख्यान, तत्त्वविवेक, श्रुत्युपदेश ज्ञानबत्तिशी, वाक्यसुधा, दृक्दृश्यविवेक.

जगमित्र (नागा)

चि. माहिती:—परळी वैद्यनाथ येथील नागदेवभट्ट ब्राह्मण. शक सुमार १२५२.

ग्रंथ:—अभंग, पदें.

जनजसवंत

चि. माहिती:—शक १५३० मध्यें बागलाणचा सुभा प्रतापशा म्हणून होता त्याचा पुरोहित जनार्दन. त्यांचे पुत्र जसवंत (यशवंत). राहणार मुल्हेर. यांचा छल होऊन यांची मोट बांधून प्रवाहांत टाकलें असतां श्रीरामांनीं यांस तारिलें म्हणून ' जन ' हें उपपद मागें लागलें. बोरटें (खानदेश) गांवीं वास. गुरु-तुलसीदास. समाधिकाळ संवत् १६७४; शक १५३९।४० फाल्गुन शुद्ध ८ तापीतीर. यांचें चरित्र ' रघुनाथदास ' यांनीं लिहिलें आहे.

ग्रंथ:— पदें, दोहरे वगैरे.

जननाभा

ग्रंथ:— पदें.

जनपंडित

ग्रंथ:— पदें (हिंदुस्थानी).

जनभट

चि. माहिती:—स्वतःस ' जमालशाचा अंकित ' म्हणवतो. पहा-जमालशा.

ग्रंथ:— अभंग.

जनार्दन

चि. माहिती:—देवगड अथवा दौलताबाद येथील यवनातर्फे किल्लेदार व मुत्सद्दी (१४२६-१४९७); यांचे गुरु श्री शहादत्त अल्माप्रभु.

ग्रंथ:— श्रीदत्तस्तुति, उपदेश, समाधिप्रकरण.

जनार्दनपंत

वि. माहिती:--यांचे गुरु नृसिंहसरस्वति.

ग्रंथ:— मारुतीजन्म, रामस्तुति, आरती, दामाजीचें चरित्र.

जनाबाई

वि. माहिती:—गुरुपरंपरा:—मत्स्येंद्र–गोरक्ष–शांभव–अद्वयानंद–प्रभव–गैनी–निवृत्ति–श्रीज्ञानेश्वर–विसोबा–नामदेव–जनी.

ग्रंथ:—द्रौपदीस्वयंवर, कृष्णजन्म, स्थालीपाक, अभंग वगैरे.

जनीजनार्दन

वि. माहिती:—मूळ नांव जनार्दन, वाजसनेयी गोली, बीड येथील राहणार. एकनाथांचे गुरुबंधु. गुरु—जनार्दन. समाधि मूस येथें १५२३ श्रावण व॥ ७.

ग्रंथ:— निर्विकल्प (उद्धव-कृष्ण-संवाद–भागवत ११ स्कंद), अभंग वगैरे.

जमालशा

वि. माहिती:--मूळ नांव विश्वनाथ. मनाचें समाधान होईना म्हणून गंगेंत जीव देऊं लागला असतां श्रीदत्तांनीं मलंगवेषानें तारिलें. तेव्हांपासून वेष फकीराचा. नांव बदलून जमालशा ठेविलें.

शिष्य—जनभट. (भ. मं).

ग्रंथ:— पदें.

जयरामस्वामि

वि. माहिती:--कान्राबाद मांडवगडचे भिकाजीपंत–कृष्णाबाई यांचे पुत्र. जन्म श्रावणांत कृष्णजयंतीचे दिवशीं.१५२१ नंतर बाप वारल्यावर आई-सह पंढरपुरीं येऊन गोपाळपुरीं तपाचरण. तेथून सप्तशृंगीतप. नंतर जोगाईच्या अंब्यास गमन केलें. गुरुपरंपरा:–शांतलिंग (जंगम) कृष्णाप्पा (अभ्यंकर १५४५)–जयरामस्वामि. समाधिशक १५९४ भाद्रपद व० ११. शिष्य–अनंतभट व गोपाळ.

ग्रंथः-- सीतास्वयंवर, अपरोक्षानुभूति, ज्ञानभक्तिसंवाद, रुक्मिणीस्वयंवर, भागवत (१० स्कंद), प्रबोधसुधाकर (तं), पदें.

जयराम

वि. माहितीः—गंभीरसुत असें हे स्वतःस म्हणवितात. पहाः-गंभीरसुत.

ग्रंथः---राधाविनोद, दानलीला.

जयरामगोसावी

वि. माहितीः—(अ. को.) 'जयरामगोसावी' म्हणून एक रामदासी देतात ते बत्तिसशिराळ्याचे.

ग्रंथः---शांतिपंचीकरण.

जयराम

वि. माहितीः---यांचे गुरु सर्वानंद.

ग्रंथः---एकादशी-आख्यान.

जयरामस्वामि

वि. माहितीः—हे पुणें प्रांताचे राहणारे होते. यांच्या उपलब्ध असलेल्या ग्रंथावरून हे व रामदासी जयराम गोसावी असे एक च असावे अशी शंका येते.

ग्रंथः— जयबोध (दासबोधाची टीका).

जयरामात्मज

वि. माहितीः—(प. सं.) हे गोसावीनंदाच्या मागाहून झालेले आहेत. यांनी कोकिळ गंगाधर, राघवचिद्घन, श्रीधर, अनंत यांचा आपले संतमालिकेंत उल्लेख केलेला आहे. गुरु 'गोपाळ' असावा असें दिसतें. पहाः—बस्वलिंग.

ग्रंथः— संतमालिका, द्रौपदीचा धावा, पाळणे, अंबेची आरती.

जिंदा फकिर

ग्रंथः— पदें.

जीवनप्रभू

वि. माहिती:—यांचे गुरु शहाअली. जर शाहहुसेन व शहाअली एक च असतील तर शहाअलीचा काळ शक १३००.

ग्रंथः— पदें.

जीवन्मुक्त

वि. माहिती:—एकेहळ्ळीजवळ अन्वार म्हणून एक गांव आहे तेथें यांचा मठ आहे, यावरून यांची समाधि तेथें असावी. यांस तिकडे मुक्तेश्वर म्हणतात. हे श्रीज्ञानेश्वरसंप्रदायी. श्रीज्ञानेश्वरानंतर यांचेंच नांव तिकडे घेतात. यावरून यांस प्रसाद श्रीज्ञानेश्वरमहाराजांचाच असावा असें वाटतें.

ग्रंथः— जीवन्मुक्ति (गीताप्रभाकर) जीवन्मुक्तिवाक्य (गद्य).

जीवनसुत

ग्रंथः— पदें.

जिवा

ग्रंथः— सूर्यनामावळी.

जोगा (परमानंद)

वि. माहितीः—हे श्रीज्ञानेश्वरसमकालीन असें समजतात. यांचे कवनाचे लेखक विसोबा खेचर हे होते अशी समजूत आहे. अ. को. म्हणतात, हे बारशींचे सूर्योपासक. यांस ' नवलक्ष साळ्या ' म्हणत असत (?).

ग्रंथः— पदें, अभंग.

जोतिबा

ग्रंथः— पदें.

जंगली फकीर (सैद हुसेन)

वि. माहिती:— यांचें दैवत वडवाळसिद्ध नागेश. भ. वि. अ. ५७ मध्यें यांचा उल्लेख आहे.

ग्रंथः— तारकामुरवव.

ज्योतिपंत (महाभागवत)

वि. माहितीः— यांचें मूळ गांव बुध (सातारा). गोपाळ नांवाचे भटांचे पुत्र. कांहीं दिवस पेशव्यांची सेवा करून उपरति झाल्यानें श्रीकाशीस जाऊन भागवत-पारायण केलीं. व्यासांचा प्रत्यक्ष प्रसाद म्हणून एक भागवताची पोथी त्यांस मिळाली ती अद्याप त्यांचे मठीं (चिंचणेर–सातारा) आहे असें म्हणतात. यांनी विठ्ठलाचीं अनेक देवालयें बांधिलीं. यांचें कीर्तन ऐकून प्रल्हादबुवा बडवे यांस उपरति झाली. यांचे गादीवर शिष्यपरंपरा नसून पुत्रपरंपरा आहे. (१६०१–१७१० सुमार).

ग्रंथः— भागवत, अभंग, पदें.

ठाकूरदासबाबा

ग्रंथः— सहजबोध.

तन्मयानंद

ग्रंथः— ' अद्यापि ' ज्ञानबोध.

तानसेन

वि. माहितीः— (भ. को.) गौडब्राह्मण. एका फकिरानें गाण्यास शिकविलें. उज्जनीस पूर्वी; नंतर अकबराकडे.

ग्रंथः— पदें.

तात्याजी महिपति

ग्रंथः— शनिमाहात्म्य.

तानाजी

ग्रंथः— तुळशीची आरती.

तानाजी (देशमुख)

टीपः— हे व वरील एक च काय ?

ग्रंथः— सासुरवास, अंबास्तव.

तारकपंडित

ग्रंथः— पदें.

तुकयाबंधु

वि. माहितीः—तुकाराममहाराजांचे धाकटे बंधु कान्होबा.

ग्रंथः— अभंग.

तुकयादासी

ग्रंथः— अभंग.

तुकानंद

ग्रंथः— गीताव्याख्यान.

तुका नागनाथ

वि. माहितीः—परळी वैजनाथ येथें श्रीनागनाथाचे समोर अद्याप तुकारामाची समाध म्हणून दाखवितात. चुकून देहूकर तुकाराम म्हणून त्यास म्हणतात.

ग्रंथः— गीतगोविंद, नीतिशृंगार.

तुकाराम

वि. माहिती:—यांचा जन्मशक निश्चित नाहीं; परंतु १४९० हा गणतात. संसारतापानें उपरति झाली. बाबा चैतन्य यांचा स्वप्नांत अनुग्रह झाला. त्या दिवसापासून यां परंपरेंत प्रत्यक्ष मंत्रानुग्रह नाहीं. स्वतः चालत जाऊन जलसमाध घेतली. सदेहमुक्तीसंबंधीं विठ्ठलनाथासारख्या समकालीनांची साक्ष आहे. समाधिशक १५७१. देहू.

ग्रंथः— निजधामगमनप्रसंगींचे अभंग (?), दशावतार, गीता, उद्बोधाचे पन्नास उत्तर, नित्यपाठ, द्रौपदीवस्त्रहरण, पत्रिका, प्रल्हादचरित्र सिद्धपाल–सुदाम-चरित्र, हरिपाठ, नीति–चरित्र–उपदेश–स्तुतिपर अभंग, विराण्या, भारुड वगैरे.

तुकावर्दे

ग्रंथः— अभंग वगैरे.

तुकाविप्र

वि. माहिती:—गोदावरींचे कांठीं अंजनवती नांवाचें गांव आहे, तेथील विप्रनाथ नांवाच्या गृहस्थाच्या मुलीचा मुलगा. याचें गांव रहिमतपूर. उपदेश आजानें केला. बदरीवनांत तप केलें. समाधि अंजनवतीस. ज्योतिपंत महाभागवत यांचे समाधीचा उल्लेख यांनीं केला असल्यानें १७१० नंतर याची समाधि असली पाहिजे. १६६२–१७१२ (अ. को.).

ग्रंथः— आत्मसिंधु, सुदामचरित्र, भानुदासचरित्र, कालियामर्दन, आरती कीर्तनरंगाची.

तुकासुंदर

ग्रंथः— अभंग, नासिकेताख्यान.

तोडरमल

ग्रंथः— पदें.

तोंडीदास

ग्रंथः— पदें.

त्रिंबक (राज)

वि. माहिती:—'त्र्यंबकी' (वैद्यकीवरील ग्रंथ) करणारे त्र्यंबक व 'बालबोध' करणारे त्र्यंबक यांचें वर्णन बहुतेक जुळतें, सबब हे एक असावेत असें वाटतें. तसें असल्यास मूळस्थान कोल्हापूर. बालबोधकार त्रिंबक आपले गुरु कमलाकर देतात. यांचा काल १४९० चे पूर्वीचा. शिवकल्याणांचे पणजे कमलाकर होते त्यांचा हि तो च काल येतो. परंतु ह्या दोन्ही व्यक्ति एक च कीं नाहीं हें निश्चित नाहीं.

ग्रंथः—त्र्यंबकी, बालबोध (१४९०).

त्रिंबक द्विज

वि. माहिती:—त्रिंबक द्विज, त्रिंबक नाशिककर, त्रिंबक भंगी असें तीन त्रिंबक आहेत. त्रिंबक द्विज हे बहुधा भारतकार असावेत. मध्वमुनीश्वरांचें पूर्वीचें नांव त्रिंबक नाशिककर होतें म्हणून महिपति म्हणतात.

ग्रंथः— अभिमन्युविवाह, विदूरनीति, प्रल्हादचरित्र.

त्रिंबक (नाशिककर)

वि. माहिती:—पहाः-त्रिंबकद्विज, मध्वमुनीश्वर.

ग्रंथः— पदें.

त्रिंबक (नाईक)

ग्रंथः— बारामाची (राधाविलाप).

त्रिंबक चौंडे

ग्रंथः— प्रातःस्मरामि, नामावळि.

त्रिमल्ल

वि. माहिती:—शिवकल्याणाचे वडिल व गुरु त्रिमल्ल ऊर्फ नित्यानंद हे होते ते च हे काय ?

ग्रंथ:— उपनिषत्सार, पदें.

त्रिमल्लसुत

पहा:—शिवकल्याण.

त्रिविक्रमबाळ

वि. माहिती:—गुरु—गोवर्धनपुरी.

ग्रंथ:— निजबोध, भक्तियोग.

त्र्यंबकसुत—नंदन

ग्रंथ:— पदें.

त्र्यंबकदास

ग्रंथ:— देवाची आरती.

दगडो शिवदास

वि. माहिती:—यांनीं केलेल्या 'निर्वाणसार' नांवाच्या ग्रंथाच्या पहिले अध्यायावरून कावडीसिद्ध नागेश्वर यांस गुरु म्हटलें आहे. परंतु १२ वे अध्यायांत तापीनाथ यांस गुरु म्हणून नमन आहे. तेव्हां खरा गुरु कोण हें अनिश्चित आहे. नमनांत चांगावटेश्वरापर्यंतच उल्लेख आहे. पुढील संतकवींचीं नांवें नाहींत. काल बहुधा १४००.

ग्रंथ:— निर्वाणसार (ले. श. १६९१).

दत्त

टीप:— स्वतःस एकनाथसुत म्हणवितात.

ग्रंथ:— निरंजनाष्टक. चिल्लरचरित्र, श्लोक, गुरुचरित्र (र. श. १७३०).

दत्त (अवधूत)

वि. माहिती:—गुरु अच्युत. ज्ञानामृताचे ५० वे ओळींत अच्युतांचें नांव आहे.

ग्रंथ:— शिवबोध, ज्ञानामृत.

दत्त अवधूत (निरंजन अवधूत)

वि. माहिती:—वरील व हे भिन्न होते असें भिन्न गुरूवरून वाटतें. यांचे मूलस्तंबाचे ६ वे अध्यायाचे आरंभीं " श्रीगुरु सदाशिव । रामानंद गुरुदेव । पूर्णानंद स्वयमेव । अवतरले ॥ " असें आहे, यावरून ही गुरुपरंपरा असावी असें वाटतें.

ग्रंथ:— मूलस्तंब (ले. श. १७९४).

दत्तादिगंबर

ग्रंथ:— पदें.

दत्तप्रसिद्ध

ग्रंथ— पदें.

दत्तशिष्य

ग्रंथ:— पदें.

दत्तात्रेय

ग्रंथ:—अमृतार्णव.

दयानंद

ग्रंथ:—पदें.

दयार्णवानुचर

ग्रंथ:— शिवरात्रिकथा.

दयाळनाथ

वि. माहिती:—हे एकनाथसंप्रदायी. नाथांपासून १४ वें पुरुष. गुरुपरंपरा:— गोपाळनाथ–गोविंदनाथ–देवनाथ–दयाळनाथ.
(१७१०–१७५८) समाधि–भागानगर.

ग्रंथ:— राधाविलास.

दादुपिंजारी

ग्रंथः— विचारसागर (हिं.) सुमार १४५०.

दादोरंगनाथ

ग्रंथः— मल्हारीस्तोत्र.

दामाजी

ग्रंथ— पदें.

दामोदर

ग्रंथः— भगवद्गीता.

दामोदरदास

ग्रंथः— पदें.

दामोदरयोगी

टीपः— स्वतःस नुसतें ' दामोदर ' हि म्हणवितात. यावरून मागील तर नव्हत ?

ग्रंथः— बोधचौसष्टी, लिंगमाला (हे दोन ग्रंथ भिन्न दामोदरांचे असावे असें वाटतें).

दास

वि. माहितीः—दुसरें मुकुंद (नाथांचें चरित्रकार) यांचे शिष्य ' दास ' म्हणून होते. श्रीसमर्थ स्वतःस ' दास ' म्हणवीत असत.

ग्रंथः— पदें.

दास अनंत

ग्रंथः— सुदामचरित्र, त्रिलोचनपरिचई, कबीरपरिचई (हीं दोन भिन्न)—पदें.

दास दास

ग्रंथः— पदें.

दास दास परमानंद

वि. माहिती:—दास दास व दास दास परमानंद एक च असल्यास नकळे: यांची गुरुपरंपरा:—हरिदास-परमानंद. शिष्यपरंपरा:—परमानंद-नित्यानंद--शिवकल्याण; तेव्हां दास दास परमानंद हे स्वतः परमानंद तरी असावे किंवा शिवकल्याण असावेत.

ग्रंथ:— पदें.

दासनिरंजन

वि. माहिती:—हे एक तर स्वतः निरंजन असावे किंवा निरंजनदास म्हणजे निरंजनाचे शिष्य असावे. पहा:– निरंजन.
गोसावीनंदन (वासुदेव) हे निरंजनदास होते.
पहा:—गोसावीनंदन.

ग्रंथ:— स्थालीपर्व.

दासानुदास (अनंतसुत राम)

वि. माहिती:—तंजावराकडील. होसपूर (वेणूनदीतीर) येथील राहणारे. ऋग्वेदी गौतमगोत्री.

ग्रंथ:—सिद्धानुभव (१६२३), ज्ञानसंन्यास (१६२६) शुकज्ञानबोधटीका (१६३१), काबाजीवलम (१६२२), ज्ञानामृत (१६२२), ज्ञानसागर (१६२३), अनुभवसार.

दासोपंत

वि. माहिती:—यांचे वडिलाकडून यवनाचे सेवेत अंतर पडल्यावरून यांस ओलीस ठेवून बेदरहून वडिल परत आले. यांस यवनांनी कैदेंत ठेवून मुसलमान करण्याचें ठरविलें. या प्रसंगांतून यांची दत्तांनी सुटका केली. समाधि ओंगाईचें अंबे येथें. तेथें हल्लीं दोन मठ आहेत. गुरुः—श्रीदत्त.

ग्रंथः— गीतार्णव, गीतार्थबोधचंद्रिका, ग्रंथराज, अवधूतराज, पंचीकरणप्रबोधन, स्थूलगीता, दत्तात्रेयमाहात्म्य, अवधूतगीता, अनुगीता, दशोपनिषदें, पंचीकरण, वाक्यवृत्ति, पदार्णव, गीताभाष्य, सार्थ गीता, दत्तात्रेयसहस्रनाम, °दशनाम, °द्वादशनाम, °षोडशनाम, °शतनाम, अक्षिपंचक, प्रधानयंत्र, आगमनिगम, नामामृतस्तोत्र, गीतास्तोत्र, प्रबंधस्तोत्र, गीताप्रबंधस्तोत्र, सिद्ध दत्तात्रेय, शिवस्तोत्र, गुरुस्तोत्र, षोडशस्तोत्र, सीतज्वरनिवारणस्तोत्र, भक्तिराजकवच, वज्रपंजरक, सहस्रनामटीका, दत्तात्रेयनामावळी, मंगलमूर्तिपूजा, महापूजा, मानसिक पूजा, वैदिक पूजा, यंत्रपूजा, सिद्धमाला, उपकालस्तोत्र, षोडशावतार, °प्रादुर्भाव, वेदपादाख्यान, षड्गुरुयंत्र, षोडशदलयंत्र.

दिगंबर

ग्रंथः— पदें.

दिगंबरदास

ग्रंथः— पदें.

दिनकर

ग्रंथः— रुक्मिणीस्वयंवर.

दिनकर (रामदासी)

वि. माहितीः—नगरजवळ भिंगार येथील जोशी; वृद्धेश्वर अथवा म्हातारदेव येथें तपश्चर्या केली. विशेष हा कीं, श्रीसमर्थांचें प्रत्यक्ष दर्शन होण्यापूर्वी स्वप्नांत दर्शन होऊन प्रसाद झाला होता असें यांनीं स्वतः म्हटलें आहे. यांस श्रीसमर्थांचा अनुग्रह शक १५७६ मध्यें झाला.

ग्रंथः— स्वानुभवदिनकर (र. श. १६१६), अभंग, पदें, सवाया वगैरे.

दीन नारायण (विठ्ठल)

ग्रंथः— वैद्यकसार (ले. श. १५९९).

दीनानाथ

वि. माहिती:—(म. मं.) वऱ्हाडांत अळपूर म्हणून गांव आहे तेथील वाजसनेयी. मूळ नांव दिनकरपंत. यांस भटजीबाबा म्हणत असत.

गुरुः—सदाराम, परंतु प्रथमप्रसाद श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा.

शिष्यः—आनंदबाबा कुरोळीकर (स. श. १७२५), विद्याधर खटावकर, प्रतिनिधि.

ग्रंथः— प्रल्हादचरित्र, अभंग, पदें.

दीनानाथ (गोपाळ)

ग्रंथः— श्रीज्ञानेश्वरांची आरति.

दिवाकर मुनि

वि. माहितीः—गुरुपरंपराः—नागेंद्र–मुरारि–दिवाकर.

ग्रंथः— मतिरत्नाकर.

देवदत्त

ग्रंथः— सिद्धान्त अजपा.

देवनाथ

वि. माहिती:—गुरुपरंपरा जी का. सं. त दिली आहे ती अशीः—एकनाथ नित्यानंद – कृष्णनाथ – विसोबा – मुऱ्हारनाथ–रंगनाथ–गोपाळनाथ–गोविंदनाथ–देवनाथ (१६७६–१७४३). शिष्य–रंगनाथ, दयाळनाथ, गोपाळनाथ, मल्हारनाथ. उपदेशकाल १७०३.

ग्रंथः— कृष्णजन्म, कृष्णस्तोत्र, गुरुस्तुति, विधिनिंदा, श्रावणाख्यान, पदें वगैरे. यांचा 'काव्यप्रकाशविवरण' म्हणून एक संस्कृत ग्रंथ उपलब्ध आहे.

देवदास

वि. माहिती:—रामदासी. यांचा मठ दादेगांवी आहे. गुरुः—श्रीसमर्थ. १५३०–१५७०

ग्रंथः— गजेंद्रमोक्ष, गोपीचंदाख्यान, पदें.

देवदास

चि. माहिती:—हे चैतन्यसंप्रदायी (१५८०–१६८०). यांस देवीदासहि म्हणत.

ग्रंथ:— व्यंकटेशस्तोत्र, संतमालिका, गरुडाख्यान, कृष्णामृतसार (र. श. १६०८). प्रार्थनासात्विक, व्यंकटेशस्तुति (?), भामावर्णन.

देवमुरारी

ग्रंथ:— मुराररामायण.

देवराय

ग्रंथ:— पदें.

देवानंद

ग्रंथ:— पदें.

देवीदास

पहा:—देवदास (चैतन्यसंप्रदायी).

देवेंद्र

ग्रंथ:— पदें.

देवेंद्रस्वामि

टीप:— कदाचित् हे व वरील दोन्ही एक च.

धुंडिसुत-कुमार

टीप:— हे च धुंडिसुत मालो.

ग्रंथ:— भक्तिसार, (नवनाथचरित्र र. श. १७४०) चंद्रावळी, मालोतारण.

धुंडिराज

ग्रंथ:— प्रल्हादचरित्र (गीतिवृत्त), नारदाची लावणी, रासक्रीडा.

नयनप्रभु

ग्रंथ:— पदें.

नयनात्मजसुत (केसरी)

वि. माहिती:—नरहरी केसरी व हे एक च असावे असें वाटतें.

ग्रंथ:— रामजन्म.

नरसी

ग्रंथ:— रासमंडळ, पदें वगैरे.

नरसिंह

ग्रंथ:— सामुद्रिक (ले. श. १७२१).

नरहरितनय

वि. माहिती:—यांचा गुरु कदाचित् गोविंद असावा. (प. सं.).

ग्रंथ:— मार्कंडेयचरित्र, ध्रुवचरित्र.

नरहरिदास

वि. माहिती:—हे रामदासी. गुरुपरंपरा:—समर्थ-अनंत-मेरु-श्वेतगोविंद-नागेश-राजाराम-महादेव-हरिदास-नरहरि.

ग्रंथ:— अभंगरामायण, पदें.

नरहरि

वि. माहिती:—नरहरि, नरहरि सोनार, नरहरि माळो, नरहरि मोरेश्वर, नरहरि रामदासी व नरहरि असे सहा नरहरि आढळतात. नरहरि रामदासी यांच्यांत गुरुपरंपरेवरून दोन रामदासी या नांवाचे होते असें दिसतें. यांच्या काव्यांचा हि त्यामुळें बराच घोंटाळा होतो.

नरहरि:—यांचे काव्यांत वामनांचा उल्लेख असून काव्यरचना त्यांचे धर्तीवर यमकपूर्ण आहे, यामुळें हे वामनानंतर त्यांचे शिष्य अगर शिष्यपरंपरेंतील असावेत असें वाटतें (?).

ग्रंथ:— गंगावर्णन, कात्यायनीव्रत, नौकानयन, दानव्रत.

नरहरि (मोरेश्वर)

वि. माहिती:—हे च नरहरि रामदासी असावेत अशी समजूत आहे. परंपराः—श्रीसमर्थ–भीमस्वामि–नरहरि. (१६५०–१७००). राहणार बीड प्रांतीचे. रामदासी नसल्यास भ. वि. त मोरेश्वर तांबवेकर (१६००) यांचा उल्लेख केला आहे त्यांचे हे शिष्य काय?

ग्रंथः— आर्याटीका, रामजन्म, महाभारत (१६९०) शतमुखरावणवध, (उद्योग, भीष्म, द्रोण, कर्ण–पर्वें), अभंग वगैरे.

नरहरि (मालो)

वि. माहितीः—हे जातीचे सोनार ' धुंडिसुत '. गुरुपरंपराः—मालो–नरहरि–महिपति (ताहाराबादकराहून भिन्न); परंतु कोठें कोठें नरहरि–मालो अशी परंपरा सांपडते.

ग्रंथः— मालोतारण, भक्तिकथासार, पदें.

नरहरि

ग्रंथः— शकुनवंती (ले. श. १६९५).

नरहरि

ग्रंथः— शतकत्रय.

नरहरिसुत

ग्रंथः— मुकुंदराजाचें (हे दुसरे मुकुंद एकनाथचरित्रकार) चरित्र.

नवरस नारायण

ग्रंथः— महाभारत–द्रोण व शल्य पर्वें.

नवलदास

ग्रंथः— पदें.

नाइक सनतिदास

ग्रंथः— पदें.

नागनाथ

टीप:— नागेंद्राहून भिन्न आहेत कीं एक व हा प्रश्न आहे.

ग्रंथ:— पदें.

नागेंद्र नागनाथ

ग्रंथ:— पदें.

नागेंद्र याज्ञवल्कि

ग्रंथ:— विवेकभास्कर, स्फुट प्रकरणें.

नागेश

वि. माहिती:—हे नागेश भिंगारकराहून भिन्न. यांचे गुरु अवधूत असावे असें वाटतें.

ग्रंथ:— तत्त्वबोध (१५८२ शर्वरी).

नागेश (भिंगारकर)

वि. माहिती:—भिंगारचे मोरजोशी व जानकीबाई यांचे तृतीय पुत्र मल्हारी व त्रिंबक हे बंधु.

ग्रंथ:— आर्याटीका (१६५२), चंद्रावळीवर्णन, सीतास्वयंवर (१६१५).

नागेश

वि. माहिती:—यांचे गुरु देवदास असावे. देवदास दोन. एक चैतन्यसंप्रदायी व दुसरे रामदासी. यांपैकीं यांचे गुरु कोणते तें अनिश्चित आहे.

ग्रंथ:— सपत्नीकलह (१६८७).

नागेश (कवि)

वि. माहिती:—यांचें नांव नागेश महादेव मटांगे; जन्म सातारा (१७२३). समाधि नरसोबाची वाडी (१७५५).

ग्रंथ:— नंदिकेश्वरजन्म (१७४३).

नागेशकेत

ग्रंथ:— पदें वगैरे.

नागेशसुत

वि. माहिती:—वामनांची समश्लोकीगीता आहे तिच्यांत शेवटीं असा उल्लेख आहे:—" नागेशसुत निजभक्त । जाणोनि वामन ग्रंथ निर्मीत । हठ देखोनि भावार्थ । कृपा करित सद्गुरु ॥ " यावरून यांचा गुरु वामन.

नाथभुजंग

टीप:— रंगनाथांचे हे शिष्य काय ?

ग्रंथ— पदें.

नाथस्वामि

वि. माहिती:—धरणगांव (खानदेश) येथील सदानंद यांचें कदाचित् हें नांव असावें. तसें असल्यास शक १६०० चा सुमार..

ग्रंथ:— खुषरंगहजारा, राजयोग.

नाना

वि. माहिती:—यांचे गुरु सखोजी. ल. का. सखोपंत यांचे तीन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. ते च हे सखोजी असल्यास न कळे.

पहा:—सखा, सखोबा नाईक.

ग्रंथ:— पदें.

नानाजीनंदन

ग्रंथ:— पदें.

नाभाजी

ग्रंथ:— (भक्तिरसबोधिनी) भक्तमाल.

नामदेव

वि. माहिती:—यांचें चरित्र अद्याप विश्वसनीय असें उपलब्ध नाहीं. जनाबाईनीं दिलेली गुरुपरंपरा महिपतिबावांनीं दिलेल्या गुरुपरंपरेहून भिन्न आहे, म्हणजे कांहीं नांवें कमी आहेत. जनाबाईनीं हि भिन्न

ठिकाणीं भिन्न दिलीं आहेत. हे व विष्णुदास नामा भिन्न आहेत, यामुळें पुष्कळ अभंग व बरेच ग्रंथ कोणाचे याबद्दल संशय आहे.

ग्रंथः— लक्षापलक्ष, हरिपाठ; याशिवाय चरित्रपर, वर्णनपर, उपदेशपर असे पुष्कळ अभंग.

टीपः— श्रीज्ञानेश्वर आदि, तीर्थावलि, समाधि इत्यादींवरील अभंग यांचे म्हणून प्रसिद्ध आहेत.

नामा (विष्णुदास)

वि. माहितीः—हे जातीचे 'विप्र' असून पंडित होते. यांचे गुरु रामभारथी असे हे कपोताख्यानांत म्हणतात. हे शक १५१७ मध्यें हयात होते. यांनीं 'कामाबाईची' आरती केली आहे. अंबेचें हें नांव कोठें प्रचलित आहे तें कळल्यास यांचे चरित्राचा कांहीं सुगावा लागेल.

ग्रंथः— एकादशी-आख्यान, अनंतव्रतकथा, शिवरात्रिकथा, श्रीज्ञानेश्वरआदि, तीर्थावलि, श्रीज्ञानेश्वरादिकांची समाधि, कपोताख्यान, भूमिगोलक, नकाची लावणी, गरुडहनुमंतभेट, भगवद्गीतामाहात्म्य, सुदामचरित्र, तुळशी-आख्यान, शुकाख्यान, महाभारत (पहिलीं चार व सौप्तिक एवढीं खेरीज करून बाकीचीं उपलब्ध आहेत), आरती कामाबाईची, कृष्णमुंज, चक्रव्यूह.

टीपः— येथें दिलेल्या यादींतील कित्येक प्रकरणांचे कर्त्याबद्दल अनिश्चितता आहे.

नामा (कृष्णदास)

वि. माहितीः—हे व विष्णुदास नामा एक च.

ग्रंथः— पदें.

नामा (पाठक)

वि. माहितीः—कान्हो (विमलदास) यांचें 'पाताळकांड' उपलब्ध झाल्यापासून आजपर्यंतच्या यांच्या कालासंबंधींच्या कल्पनेस थोडा धक्का बसतो. यांची कुलपरंपरा अशीः—विठा (पाठक)–त्रिमल (पाठक)

–कान्हा (पाठक)–हरि (पाठक)–नामा (पाठक). पाताळकांडांतील उल्लेखाप्रमाणें (हा उल्लेख जरा संशयित आहे) पिला पाठकाचा गुरु वडवाळ सिद्ध नागेश (१३१३); तेव्हां पिलाचा नातू जो 'कान्हा' तो श्रीज्ञानेश्वरसमकालीन कसा हें कळत नाहीं; अथवा सि. नागेश यांचा काळ तर चुकला नाहीं ?

ग्रंथः— चंद्रहासकथा, नामरत्नमाळ, दुंदुभीवध, भरतभेट (ले. श. १५५६) पंचतंत्र, अश्वमेध, नामापाठकी.

नामा (पाटलू)

वि. माहितीः—नामा पाठक व नामा पाटलू एक च काय ?

नारा

टीपः— नामदेव (?) यांचा मुलगा.
ग्रंथः— अभंग.

नारायण

ग्रंथः— मदनविनोद (र. श. १५६८ फाल्गुन).

नारायण

वि. माहितीः—यांचे गुरु विश्वनाथ.
ग्रंथः— ज्ञानसारामृत, शिवमहिम्नस्तोत्र, कबीरजन्म, विचारमाला, बोधामृत, विज्ञानसागर, अश्वमेधाख्यान (?), बोधाष्टक, निर्वाणपंचक, सिद्ध-योगाष्टक, विद्वतमाला, दत्तात्रेयाष्टक, गजेंद्रमोक्ष.

नारायण बुवा

ग्रंथः— पदें.

नारायण वैद्य

टीपः— आधुनिक.
ग्रंथः— प्रबोधचंद्रोदय (मराठी गद्य नाटक).

नारायणसुत

ग्रंथः— शिवरात्रिकथा.

नारोजी पंडित

ग्रंथः— विज्ञापनाशतक, गुरुशतक.

निजानंद

वि. माहितीः—(भ. मं.) नाझऱ्याचे बापाजीपंत यांची पत्नी बयाबाई वारल्यावर यांनीं चतुर्थाश्रम घेतला; हे च निजानंद (१५३०–१५८०); वास्तव्य कृष्णातीरीं कऱ्हाडास; यांचे पुत्र व शिष्य रंगनाथ (निगडीकर); गुरुपरंपराः—नारायण–दत्त–सहजानंद–रामानंद–अमलानंद–गंभीरानंद–ब्रह्मानंद–सहजानंद–पूर्णानंद–निजानंद–(१५८० सुमार.)

ग्रंथः— पदें.

नित्यानंद

वि. माहितीः—शिवकल्याणांचे गुरु. काल सुमार १५२०.

ग्रंथः— पदें.

नित्यानंदसुत (–अनुचर)

वि. माहितीः—हें शिवकल्याणांचें नांव. त्यांचे गुरु व पिते नित्यानंद. यांचा ' अपरोक्षानुभूतिविवरण ' नामक एक संस्कृत ग्रंथ आहे, त्यांत हें स्पष्ट आहे. " नित्यानन्दं सदाशान्त अद्वैतं शिवमव्ययम् । स्मृत्वार्थं रचितो ह्यर्थः तस्यैव शिवसंज्ञया ॥ " येथें दुसरें ' शिव ' पद नामनिदर्शक आहे. शिवाय श्रीअनुभवामृतावरील टीकेंत हें स्पष्ट च आहे.

ग्रंथः— अपरोक्षानुभूतिविवरण (सं.), अनुभवामृत (नित्यानंददीपिका–१५५७), पदें.

निंबराज

वि. माहितीः—(प. सं.) यांचे गुरु श्रीएकनाथ असावे असें दिसतें. हे पैठणचे राहणार. यांनीं श्रीरामेश्वरास तीन कावडी गंगेच्या घातल्या. महिपती बाबा यांचा उल्लेख करितात.

ग्रंथः— पदें.

निर्मळ (पाठक)

ग्रंथः— पंचतंत्र (पंचोपाख्यान). नामा पाठकांनीं पंचतंत्र केलें आहे तसें निर्मळ पाठकांनीं हि केलें आहे असें दिसतें. एकवंशी तर नव्हत ?

निरंजन

वि. माहितीः—हे कऱ्हाड येथलि नृसिंह व कृष्णाबाई यांचे चिरंजीव; यांचा काल १५५९–१६४९; आनंदमूर्तीचे गुरु रघुनाथ यांनीं यांस दूध पिण्यास एक गाय दिली होती, उद्बोधनाथानीं यांस मेखला दिली, असे उल्लेख आहेत; हे गाणपत्य होते.

गुरुपरंपराः–श्रीशंकराचार्य–हस्तामलक–भास्कर–लयानंद–सिद्धानंद–आनंदानंद–परमानंद–काशिराज–निरंजन. समाधि १६४९ त नामलगांवीं. शिष्यः–बल्लाळ (गणेशपुराण करणारे) गोपाळ, रामजोशी, विष्णुदेव, भवानदास व जीवनदास महानुभाव. समकालीनः–कृष्णदयार्णव, गोसाविनंदन (महानुभाव ?), कोकिळ, चिद्घन, वामन, उद्बोध. उद्धव मुल्हेरकर यांचे गुरु काशिराज (रामानुजसंप्रदायी) ते व यांचे गुरु हे एक काय ?

ग्रंथः— गणेशगीता (१६१४)

निरंजनदास

ग्रंथः— पदें.

निरंजननाथ

वि. माहिती:—यांचे शिष्य विश्वंभरनाथ होते असें दिसतें. विश्वंभरनाथाचें एक गोपीचंदाख्यान आहे, त्यांत शेवटीं निरंजननाथांचा उल्लेख आहे. तसेंच "अमोल काया जाइल वाया" या पदावरून यांचे गुरु गोविंद होतेसें दिसतें.

ग्रंथ:— पदें.

निरंजनप्रभु

ग्रंथ:— निरालंबप्रकाशबोध.

निरंजनमाधव

वि. माहिती:—यांचें मूळ नांव बनाजी. पहिले बाजीरावसाहेब पेशवे यांचे वेळीं हे होते. बाळबोधकार त्रिंबकराय (योगी) यांचेपासून यांची गुरुपरंपरा आहे असें समजतें.

ग्रंथ:— श्रीज्ञानेश्वरविजय, सद्वृत्तमुक्तावलि, देवीअष्टक, सांबशिवाष्टक, भगवंतमंत्र–व्यंकटेश–मल्हारी–श्रीराममंत्र–विठ्ठल–महालक्ष्मी, स्तोत्रें, श्रीगुरुस्तव, सांबशिवाख्यान.

निरंजनरघुनाथ

ग्रंथ:— अमृतानुभवटीका, पदें.

निवृत्ति अवधूत

वि. माहिती:—यांनीं व परमानंद चैतन्य यांनीं आपापल्या ग्रंथांत आनंद-चैतन्य किंवा अनंत चैतन्य या एकाच गुरूचा नामनिर्देश केलेला आहे. तेव्हां निवृत्ति अवधूत व परमानंद चैतन्य हे एक तरी असावेत किंवा गुरुबंधु असावेत. बहुधा गुरुबंधु. परंतु कालाचा उल्लेख नाहीं. तथापि १७ वे शतकांतील हे असावेत असें दिसतें. पहा:—परमानंद चैतन्य, अवधूत मत्स्यावृत्ति.

ग्रंथ:— परमप्रकाश, दशनामटीका (ले. श. १६९१), वृत्तिबोध.

निवृत्तिनंदन

टीपः— हा बहुधा मानभाव असावा.
ग्रंथः— पांडवगीता.

निवृत्तिनाथ

वि. माहितीः—जन्म आपेगांवीं (११९१); समाधि त्र्यंबकेश्वरीं (१२२०).
ग्रंथः— उत्तरगीताटीका. (अ. को. कार 'वृत्तिबोध' यांचा म्हणून देतात).
हरिपाठ (?) नमन (?)

निळोबा

वि. माहितीः—तुकारामशिष्य.
ग्रंथः— अभंग.

नीतिनाथ

ग्रंथः— इंद्रजाल (ले. श. १७९२).

नीलकंठ

ग्रंथः— पदें.

नृसिंह

ग्रंथः— जनकयोगि(नी)संवाद.

नंददास

ग्रंथः— भ्रमरगीत, पदें.

नंदानंदन

ग्रंथः— पदें.

पद्मनाथ

ग्रंथः— उद्योगपर्व.

पद्मनाथ यतींद्र

टीपः— हे व मागील एक च काय ?

ग्रंथः— पद, अभंग (दत्तपाठाचे).

परमहंस स्वच्छंदानंद

वि. माहितीः—(भ. मं.) हे गोपाळनाथांचे शिष्य म्हणून सांगतात; परंतु हे कोणते गोपाळनाथ तें देत नाहींत. परमानंद चैतन्य यांनीं एका परमहंसाचा उल्लेख केला आहे, ते का हे ?

ग्रंथः— देवीविजय.

परमानंद चैतन्य

वि. माहितीः—यांनीं आपल्या गुरुपरंपरेचा उल्लेख केला आहे तो असाः— तुकेश–आनंदचैतन्य–परमानंद चैतन्य. पहाः—निवृत्ति अवधूत.

ग्रंथः— तारकब्रह्म, आत्मानुभव.

परमानंद (प्रेमानंद)

वि. माहितीः—शिवकल्याणांचे आजेगुरु परमानंद होते, ते तर हे नव्हत ?
केशवराज–हरिदास–परमानंद–नित्यानंद–शिवकल्याण.
पहाः—चिंतामणिसुत.

ग्रंथः— पदें.

परमानंदसुत

वि. माहितीः—शिवकल्याणांचे वडील म्हणजे परमानंदांचे सुत ते हे असल्यास यांचें मूळ नांव त्रिमल व चतुर्थाश्रमी नांव नित्यानंद. ते च का हे ? शिष्य असल्यास दुसरे कोणी भिन्न.

ग्रंथः— पदें.

परशुराम

ग्रंथः— पदें, आनंदमूर्तिवर्णन, गुरुचरित्र (आर्या), गुरुचरित्रसार.

परसदास

ग्रंथः— पदें.

परसा भागवत

वि. माहिती:—गुरु नामदेव म्हणतात.

ग्रंथः— पदें.

पंडितराम

ग्रंथः— पदें, भूपाळी.

पांडुरंग

वि. माहिती:—यांचे काव्यांत 'हरहर महादेव' हा रणघोष असून सर्व आधुनिक उल्लेख आहेत.

ग्रंथः— पार्थाभिमान, शिवनिशी, द्रौपदीस्वयंवर, गयगंधर्वोख्यान नारायणराव पेशवे-चरित्र, रामगौरव, स्थालिपाक, पदें.

पांडोबा

ग्रंथः— अमृतसंजीवनीकथा, परशुरामजन्म, पुंडलीकप्रताप, मुरलीमाहात्म्य, ब्राह्मणमाहात्म्य, सुबोधनवध, व्यंकटेशमाहात्म्य, रुक्मिणीस्वयंवर, द्रौपदीस्वयंवर, पुलोमाकथा, सुदामचरित्र, बंगपुराण, रामदासचरित्र(?)

पुंडलिक भट

वि. माहिती:—(ल. का.) रामदुर्गचे पांडुरंग बल्लगोजी यांचा पुत्र.

ग्रंथः— पूतनावध.

पूर्णदास

वि. माहिती:—गुरुपरंपराः—नारायण-विधि-अत्रि-दत्त-गोपाळनाथ-पूर्णदास (नाथ).

ग्रंथः— स्वात्मानंद ज्ञानघन (१७१६ माघ).

पूर्णानंद

वि. माहिती:—यांचें पूर्वाश्रमांचें नांव नारायण.

गुरुपरंपरा:—आदिनाथ—दत्त—सदानंद (त्र्यंबकीं तप केलें) रामानंद—गंभीरानंद—ब्रह्मानंद—सहजानंद—पूर्णानंद (१५३२). या पूर्णानंदांचे शिष्य चिदानंद म्हणून होते. त्यांचें पूर्वाश्रमींचें नांव बल्लाळ. त्यांची पितृपरंपरा:—गणेश—गोविंद—बल्लाळ. वत्सगोत्री कुशक्षेत्रींचे राहणार. या चिदानंदाकरितां पूर्णानंदांनीं गीतासार हा ग्रंथ केला.

ग्रंथ:— अवधूतगीता (१५३२ साधारण), गीतासार.

प्रद्युनन्दन

ग्रंथ:— श्रीखंड्याचरित्र (१६६३).

प्रल्हाद (लक्ष्मीनंदस्वामि)

पहा:—प्रल्हादबाबा.

प्रल्हाद बाबा

वि. माहिती:—कऱ्हाडनजीक तांबवे गांवचे नृसिंह व लक्ष्मी यांचे पुत्र. जोतिपंत महाभागवत यांच्या कीर्तनानें उपरति झाली.

गुरुपरंपरा:— दीनानाथ—आनंदबाबा—प्रल्हादबाबा.

समाधि:—१७४० कार्तिक व. ११; हे च बडवे असें दिसतें.

ग्रंथ:— श्रीअमृतानुभव (सं.). आहिल्योद्धार, सीतास्वयंवर, पांडुरंगमाहात्म्य.

प्राण

ग्रंथ:— बावनी छंद.

प्राण गोपाळ

टीप:— प्राण व हे बहुधा एक च असावेत.

ग्रंथ:— बारामासी, नामधामानैवेद्य, भवानीस्तुति.

मेणाबाई

वि. माहिती:—(अ. को.) शक १५८० चा सुमार.

ग्रंथः— पदें. अभंग,

बकसन

वि. माहिती:—मागें गोविंद (बकसन) पहा.

बनाजी

वि. माहिती:—मागें ' निरंजन माधव ' पहा.

बयाबाई

ग्रंथः— पदें.

बलवंत

ग्रंथः— पदें.

बल्लव

ग्रंथः— पदें.

बल्लाळ

वि. माहिती:—पहाः—निरंजन. पूर्णानंद.

ग्रंथः— गणेशपुराण.

बस्वलिंग

वि. माहिती:—यांच्या श्रीखंड्याख्यानावरून व यांचेसंबंधीं असलेल्या महिपतीच्या उल्लेखावरून शक १५२१ नंतर व १६३७ पूर्वी अगर त्या सुमारास केव्हांतरी यांचा काल आहे. यांनीं स्वतःस जयरामात्मज म्हणविलेलें आढळतें.

ग्रंथः— गजगौरीव्रत, संतमालिका, रुक्मिणीभावार्थ, भामाविलास, श्वानउद्धार, श्रीखंड्याख्यान, उमामहेशसंवाद, मुरलीचरित्र.

बहादर बाबा

ग्रंथः— गुलहाजी.

बहिणाबाई

वि. माहिती:—या वारकरीसंप्रदायी म्हणून आजपर्यंत समजूत आहे. परंतु अलीकडे या चैतन्यसंप्रदायी होत्या असें बाहेर आलें आहे; तेव्हां इतर संतचरित्रांप्रमाणें हें चरित्र हि अद्याप अज्ञात च आहे.

ग्रंथ:— पदें.

बहिरम

ग्रंथ:— सुदामचरित्र (हिंदी).

बहिरवनाथ (भैरवनाथ)

ग्रंथ:— नाथलीलामृत (१६३५) हा ग्रंथ नर्मदेच्या उत्तरेस ' बिटप नांवाच्या क्षेत्रांत लिहिलेला आहे.

बहिरा (जातवेद)

वि. माहिती:—हे पैठणचे राहणार. मुसलमानांनीं यांस पतित केलें तेव्हां वडवाळ सिद्ध नागेश यांस शरण गेले. सिद्ध नागेश हे प्रत्यक्ष हयात होते असें धरल्यास (१३१३) जातवेदांचा काल १३२० चा सुमार येतो. परंतु यांनीं दशमस्कंद–टीकेंत आपल्या गुरूचें नांव ' चिंतामणी ' असें दिलें त्याहे. तेव्हां ' चिंतामणी ' हें च वडवाळ सिद्ध नागेश कीं काय ! कित्येक हे एकनाथ, दासोपंत यांचे समकालीन म्हणून देतात.

ग्रंथ:— दशमस्कंदटीका.

बापू वामन

वि. माहिती:—गुरु वामन. (१५९५ सुमार).

ग्रंथ:— सुदामचरित.

बापु सवाई

ग्रंथ:— पवाडे.

बापुजुन

ग्रंथः— गोमाउचरित्र.

बाळ

वि. माहिती:—यांची परंपरा:—श्रीसमर्थ–भीमस्वामी–गोविंदबाळ.

ग्रंथः— श्रीभक्तमालिका.

बाळ (मुद्गलांकित)

वि. माहिती:—यांनीं महिपतीस नमन केलें आहे. महिपतिबाबा यांचा काळ १६३७–१७१२; यानंतर यांचा काळ. गुरुः—पद्मनाभ.

ग्रंथः— शक्तिविजय.

बाळकदास

ग्रंथः— पदें.

बालकराम

टीप:— पहा:—राम.

ग्रंथः— दामाजीची रसद, गजगौरीबोवसा.

बाळकृष्ण

वि. माहिती:—गुरुः—विश्वनाथ. पहा:—विश्वनाथ.

ग्रंथः— महावाक्यार्थसार, वाक्यार्थमवसार.

बालमुकुंद

ग्रंथः— पदें.

बाळा

टीप:— रामदासी.

ग्रंथः— अनुभवसिद्धि (के. ब. १६८६).

बाळाजी

ग्रंथः— मनन (ले. श. १७०५).

बोधलां

वि. माहितीः—धामणगांवचे पाटील माणकोजी जगताप. महिपतिबाबांनीं यांस तुकारामाचे समकालिन म्हटलें आहे. यांच्या कुटुंबाचें नांव ममताई, पुत्र बमाजी, सून भागीरथी, नातू भगवंतबाबा.

ग्रंथः— अभंग, पदें वगैरे.

ब्रह्मगिरि

वि. माहितीः—चिदंबर–ब्रह्मगिरि–वैद्यनाथ (१५७३)
पहाः—वैद्यनाथ.

ब्रह्मगिरि

वि. माहितीः—अमृतरायाचे शिष्य एक ब्रह्मगिरि होते असें त्यांच्या पदा-वरून दिसतें.

ग्रंथः— दामाजीपंताची बखर.

ब्रह्मदास

वि. माहितीः—गुरुपरंपराः—श्रीशंकराचार्य–नरसिंहसरस्वति–माधवेंद्रसरस्वति–अमृतेंद्रस०–गगनेंद्रस०–माधवेंद्रस०–एकनाथ–श्रीकृष्ण–ब्रह्मदास.

ग्रंथः— ज्ञानाब्धितरंग (१६३०).

ब्रह्मसिंधुमीन मुनि

ग्रंथः—वाक्यसुधा.

ब्रह्मानंद

वि. माहितीः—हे सहजानंदशिष्य, असें ' वैरागर ' ग्रंथांतील एका ओवी-वरून दिसतें. परंतु वैरागरांतील दुसऱ्या एका ओवींत अच्युता-श्रमाचें नांव आलें आहे. म्हणून मन निःशंक होत नाहीं. तथापि

'प्रणवविवरणांत' गुरूबद्दल स्पष्ट उल्लेख आहे. तेथें सहजानंद असें नांव आहे.

ग्रंथः— वैरागर (व्याकरण), ब्रह्मबोध, प्रणवविवरण, ब्रह्माहंविवरण.

टीपः— मला वाटतें 'वैरागर' हा ग्रंथ अच्युताश्रमांचा असावा.

ब्रह्मानंद

वि. माहितीः—द्वितीय मुकुंद (एकनाथचरित्रकार) यांनीं चतुर्थाश्रम घेतल्यावर त्यांचें नांव ब्रह्मानंद होतें (१६४०–१६९७). यांचें चरित्र कोणी 'हरिदास' यांनीं लिहिलें आहे. समाधि पैठण येथें. गुरुः—कोकिळ गंगाधर.

ग्रंथः— पदें.

ब्रह्मानंद

वि. माहितीः—हे आधुनिक; म्हसवडचे राहणार; मूळ नांव गणेश; विश्वामित्रगोत्री. भ. मं. कारांची व यांची भेट भिलवडीस झाली होती; तेव्हां राजाराम प्रासादीचे समकालीन. समाधि ब्रह्मनाळ येथें.

ग्रंथः— पदें.

ब्रह्मी भूतोजी

ग्रंथः— प्रकाशदीप (के. श. १७३१).

ब्रह्मेंद्रयति

वि. माहितीः—गुरु उद्धव. हे बहुधा भुल्हेरकर असावे (१६३२ सुमार).

ग्रंथः— प्रबोधचंद्रिका (गीताटीका).

भगवंत

वि. माहितीः—गुरु चिदानंद.

ग्रंथः— चिदानंदसिंधूदक (१६२२), सच्चिदानंदविलास (१६३२), निजसुख (१६३२).

भागीरथी

ग्रंथ:— अभंग, पदें.

भार्गवस्वामि

वि. माहिती:—कन्हाकांत दुबेबाळीच्या जन्मदश्री व रेणुका यांचे पुत्र. काशीरीत अनुष्ठान. गुरु:—ज्ञानेंद्रयति.

समाधि:—वाळकशी. काल १६८८ सुमार.

ग्रंथ:— अभंग.

भानुदास

वि. माहिती:—नाथांचे आजे. यांनी विद्यानगरच्या रामराजापासून पांडुरंग-मूर्ति परत आणली. विद्यानगरचें राज्य १४८६ त बुडालें, त्यापूर्वीची ही गोष्ट; तेव्हां १४२० चा सुमार.

ग्रंथ:— अभंग.

भास्कर

वि. माहिती:—भाषेवरून हे शक १४०० मधील असावे—म्हणजे नाथांपूर्वी असावे—असें अनुमान बांधतां येतें.

ग्रंथ:—भागवत (दशम), गणपतिस्वयंवर.

भिका

ग्रंथ:—पदें.

भिक्षुकवि

वि. माहिती:—गुरुपरंपरा:—आत्माराम-योगेश्वर-भिक्षु. यांचा संप्रदाय दत्त-निरंजनपंथ, परमहंसदीक्षा.

ग्रंथ:— द्रौपदीवस्त्रहरण, भक्तानुभव (१६९६), लावण्या परमार्थपर.

टीप:— 'भक्तानुभव' हा ग्रंथ मुसलमानी (!) रचिला आहे.

भीम

वि. माहिती:—भीकाजीशिष्य.

ग्रंथ:— पदें, अभंग.

भीमराज

ग्रंथ:— पदें.

भीष्ममुनि

ग्रंथ:— गद्यराज.

भुजंगनाथ

वि. माहिती:—नागनाथाच्या शिष्यांचे यादवनाथ व काशीबाई यांचे पुत्र. समाधि १७४५. एक रंगनाथशिष्य 'भुजंग' होते.

ग्रंथ:— पदें.

भंगी

वि. माहिती:—एक त्र्यंबक भंगी म्हणून मागें आले आहेत ते च तर हे नव्हेत !

ग्रंथ:— पदें

भैरव

ग्रंथ:— रसमंजिरि.

भैरवनाथ

टीप:— पहा:—बहिरवनाथ.

भोज

ग्रंथ:— पदें.

मछींद्र कुमार

ग्रंथ:— शिवरात्रिकथन (ले. श. १७०१)

मच्छिंद्र नाथ

वि. माहिती:—कोंकणस्थ मत्स्यदेशाचे अधिपति असावेत. यांची समाधि नगरजिल्ह्यांतील वृद्धेश्वर (म्हातारदेव) जवळ पूर्वेकडे डोंगरावर आहे. नरहरि मालो यांनी यांचा समाधिशक १००० दिला आहे.

श्रीनिवृत्ति हे या परंपरेंतील मत्स्येंद्रनाथापासून ६ वे पुरुष; यावरून हा शक अयुक्तिक वाटत नाहीं.

ग्रंथः— पदें.

मधुकर

ग्रंथः— कथाकल्पतरु.

मधुसूदन व्यास

ग्रंथः— विक्रमचरित्र (र. वर्ष १४१६ हें संवत्सर धरलें तर शक १२८२; भाषा जुनी).

मध्वमुनि

वि. माहिती:—नीराकांठीं कळंबोली म्हणून गांव आहे तेथील राहणारे; मूळनांव महादेव; जांबूळवनीं ६ महिने तप केल्यावर श्रीदत्तप्रसाद; नेहमीं राहणें बडगांव; जन्मशक शुक्र १६७१. परंतु हा शक चुकला असावा. कदाचित् १६११ असावा. कारण, अमृतरायांचे (१६२०–१६७५) हे मार्गदर्शक होते असें प्रसिद्ध आहे; यांचा काल (१६११–१६५६) हा असावा असें दिसतें.

महिपतिबावा म्हणतात यांचें मूळ नांव त्रिंबक नाशिककर. कित्ये-कांच्या मतें हे त्रिंबक मध्वनाथाचे शिष्य होते.

ग्रंथः— प्रल्हादचरित्र, धनेश्वरचरित्र, सखुचरित्र, मत्स्येंद्रचरित्र, गणेशाष्टक, गंगाष्टक, बिल्वाष्टक, व्यंकटाष्टक, गणेशस्तुति, वाराणशीस्तुति, अभंग, पदें.

मन्मथ शिवलिंग

वि. माहिती:—(अ. को.) हे लिंगाईतधर्मी अभंग होते. यांचे गुरूचें नांव एका पदावरून 'नागो' नागेश असें होतें.

ग्रंथः— पदें.

मयूर

ग्रंथः— पदें.

मरुतसुत

ग्रंथः— पदें.

मरुद्गण (श्यामजी)

वि. माहितीः—यांचे माहितीवरून वटेश्वर व मुधेश यांचें चरित्र महिपतिबाबांनीं लिहिलें आहे.

परंपरा:—मुधेश—विठोबा—चांगदेव—पिलाजी—नरहरी—जनार्दन—मुधोजी—कोनेरी (महिपतिसमकालिन)—श्यामजी.

ग्रंथः— चांगदेवचरित्र,

मळगीर (अतीत)

टीपः— पहाः—अतीतानंद.

मलुकदास

ग्रंथः— पदें.

मल्हारी (मल्हार)

वि. माहितीः—राशीनचे मल्हारीनाथ. यांनीं आपलें संपुष्ट निरंजन (गाणपत्य) यांस पूजेकरितां म्हणून दिलें. यावरून यांच्या काल १५५०–१६१० (ल. का.) यावरून तिमाजी व चंदा हीं यांच्या मातापित्यांचीं नांवें, अनंत हें बंधूचें व कदाचित् रघुनाथ हें गुरूचें नांव असावें असें दिसतें.

ग्रंथः— भरतभेट.

महादेव

ग्रंथः— मूळस्तंभ.

महालिंगदास

टीपः—पंचोपाख्यानांत यांनी आपली थोडीशी माहिती दिली आहे (ओ. २२६।२२७) तीवरून हे दूर्वांशी विप्र होते. राहणार खानदेशांत गिरजेकांठीं बहाळजवळ वाडेगांवीं.

ग्रंथः— पंचोपाख्यान, शालिहोत्र, सिंहासनबत्तिशी (श. श. १४८७).

माहिदाससुत

ग्रंथः— पदें.

महंमद (शेख)

ग्रंथः— योगसंग्राम.

महंमद (बावा)

ग्रंथः— पदें.

महिपति

वि. माहिती:—महिपति दोन होते असें दिसतें. एकांचे गुरु नरहरि, नाथपंथी. दुसरे ताहाराबाद (नगर जिल्हा) येथील राहणार; यांस स्वप्नांत तुकाराम महाराज यांचा प्रसाद, सबब चैतन्यसंप्रदायी. कित्येकांचे मतें यांस मोरोबा दांभेकर यांचा उपदेश होता (१६३७–१७१२); दादोपंत=गंगाबाई–महिपति.

ग्रंथः— कथासारामृत, भक्तलीलामृत, संतलीलामृत, पांडुरंगस्तोत्र, भक्तिविजय, संतविजय, तुळसीमाहात्म्य, पंढरीमाहात्म्य, गणेशपुराण, ऋषि ५ व्रतकथा, मुक्ताभरण, अपराधनिवेदन, विराटपर्व, भक्तवैजिरी, अनंतव्रतकथा, दत्तात्रेयजन्म, सारांश–ज्ञानेश्वरी, कृष्णलीलामृत, शनिमाहात्म्य.

महेश्वर

वि. माहिती:—गुरुः–आस्तीतीर्थ.

ग्रंथः— वाक्यसुधा.

माणक

ग्रंथः— आत्मविचार.

माणकेश्वर

ग्रंथः— हनुमंताष्टक.

माधव (नारायणदास)

वि. माहिती:—माधव एकंदर पांच आढळतात. १ माधव, २ रे राघवदास माधव, ३ रे नारायणदास माधव, ४ थे विठ्ठलदास माधव, ५ वे शैव माधव. नारायणदास माधवांचे ग्रंथ:—योगवासिष्ठसार (१५१४), गीताटीका, अलक्षनिदान, भीष्मस्तवराज (?), लघुयोगवासिष्ठ (१५०७).

टीपः— ' लघुयोगवासिष्ठ ' कदाचित् राघवदास (माधव) यांचें असावें. तसें असल्यास र. श. १६२७.

माधव (राघवदास)

ग्रंथः— महाभारत (र. श. १६२५ ते १६२९) विनायकमाहात्म्य, अश्वमेध, रामायण (श्लोकबद्ध), रामायण (ओवीबद्ध), भगवद्गीता, योगवासिष्ठ, अनुगीता, रामरहस्य, विष्णुपुराण, निर्वाण, गणेश-पुराण, मल्लारिमाहात्म्य, पदें,

माधव (विठ्ठलदास)

ग्रंथः— पदें.

माधव (शैव)

वि. माहिती:—यांच्या ग्रंथावरून ' रत्नागर ' (रत्नाकर ?) यांचे गुरु असावे असें स्पष्ट दिसतें. एक रत्नाकर १६२७ मध्यें होते.

ग्रंथः— मूळस्तंभ.

माधव

ग्रंथः— कर्मोद्बोध, यामिनीआख्यान.

माधवदास

वि. माहिती:—गुरुपरंपरा:—उद्धवचिद्घन–आत्माराम–शंकर–माधवदास.

ग्रंथ:— अलक्षनिधान (१६५५).

माधवनाथ

टीप:— यांचे गुरु कदाचित् ब्रह्मानंद असावे.

ग्रंथ:— पदें.

माधवसुत (–कुमार, –नंदन)

वि. माहिती:—हे रामदासीसंप्रदायी होते. उपनांव अद्वैती.

ग्रंथ:— रामामृततरंग, रामनामतरंग, दक्षिणामूर्तिस्तोत्रटीका, (१६६३–१६८६), श्रीकृष्णपंचरत्न, श्रीरामपंचरत्न, भारत, हरिवंश, आत्मविद्याविलास, कलिविडंबन, त्यागराजपुराण, नामकल्पतरु, भागवत (१० स्कंद) भीष्मस्तवराज, विनायकमाहात्म्य, शेषधर्म, मुरलीवादन, पदें.

टीप:— यांनीं १० स्कंदांत आपले पिते माधव त्यांनीं कोणकोणते ग्रंथ केले ते दिले आहेत.

माधोनंद

ग्रंथ:— भामाविलास, निर्गुणभूपाळी.

मानपुरी

वि. माहिती:—दौलताबाद (देवगिरी) येथें किल्ल्याचे पायथ्याशीं यांची व यांचे शिष्यपरंपरेतील ग्यानपुरी यांच्या समाधि शेजारीं शेजारीं आहेत. तेथें यांचा मठ आहे. समाधिशक १६५२ साधारण ज्येष्ठ शु० ५ रविवार.

ग्रंथ:— पदें.

मारकीनाथ

वि. माहिती:—चंद्रभागेतीरीं दर्यापूर म्हणून गांव आहे. तेथील काण्व शाखेच्या व वैश्यवृत्तीनें उपजीविका करणाऱ्या बाबाजी नांवाच्या

गृहस्थाचा वृद्धपणीं झालेला एकुलता एक पुत्र वारल्यामुळें त्यास उपरति झाली व स्थूलग्रामाजवळ पयोष्णीतीरीं खेडमारकी म्हणून गांव आहे तेथें आले, आणि १२ वर्षे मौन धारण करून तप केलें. अन्न वर्ज होतें. हें पूर्वीचें त्यांचें गुरुग्राम.

गुरुपरंपराः–श्रीगोविंद ? भगवत्पूज्यपाद–विवर्ण (शंकराचार्यांचे गुरुबंधु) प्रबोध–उद्बोध–निगमबोध–प्रकाशमार्तंड–निरालंबकल्याण – पद्माकर–पुरंधर–सुधाकर–वल्लभ–श्रीधर–विश्वनाथ–महादेव–गोमदेव–नीलकंठ––(रुद्र ?)–मारकीनाथ. यांचे शिष्य तीन; केशव (१६२३), उद्धव, गोविंद.

ग्रंथ:— पदें.

मालो

वि. माहिती:—गुरुपरंपराः—आदिनाथ–श्रीज्ञानेश्वर–रंगनाथ–प्राणनाथ–गैबी–गुप्तनाथ–उद्बोधनाथ–केसरी–लक्ष्मी–शिवदिन–गोविंद–नरहर–मालो. येथें शिवदिन व केसरी यांच्यांत लक्ष्मीचें नांव येतें. हें जरा स्मरणीय आहे. (अ. को.)–हे इंदूरबोधनचे राहणारे. विजापूरच्या अकण्णा मादण्णाचे हाताखालीं राहत असत. प. सं. वरून 'नरहरि' हे गुरु होते असें स्पष्ट दिसत.

ग्रंथ:— नाथनामावलि, संतचरित्रें, भक्तिसार (?)

टीप:— या कवीसंबंधीं मला अत्यंत संशय आहे.

मालो (धुंडिसुत)

वि. माहिती:—हे अगदीं अलिकडील. शक १७४० चा सुमार.

ग्रंथ:— नवनाथचरित्र.

माळा हरदास

ग्रंथ:— पवनविजय.

मीराबाई

ग्रंथ:— पदें.

७८

मुकुंद

वि. माहिती:—पद्य:—कोकिळ (गंगाधर.)

ग्रंथ:— एकनाथचरित्र, रुक्मिणीस्वयंवर.

मुकुंद

ग्रंथ:— सारिपाट.

मुकुंदकवि

ग्रंथ:— प्रबंध.

मुकुंदस्वामि

वि. माहिती:—मुकुंद म्हणून एक रामदासी होते. भीमस्वामीचे शिष्य जे गोविंदबाबा यांचे हे पुतणे.

ग्रंथ:— देवभक्तानुवाद, रामकृष्णविलास, गुरुबोधपंचक, पदें.

मुकुंद (दीन)

वि. माहिती:—यांची माहिती मी १८३४ च्या भा. इ. मंडळाच्या अहवालांत दिली आहे (पान १८२). नेमाडांतील खांडव्यास यांचा जन्म. पिता नारायण; माता सरबाई. यजुर्वेदी वाजसनेयी. पित्याचे मरणानंतर बागलाणांत जैतापुरीं आले. यवनाची सेवा स्वीकारली. १६०८ त स्वप्नांत सद्गुरुदर्शन. १६२३ त प्रत्यक्ष सद्गुरूपदेश, तीर्थयात्रा. यांचा समाधिकाल अद्याप निश्चित नाहीं.

ग्रंथ:— रामायण—सुंदरकांड (१६२३), रेणुकासत्त्वदर्शन (१६२८), दत्तजन्म, दूतिप्रेषण, दानलीला (१६२८), यशोदागोळणसंवाद (१६२८), छंदोरत्नाकर (१६२८), गुरुस्तुति (१६२४), अंगदशिष्टाई, सुदामचरित्र (१६२९), वेदान्त, अंकुशपुराण (१६१५), श्रीशंकराचार्यस्तुति, श्रीमध्वाचार्य, दत्तस्तोत्र, माता—पिता—अग्रज—कनिष्ठ बंधु—पुत्र—स्त्री—मित्र—सद्गुरु—श्रीसद्गुरुवीजयावनवचन, शनिस्तोत्र, रामाजीगोसावी, आत्मचरित्र, बाग्लाणांतील साधु, राणाजीबाबावर्णन.

मुकुंदराज

वि. माहिती:—बेतुलकडे पयोष्णीतीरीं अंबा नांवाच्या नगरांत यांनीं ग्रंथरचना केली.

गुरुपरंपरा:—श्रीआदिनाथ–श्रीहरिनाथ–श्रीरघुनाथ–श्रीमुकुंदराज.

ग्रंथ:— परमामृत, पवनविजय, विवेकसिंधु (११९०), पंचीकरण, मूलस्तंभ (?), पंचीकरण.

टीप:— यांचा एक संस्कृत ग्रंथ ' महाभाष्यं ' उपलब्ध झाला आहे. विशेष महत्त्वाची गोष्ट अशी कीं, यांची व श्रीज्ञानेश्वरांची भेट झाली असावी असा पुष्कळ संभव आहे. अद्याप या आद्यकवींची चरित्रें उपलब्ध नाहींत.

मुकुंद

वि. माहिती:—हे स्वतःस ' शिवसुत ' म्हणवितात. (१६३० चा सुमार).

ग्रंथ:— श्रीभार्गवचरित्र.

मुक्ताबाई

वि. माहिती:—आपेगांवीं जन्म; पैठणीं बंधूबरोबर (श्रीनिवृत्ति, श्रीज्ञानेश्वर, श्रीसोपान) गमन; तेथून नेवाशाच्या रस्त्यानें श्रीआळंदीस वास्तव्य; वटेश चांगदेवास उपदेश; श्रीज्ञानेश व श्रीसोपान यांच्या समाधीनंतर (१२१८।१२१९) एदलाबादेनजीक अंतर्धान (१२१९).

ग्रंथ:— श्रीज्ञानेश्वरताटी, कल्याणपत्रिका, नमन, हरिपाठ.

मुक्तेश्वर

वि. माहिती:—महिपतिबाबांनीं श्रीएकनाथचरित्र दिलें आहे. त्यांत नाथांस दोन मुली होत्या; एक गोदूबाई व दुसरी गंगाबाई; गंगाबाईचा मुलगा पुंडोबा. यांत मुक्तेश्वराचें मातोश्रीचें नांव दिलें नाहीं. (मुक्तेश्वर हे नाथांच्या मुलीचे मुलगे अशी समजूत आहे). परंतु भ. लीलामृतांत महिपतींनीं त्यांचा उल्लेख करून 'नातुर्भगिनी आणि' ' प्रसिद्ध आणि '

विशेषणें दिलीं आहेत. कदाचित् त्यांचे हे समकालीन असणें हि संभवनीय आहे. तेव्हां जे ' प्रसिद्ध जनी ' ते जर नार्यांचे नातु असते तर त्याचा उल्लेख महिपतिबाबा नार्यांचे चरित्रांत कां न करते ?

ग्रंथः— भारत (आदि, सभा, वन, विराट, सौप्तिक), श्रीएकनाथचरित्र, शुकरंभासंवाद, रामायण (बाल, अयोध्या, अरण्य, किष्किंधा, सुंदर, युद्ध, उत्तर) भागवत, शतमुखरावणवध, अपरोक्षानुभूति (?) हनुमन्नाटक, सुदामचरित्र, हरिश्चंद्राख्यान.

टीपः— ' शाहुछत्रपत्यष्टक ' म्हणून एक अष्टक मुक्तेश्वरांचें उपलब्ध आहे; परंतु हे ते मुक्तेश्वर नव्हत. शाहुछत्रपतींचे गुरु ज्यांचे मुक्तेश्वर नांव होतें त्यांचें हें असावें.

मुद्गल (चिंतामणिसुत)

ग्रंथः— पदें.

मुद्गल (महा)

वि. माहितीः—मुद्गलसुत हरिराज यांच्या टीकेंत मुद्गलांची थोडीशी माहिती मिळते ती अशीः— गोदातीरीं मुद्गल जोशी उपनांव शेंडे, गोत्र काश्यप होते. त्यांचा मुलगा हरिराज सूर्योपासक.

ग्रंथः— (श्रीरामावर) आर्या.

मुद्गल (अनंतसुत)

ग्रंथः— रुक्मिणीस्वयंवर (ले. श. १६५८), नामदेवचरित्र, टिटवीरक्षण, दशरथसार.

मुद्गल (कृष्णदास)

टीपः— पहाः—कृष्णदास मुद्गल.

ग्रंथः— रामायण (युद्धकांड—ले. श. १६६५).

मुद्गल (दादोसुत)

ग्रंथः— अश्वमेध.

मुद्गलदास

ग्रंथः— पदें

मुरारी

वि. माहितीः—कोल्हापूरच्या श्रीकृष्ण–राधा यांचे पुत्र. वडील बंधूचें नांव केशव (क. च.).

ग्रंथः— चेंडुफळी (१६७६).

मृत्युंजय (ब्रह्माणि)

वि. माहितीः—रंगनाथस्वामींनीं यांचा उल्लेख केला आहे (ल. का. भा.) ? उद्धवचिद्घनांनीं ' संतमालिकेंत ' यांचा उल्लेख केला आहे. बेदरचे शहास (महंमद) यांनीं विवेकसिंधूची पोथी दिली. हे सातारप्रांतीचे राहणार म्हणून म्हणतात. गुरुः—सहजानंद. कालः—१४२५(?)

ग्रंथः— सिद्धसंकेतप्रबंध, अमृतसार, अद्भुतप्रकाश, प्रकाशदीप, स्वरूपसमाधान, अनुभवसार, गुरुलीळा, विवेकोत्पत्ति, अनुभवामृत.

मृत्युंजय (आनंद)

ग्रंथः— कर्मविपाक.

मेरु

वि. माहितीः—श्रीसमर्थ–अनंतमौनी– मेरु.

ग्रंथः— भीमोपदेश, आत्मसाक्षात्कार, भगवद्गीता, अवधूतगीता, आनंदलहरी, मानसपूजा, अनुभवसार, मेरुबोध, तत्त्वपठ, पूर्णामृत षोडशकळा, रामसोहळा, समर्थाष्टक, श्रीरामपंचरत्न, संतमाला.

टीपः— मेरु, मेरुकवि, मेरुस्वामी, मेरु अनंत हे सर्व एक च आहेत असें त्यांच्या ग्रंथांवरून व गुरुपरंपरेवरून दिसतें.

मेल्या श्यामदास

ग्रंथः-- पदें.

मैना

वि. माहितीः—भारद्वाजगोत्री जनपंडित यांचे चिरंजीव आबाजीपंत त्यांची भार्या सखुबाई यांची कन्या मैना.

गुरुपरंपराः—श्रीशंकराचार्य-हस्तामलक-त्रोटकाचार्य--नारायणाश्रम चैतन्याश्रम-आनंद-राम-मैना.

ग्रंथः— खुळखुळा.

मैनानाथ

ग्रंथः— आगमनिगम.

ग्रंथः— मैना व मैनानाथ एक च आहेत काय ?

मैराळ

टीपः— विराटपर्व.

मैराळ (सतिदास

ग्रंथः— हरिवंश.

मोरतनय

ग्रंथः— पदें.

मोरयागोसावी

वि. माहितीः—पुरंदर तालुक्यांत मोंगवली येथील जोशी. उपनांव शाळिग्राम. तप-मोरगांवीं केलें. समाधि चिंचवड येथें. हयात-१५५०.

ग्रंथः— पदें, गणेशपुराण.

मोरेश्वर

ग्रंथः— उद्योगपर्व.

मोरेश्वर

ग्रंथः—मंगळवेढीचरित्र, पदें.

मोरोपंत

वि. माहिती:—आडनांव पराडकर; गोत्र जामदग्नि; वाडवळील कोंकणांत राजापुराजवळील सौंदळचे राहणारे; जन्म पन्हाळगडीं शक १६५१ मध्यें; तेथें च केशवगणेश या पाध्ये बंधूकडे काव्याध्ययन; विशी उलट-ल्यानंतर बारामतीस आगमन व पुढें पुराणिक या नात्यानें बाबूजी नाइकांचा आश्रय; यांनीं बहुतेक महायात्रा केल्या; काव्यारंभ पन्हाळगडीं झाला; मृत्युशक १७१६; यांचें विस्तृत चरित्र रा. ल. रा. पांगारकर यांनीं लिहिलें आहे, व मूळ प्रतींवरून समग्र कविता छापण्याचें काम यांचे च वंशज रा. रा. द. पराडकर हे करित आहेत.

ग्रंथ:— आर्याभारत, हरिवंश, मंत्रभागवत, कृष्णविजय. **अष्टोत्तरशत रामायणें:**—मंत्ररामायण (सं.), मंत्ररामायण (म.), निरोष्ठ, परंतु, घनाक्षर, **दंडक**, सवाया, विबुधप्रिय, मंत्रमय, मत्तमयूर, पंचचामर, पुष्पिताग्रा, श्रीप्रिय, प्रिय, रमणीय, हररमणीय, सु, **श्री**, विचित्र, सद्भक्तसर्वस्व, **प्रहर्षण**, श्रीगुरु, सीता, हनुमत्, पंचशती, अनुष्टुभ, त्रिःसप्तमंत्र, कन्यारत्न, कल्याण, श्रवणामृत, वरद, कथासुधा, दोहासोरठा, सद्रत्न, पृथ्वी, **स्रग्विणी**, सद्वृत्त, पीयूष, भाव, सच्छ्लाघ्य, सौम्य, एकश्लोकी, गद्य, सु (सूरा), सत्त्व, मंत्री, नामांक, सद्गर्भ, शिव, सभामगर्भ, मात्रा, शिव (२ रें), उमा, काशी, गंगा, प्रयाग, तीर्थ, ऋषि, राज, सप्तमंत्र, दिव्य, सुख, स्तोत्र (१ ते १०), **पूत, तन्वी,** आचार्य, मंच, सार, रम्यमंत्र, दोहा, बालमंत्र, मंत्रगर्भ, **कंठो,** रामचरितभरित, वचक, गीतामुक्तामाला, रामावतार, शुद्ध, **हर्ष,** रामायणाष्टक, रामप्रार्थना, शुद्ध, रत्न, मधु, पुष्प, दाम, **वीर, धर्म, हय, हूं (शुद्धरामायणापासून हूंपर्यंतचीं रामायणें झालीं परंतु अनुपलब्ध आहेत), लवाई, रम्य (१७१ पद्यांचें) कन्य, आर्यामुक्तामाला (गी.), भीष्म, रामनामाष्टोत्तरशत, कविमित्र, मेघ, अघघांटी. स्फुट काव्यें:—कुशलवाख्यान, अष्टोत्तरशत,**

अनंतव्रतकथा, हरिवंशव्याख्यान, प्रल्हादविजय, भीष्मभक्तिभाग्य, विनायकमाहात्म्य, गुरुस्तव, दुर्गास्तव, संशयरत्नावलि, रामदासस्तुति, रत्नमालाटीका, मुरलीनवरत्नमाला, स्फुट श्लोक, स्फुट अभंग, पदें, तुकारामस्तुति, मदालसोपाख्यान, मदालसामाहात्म्य, इष्टकाप्रार्थना, गिरिन्द्रमोक्ष, पांडुरंगस्तुति, रामप्रभुप्रार्थना, केकावलि, कृष्णमाहात्म्य, आर्याकेकावलि, षट्क, नामरसायन, पांडुरंगपुरीप्रार्थना, विठ्ठलस्तोत्र, गंगाविज्ञप्तिः, अश्वघाटीदशक, रामप्रार्थना, स्फुट सवाया (सं. प्रा.) वेंकटेशप्रार्थना, नामार्या, मुरलीपंचक अमृतमथन, हरिहरप्रार्थना (सं.) हरिहरप्रार्थना (प्रा.), वामनचरित्र, साधुसत्कार, सन्मनोरथराजि, मयूरेशप्रार्थना, द्विचत्वारिंशतयात्रा, भगवत्प्रसादमहिमा, विष्णुपदवांकिली, गंगावकिली गुरुस्तुति, दुर्वासभिक्षा, श्रीकृष्णस्तुति (सं.), प्रल्हादविरचिता भगवत्स्तुति, सत्यंविधातुमितिश्लोकटीका, सावित्र्या- [illegible], पांडुरंगस्तुति (सं.), स्मरणी, भगवद्गीतास्तुति, कृष्णास्तव, महिपतिप्रार्थना, रामकृष्णस्तुति, पृथुकोपाख्यान, सन्मणिमाला, प्रांतप्रार्थना, श्रीमद्भगवद्गीताटीका, नवदानकेलि, सिद्धेश्वरस्तव, ज्ञानेश्वरस्तव, एकनाथस्तव, वामनस्तुति, नामदेवस्तव, नरसीमेहतास्तुति, कबीरस्तव, तुळसीदासस्तुति, माधवदासस्तुति, अम्लानपंकजमाला, पांडुरंगस्तोत्र (सं.२) मनःप्रार्थनाष्टकम्, श्रीशंकरस्तोत्र, आर्यानुष्टुप हरिहरप्रार्थना, गदाधरस्तुति, बिंदुमाधवस्तुति, विश्वेश्वरस्तवन, प्रयागस्तुति, काशीस्तुति, अहल्यास्तव, विठलस्तुति-दोहा, देवीमाहात्म्य, मल्लारीविजय, ध्रुवचरित्र, नारदाभ्युदय, वाङ्मनःप्रार्थना, दत्तचरित्र (साक्या), सद्धर्मदोहा, विठ्ठलभक्तस्तुति, अंबरीषचरित्र (साक्या), रुक्मिणीगीत, मणिकर्णिकास्तुति, गोपीप्रेमोद्गार, रामस्तव (सं.), पतिव्रतासंकीर्तन, साधुरीति, महद्विज्ञापना, काशीप्रार्थना, काशीस्तवप्रार्थना (सं.), पांडुरंगपुरप्रार्थना, [illegible] आर्या, गुरुस्तुतिपुष्पांजलि, हनुमत्स्तुति, गंगास्तुति,

पुंडरीकप्रार्थना, विठ्ठलविज्ञापना, श्रीरामगीति, गंगाप्रतिनिधितीर्थकीर्तन, गोपीगोरवा, दशमस्कंधमुख्यार्थगीतिः (सं.), अवतारमाला, पांडुरंगाष्टक, कृष्णास्तुति, गोदावरीस्तव, तुळजास्तव, करवीरनिवासिनीस्तुति, म्हाळसावरस्तुति, गणपतिप्रार्थना, रेणुकास्तवन, तुळसीस्तव, गंगाप्रार्थना, आशंसाष्टक, तेजस्तव, साधुस्तव इत्यादि इत्यादि.

मौनी

वि. माहिती:—नाशिकचे रघुनाथाचार्य यांचे चिरंजीव. श. को. कार ज्यांची समाधि १७९८ मध्यें झाली असे एक शिवरचे भिन्न वाजसनेयी मौनी देतात.

ग्रंथः— लघुबोध (कोणते मौनीचा ?).

मंगीश

ग्रंथः— राधाविलास.

यदुमाणिक

वि. माहितीः—यांची वंशावळ अशीः—पद्माकर–यदुमाणिक–विश्वनाथ–दिगंबर –जगन्नाथ–बाळकृष्ण–बाबाजी-मोहनिराज–बळराम (हयात १८३०). चाळिसगांव (खानदेश) येथें. गुरुपरंपराः—आदिनारायण–विधि–अत्रि–दत्त–जनार्दन–एकनाथ–बाळकृष्ण–बाबाजी.

यांची समाधि वेरुळ येथें. यांनीं अजठ्याचे डोंगरांत उभ्या गणपतीजवळ तीन वर्षें तप केलें. (तोंडी माहिती).

ग्रंथः— देवीमाहात्म्य (१६२१), गीतगोविंद, कृष्णाची आरती, पदें.

यशवंत

ग्रंथः— चेंडुफळी, कालियामर्दन.

यादव

वि. माहिती:—रंगनाथस्वामींचे बंधु यादव. यांचें चतुर्थाश्रमींचें नांव ब्रह्मानंद. हे व ते कीं काय हा प्रश्न आहे.

ग्रंथः— रुक्मिणीस्वयंवर, पदें.

यादवसुत

ग्रंथः— पदें.

योगानंद

ग्रंथः— पदें.

योगी (दामोदर)

ग्रंथः— पदें.

रघुनाथ

टीपः— रघुनाथपण्डिताहून भिन्न.

ग्रंथः— निजवैभव, सोमवारकथा.

रघुनाथ (पण्डित)

वि. माहितीः—अरणी या गांवीं चार कवि झाले. १ आनंदतनय, २ रघुनाथपण्डित, ३ सुभानराव व ४ गोसावीनंदन. हे आनंदतनयाचे व्याही.

ग्रंथः— नलदमयन्तीआख्यानं, रामदासवर्णन, गजेंद्रमोक्ष.

रघुनाथ (दास)

ग्रंथः— जन(जल) जसवंत यांचें चारित्र.

रघुनाथ (शिवात्मज)

ग्रंथः— वैदेहीत्रिजटासंवाद.

रघुनाथ (शेष)

ग्रंथः— भागवत (दशमस्कंध). (ले. श. १६६०).

रघुनाथ (श्यामसुंदर)

वि. माहितीः—ज्ञानोदयसिंधूंत शेवटीं " इति श्रीमत् ज्ञानोदयसिंधौ श्यामराघवविरचिते " असें असल्यावरून हे व श्यामराघव एक च दिसतात.

ग्रंथः— कैवल्योपनिषट्टीका, ज्ञानोदयसिंधु.

रत्नाकर

वि. माहिती:—गुरुपरंपरा:—मुक्ताबाई–चांगदेव–विमलानंद–जनकानंद–नृसिंह–पुरुषोत्तम–मुक्तानंद––एकानंद––सिद्धानंद––रामानंद––रत्नाकर, (१६४१ चा सुमार.)

वंशावळ:—महातबा स्त्री गंगाबाई पुत्र हिराजी, त्यांचे हरिहर स्त्री अनुबाई पुत्र रत्नाकर; त्यांचे जयदेव, त्यांचे एकनाथ, त्यांचे शिवनाथ पुत्र कृष्णनाथ, त्यांचे रामनाथ, रामनाथांचे भय्याबुवा (बऱ्हाणपुरी हयात १८२६).

ग्रंथ:— विश्वरूपनमन, रत्नाकरबोध, उपदेशरत्नाकर, ब्रह्मानुभवस्तोत्र, सद्गुरु-अष्टक, गुरुपरंपरा, रत्नाकर ईडराज, प्रकाशरत्नाकर, संगमचरित्र, ॐकार–क–वार–तिथि–मासवर्णन, भरतांचें पद, निश्चयरत्नाकर, निःसंदेहरत्नाकर, रत्नाकरउपदेश, ज्ञानरत्नाकर, विचारपंचविशी, अविचारपंचविशी, निश्चयपंचविशी, मानसपूजा, अरळ, प्रसादरत्नाकर, जातरत्नाकर, अनुभवरत्नाकर, भागवत, मामळभट, पूतनाशोषण, नामकरण, नमस्काराष्टक, मनोबोध, एकादशीव्रतकथा, भोजन, निरंजनाष्टक, रत्नमाळ, दळणाच्या ओंव्या, निवृत्ति नांवाचा अर्थ, पत्र, निर्णयरत्नाकर, बुद्धिरत्नाकर, गीता.

रत्नाकर

वि. माहिती:—नामलगांवकर निरंजन यांचे चिरंजीव.

ग्रंथ:— पद.

रत्नाकर (विश्वंभरदास)

वि. माहिती:—निरंजननाथ (१५५९–१६२०)—विश्वंभरनाथ (१६२०–१६४५ सुमार)—रत्नाकर (१६४५–१६७० सुमार.)

ग्रंथ:— पदें.

रमणतनय

वि. माहिती:—प. सं. वरून यांचे गुरु 'हरि' म्हणून होते.

ग्रंथ:— पदें.

रविदास

ग्रंथः— कुबेरगर्वहरण.

राघव

ग्रंथः— संदेहहरण.

टीपः— श्रीरामदाससंप्रदाय.

राघव

वि. माहितीः—यांनीं आपल्या दोन ग्रंथांत 'शिव' यांस च गुरु म्हटलें आहे.

ग्रंथः— चित्रदीप, कूटस्थदीप, तत्त्वविवेक, पंचभूतविवेक, द्वैतविवेक, विद्यानंद, महावाक्यविवेक.

राघव

वि. माहितीः—अगदीं आधुनिक. १७६२ चा सुमार. वऱ्हाडांतील एका बाडांत 'कृष्णकौतुक' म्हणून एक प्रकरण आहे त्याचे शेवटीं 'शेष राघवें' असें आहे यावरून हे राघवशेष असावेत. 'रघुनाथ शेष' एक मागें गेले च आहेत, ते च हे असावेत.

ग्रंथः— वारमणीकथा, कृष्णचरित्र, शिबिचरित्र, दामाजींचें चरित्र.

राघवचिद्घन

वि. माहितीः—पहाः—राघव. येथें थोडा संशय आहे. यांस 'राघवरंक' हें हि नांव होतें म्हणतात. येथें गुरूचा उल्लेख 'मग सिमल्लनाथ ऐशीं। नामाक्षरें सांगितलीं' असा केला आहे. चिद्घन गुरु तर हे आणखी कोण? तेव्हां या गोष्टीचा खुलासा अद्याप होणें आहे.

ग्रंथः— संदेहहरण (१६११ अश्विन शु. १०).

राघवदास

ग्रंथः— अध्यात्मरामायण.

रानाई

ग्रंथः— अभंग.

राजाराम

ग्रंथः— पदें, अभंग.

राजाराम (प्रासादि)

वि. माहितीः—यांनीं तुकाविप्राचा उल्लेख केलेला आहे तेव्हां १७०० नंतर.

ग्रंथः— भक्तमंजिरीमाला.

राम

वि. माहितीः—पुढें एक विश्वंभरनाथ आले आहेत. त्यांचें नांव रामसुतात्मज होते, तेव्हां ते राम हे असावेत असें वाटतें. निश्चित नाहीं.

पहाः—विश्वंभरनाथ (१५३४) रामसुतात्मज.

ग्रंथः— श्रीनृसिंहलक्ष्मीकल्पलता, गजगौरीव्रत.

टीपः— गजगौरीव्रतांत शेवटीं 'बालकराम हो' अशीं पदें आहेत. तेव्हां बालकराम म्हणून एक कवि आहेत त्यांचें तर हें काव्य नाहू?

राम

वि. माहितीः—आधुनिक.

ग्रंथः— कोल्हापूरवर्णन.

राम (कोकिळ)

ग्रंथः— रामगीता (ले. श. १६१५).

टीपः— ग्रंथान्तीं रामकोकिळाचा जरी उल्लेख आहे तरी पुढें गिरधरस्वामिशिष्य नागेंद्राचा हि आहे. हा लेखक तर नव्हे?

रामकृष्ण (पण्डित)

वि. माहितीः—एक श्रीपतिसूनु रामकृष्ण यांनीं संस्कृत पद्यांत श्रीमहिषासुरमर्दिनीची स्तुति फार बहारीची केली आहे. ते च हे असावेत.

ग्रंथः— पदें.

रामकृष्ण (यति)

वि. माहिती:—यांचे ग्रंथ येळेहळी येथील रामदासी मठीं आहेत.

गुरुः—विद्यारण्य ?

ग्रंथ:— चित्रदीप (पंचदशीवर टीका ले. श. १६९९), तत्त्वविवेक.

टीप:— ग्रंथान्तीं ' विद्यारण्यमुनिकिंकरेण रामकृष्णेन ' असें आहे.

रामचंद्र

वि. माहिती:—रत्नपुरांतील (?) चतुर्वेदपारंगत कोणी ' कुंड ' होते त्यांनीं केलेल्या ' निर्माण ' ग्रंथाची यांनीं टीका केली आहे.

ग्रंथ:— कुंडनिर्माण (१५०६ हा संवत्सर म्हणून दिला आहे तेव्हां शक १३७२ येतो.)

रामचंद्र

वि. माहिती:—वरच्याहून हे भिन्न असावेत असें वाटतें.

ग्रंथ:— सुदामचरित्र, पारिजाताख्यान.

रामचंद्र (बुवा)

ग्रंथ:— महाभारत.

रामचंद्र (मल्हार)

ग्रंथ:— सुभद्राहरण.

टीप:—हे आणि वरील दोन एक च असावेत असें वाटतें.

रामजोशी

वि. माहिती:—भ. मं.:—यांचे गुरु निरंजन (?) होते. हे गाणपत्य समर्थ-समकालीन नव्हत. कारण, यांच्या व त्यांच्या कालांत फार अंतर आहे. हे सोलापूर येथील वाजसनेयी देशस्थ ब्राह्मण.

काल:—१६८४-१७३४ असा देतात.

ग्रंथ:— छंदोमंजिरी, लावण्या (परमार्थपर), फटके वगैरे.

रामदास (श्रीसमर्थ)

वि. माहिती:—जांब येथें जन्म १५३० चैत्र शुद्ध ९; नाशिकाजवळील टाकळीस तपश्चर्या; दोन तपें तीर्थाटन; नंतर कृष्णातीरीं आगमन; १५७१–८१ ग्रंथलेखन; १५९४ श्रीशिवछत्रपतीस उपदेश; १६०३ समाधि सज्जनगड येथें.

ग्रंथः— श्रीदासबोध, १४ शतकें, आत्माराम, मनोबोध, पंचीकरणयोग, चतुर्थयोगमान, मानपंचक, पंचमान, स्फुट, रामायण, षड्रिपुवर्णन, रामगीता, कृतनिर्वाह, चतुःसमासी, सप्तसमासी, अक्षरपदसंज्ञा, रामकृष्णस्तव, दासप्रबोध, सगुणध्यान, गोसावी, अभंग, भूपाळ्या, आरत्या वगैरे. [पुढें पुरवणी पहा].

रामदास (गोविंद)

ग्रंथः— तत्त्वप्रकाश.

रामनाथ

ग्रंथः— पदें.

रामभट

ग्रंथः— विठ्ठलाची लावणी.

रामसुतात्मज

वि. माहितीः—'वसुपुरी' (?) च्या तळीं 'तुळा' ग्राम आहे तेथें यांचा वास होता. यांचे आजे राम, पिते विनायक, माता यशोदा व स्वतःचें नांव विश्वंभर असावें; आपस्तंब, भृगुगोत्र.

ग्रंथः— द्रौपदीवस्त्रहरण (१५३४ परिधावी).

रामाजनार्दन

वि. माहितीः—एकनाथांचे गुरुबंधु.

ग्रंथः— श्रीज्ञानेश्वरांची आरति.

रामात्मज

वि. माहिती:—हरिवंशावरून आपणांस ग्रंथाची स्फूर्ति झाली असें म्हणतात. यांचें नांव नारायण असें समजतात.

ग्रंथः— कृष्णदान, तुकाईदान.

रामानंद

ग्रंथः— ब्रह्मोत्तरखंड, कार्तिकमाहात्म्य, राधामाधवविलास, भारत, भागवत, रामायण, पदें.

रामा (पण्डित)

ग्रंथः— रामामृत.

रामा (रमा) वल्लभदास

वि. माहिती:—जन्मशक १५३२ (अ० २२) अ. को. कार म्हणतात हल्लीं (१८०१) सोलापुरास ज राय रासकर म्हणून आहेत त्यांचे मूळपुरुष. देशस्थ, आश्वलायन, कृष्णोपासक.
गुरुपरंपरा:—श्रीशंकराचार्य—आनंदाश्रम—श्रीलक्ष्मीधरदास—श्रीरामावल्लभ.

ग्रंथः— दशकनिर्धार (१५५५ श्रीमुख मार्ग. शु. १४ बुधवार), वैष्णवगति, प्रबोधचंद्रिका, बृहद्वाक्यवृत्ति, चमत्कारी, शुकाष्टक, श्रीकृष्णजयंतीकथा-प्रबंध, अभंग, गुरुवळी (१५५८ धातृसंवत्सर).

रामी रामदास

वि. माहिती:—शक १५२७ मध्यें जन्म. समाधि १५९९ दहिफळ येथें. श्रीसमर्थांचे ज्येष्ठ बंधु. पद:—श्रेष्ठ.

ग्रंथः— भक्तिरहस्य (१५९०), सुगमोपाय, स्फुट प्रकरणें.

रामेश्वर

वि. माहिती:—तुकारामांचे शिष्य; पुण्यानजीक वाघोलीचे.

ग्रंथ:— पदें वगैरे.

रुद्र

वि. माहिती:—वर दिलेले चंद्रात्मज रुद्र ते हे च.

ग्रंथ:— पदें.

रेणुकानंदन (विठा)

टीप:— भाषेवरून दासोपंतसमकालिन असावेत असें वाटतें. रचना अत्यंत गोड आहे. कृष्णोपासक होतेसें दिसतें.

ग्रंथ:— पदें.

रेवणसिद्ध

वि. माहिती:—हे जातीचे जंगम होते म्हणतात. (अ. को.).

ग्रंथ:— परमरहस्य.

रंक

वि. माहिती:—यांचे गुरु त्रिंबक म्हणून होते.

ग्रंथ:— हनुमंतअर्जुनभेट (अर्जुनगर्वपरिहार).

रंक (महादेवाचा)

ग्रंथ:— विद्वत्संन्यास (टीका).

रंगनाथ (कावेरीतटनिवासी)

ग्रंथ:— कावेरीमाहात्म्य (र. श. १६११), वृत्तसुधा.

टीप:— कावेरीमाहात्म्य याच 'तुलाकावेरी' असें ग्रंथकर्त्यांनें नांव दिलें आहे.

रंगनाथ (नरहरी)

ग्रंथ:— रामभक्तामृत.

रंगनाथ (निगडीकर)

वि. माहिती:—नाशीर येथील पिते बाबाजी (बापाजी) पंत व बयाबाई यांचे चिरंजीव; जन्म (१५३४); बंधु विठ्ठल (१५३८), यादव (१५३१); गुरु:—प्रत्यक्ष पिते (चतुर्थाश्रमी निजानंद). कन्हाडास उपदेश. गुरुपरंपरा:—नारायण—दत्त—सहजानंद—रामानंद—अमलानंद—गंभीरानंद—ब्रह्मानंद—सहजानंद—पूर्णानंद—निजानंद—रंगनाथ. समाधि:—१६०६ मार्गशीर्ष व० १०.

ग्रंथ:— बृहत्वाक्यवृत्ति, भगवद्गीता, योगवासिष्ठ, गुरुगीता, निजानंदसाधन, सुदामचरित्र, भानुदासचरित्र, शुकरंभासंवाद, रामजन्म, गजेंद्रमोक्ष, रंगाष्टक, मार्तंडाष्टक, करुणाष्टक, श्लोकपंचक, पंचीकरण, मिथ्यामायास्वरूप, एकाखडी, बद्धमोक्षविवरण, गरुडसत्यभामागर्वपरिहार, संतमालिका (१), पदें वगैरे.

टीप:— संतमालिकेसंबंधीं आंत दिलेल्या काशिराज व विश्वनाथ यांचे नामनिर्देशावरून संशय उत्पन्न होतो कीं, हे रंगनाथ भिन्न असावे. पहा:—काशिराज, विश्वनाथ.

रंगनाथ (मोगरे)

वि. माहिती:—वंशावळ:—अनंत त्यांचे आपराज, त्यांचे रंगनाथ. गोत्र कपि, दैवत नृसिंह.

गुरुपरंपरा:—वासुदेवानंद (सिद्धानंद) यांची समाधि काशीस. शिष्य परमानंद यांची समाधि गंगातीरीं. त्यांचे शिष्य वैकुंठानंद हे बदरीकेदारीं समाधिस्थ झाले. त्यांचे कृष्णानंद–रंगनाथ (१५३०). शिष्यपरंपरा:—रंगनाथाचे काशिराज–विश्वनाथ.

ग्रंथ:— पंचरत्नीगीता (?), योगवासिष्ठ (र. श. १५३०) चिद्‌ब्रह्मानंदलहरी.

रंगनाथशिष्य

वि. माहिती:—गुरुपरंपरा:--दत्त--जनार्दन--एकनाथ-नित्यानंद--कृष्णानंद-विसोबानंद-मुरारनाथ-रंगनाथ-(हे रंगनाथ निगडीकर हि नव्हेत व मोगरे हि नसावेत. कारण, गुरुपरंपरेंत भिन्नता आहे).

ग्रंथ:— गुरुगीता.

रंगनाथसुत

ग्रंथ:— पदें.

रंगानुज

ग्रंथ:— संतस्तवन.

रंगानुजात्मज

टीप:— कदाचित् ' श्रीधर ' तर नव्हत ?

ग्रंथ:— संतमाळ.

लछीराम

ग्रंथ:— पदें.

लतीप

ग्रंथ:— पदें.

लल्लप (कृष्णसुत)

ग्रंथ:— बालचरित्र.

ललितानंद

वि. माहिती:—गुरुपरंपरा:--नित्यानंद-दिव्यानंद-ललितानंद.

ग्रंथ:— सौंदर्यलहरी.

टीप:— या ग्रंथांत फत्तेसिंग गायकवाडांचा उल्लेख आहे.

लक्ष्मण

ग्रंथः— गणेशाष्टक.

टीपः— शिवदिन केसरीचे नातु एक लक्ष्मण (लक्ष्मणनाथ) होते.

लक्ष्मणनाथ

वि. माहितीः—वासुदेवकृत ' उपदेशसार ' म्हणून एक ग्रंथ आहे त्यांत परंपरा दिली आहे ती अशीः—नारायण–विधि–नारद–व्यास–गौडपाद–गोविंद–विवर्ण–प्रबोध–उद्बोध–निगमबोध–प्रकाशमार्तंड–निरालंब–कल्याण–पद्माकर–पुरंधर–सुधाकर–वल्लभ–श्रीधर–विश्वनाथ–महादेव–सोमदेव–नीलकंठ–मारकीनाथ–गोविंद–**लक्ष्मण**–वासुदेव.

ग्रंथः— योगवासिष्ठसार.

लक्ष्मणात्मज

ग्रंथः— पदें.

लक्ष्मी

ग्रंथः— कामिनीसंग.

लक्ष्मीनंदास्वामी

टीपः— पहाः—प्रल्हादबाबा.

लिंगदास

टीपः— पहाः—महालिंगदास.

लिंगेश्वर

टीपः— यांस लिंगाप्पा म्हणत.

ग्रंथः— पदें.

लुखनाथ (सोळंखी)

वि. माहितीः—ब्रह्मदत्त–सदानंद–लुखनाथ.

ग्रंथः— तापीमाहात्म्य (र. श. १६२४).

टीपः— या ग्रंथाची रचना अंमळनेर (खानदेश–चोपडें) येथें झाली.

लोकनाथ

ग्रंथः— गोपीकृष्णाख्यान.

लोलिंबराज

वि. माहिती:—(अ. को.) जुन्नरचे दिवाकर भट यांचे चिरंजीव. सप्तशृंगी शक १५५० त तप केलें.

ग्रंथः— भागवत (१० स्कंध), हरिविलास (स.) वैद्यजीवन (१५५५ सं.)

वडवाळ सिद्ध (नागेश)

ग्रंथः— संकटहरिणीशिवग्रंथ (मार्गशीर्ष व. २ शक १३१३)

वरद नागेश (अज्ञान नागेश)

वि. माहिती:—यांचे गुरु नागनाथ (नागेश).

ग्रंथः— वरदनागेश, गुरुशिष्यसंवाद.

वरदसुत

ग्रंथः— गुरुचरित्र (र. श. १६९०).

वरदास

ग्रंथः— गजगौरीव्रत.

वल्लभानंदन

ग्रंथः— पदें.

वामन

वि. माहिती:—या कवीसंबंधीं अत्यंत अनिश्चित माहिती मिळते. वामन शेष, वामन पण्डित, वामन पार्थसारथी व वामन अशीं चार नांवें उपलब्ध होतात. 'साम्राज्य वामन' हें आणखी एक नांव आहे; परंतु येथें साम्राज्य हा वामनशिष्य असावा.

१ 'काव्यालंकार' कर्ते वामन हे जयापीडाचे दिवाण होते; हे ९ वे शतकांत झाले व काशिकावृत्ति ही यांची च असें अ. को. कार म्हणतात.

२ मूळ कोरेगांवचे राहणारे व ज्यांनीं वाईजवळ पांडववाडी येथें समाधि घेतली (१५९५ वैशाख शु ॥ ६) ते वामन पंडित दुसरे.

३ समश्लोकी टीका गीतेवर करणारे वामन पार्थसारथी होत. 'पार्थ-सारथी' हें उपनांव मद्रासेकडे उपलब्ध आहे. तेव्हां हे कदाचित् तंजावर प्रांतींच्या 'महाराष्ट्रकवीं' पैकीं असावे. यांचें दैवत वरदराज होते व गुरु 'कृष्णाश्रम' म्हणून कोणी होते. यांचा 'शास्त्रदीपिका' म्हणून संस्कृत ग्रंथ उपलब्ध आहे. (?).

४ श्रीसमर्थशिष्य वामन होते म्हणून माहिती उपलब्ध होते.

५ एक सीतास्वयंवर उपलब्ध आहे. त्याचे १२२।१२३ श्लोकांत 'वामन' 'रघुनाथस्वामि', व 'नारायणात्मज' अशी तीन नांवें आलीं आहेत; तेव्हां रघुनाथशिष्य नारायणात्मज वामन हे कोण ? पूर्ण चरित्रें उपलब्ध झाल्यावांचून हे प्रश्न संदिग्ध च राहणार.

ग्रंथः— राजयोग, अपरोक्षानुभूति (ले. १६९७), निगमसार (र. १५९५), गजेंद्रमोक्ष, यथार्थदीपिका, रामगीता, हरिविलास, सीतास्वयंवर, आर्याटीका, कंसवध, रामजन्म, कात्यायनीव्रत, सीतालोपामुद्रा-संवाद, रुक्मिणीविलास, भरतभाव, गोपीगीत, रुक्मिणीसंवाद, सत्यभामाविलास, सप्तश्लोकी पत्रिका, गंगालहरी, प्रियसुधा, कंस-वध, वामनचरित्र, चित्सुधा, रासक्रीडा, सप्तश्लोकी गीता, जयद्रथवध, अश्वस्नान, चित्लहरी, भस्मासुरवध, मुकुंदविलास, दूतिकाप्रकरण, समश्लोकी गीता, चरमगुरुमंजिरी, नामसुधा, नृहरीदर्पण, महाज्ञान-निरूपण, ध्रुवचरित्र, अजामिळाख्यान, अनुभूतिलेश, अहिल्यो-द्धार, उखलबंधन, उपदेशमाळा, उपादान, कथास्वयंवर, कर्मतत्त्व, कल्याष्टक, कालियामर्दन, कृष्णजन्म, गीतार्णव, गीतार्णवसुधा,

